संपादकीय

अज्ञानाच्या अंधःकारावर मात करण्यासाठी

'मेहता ग्रंथजगत'चा हा दुसरा दिवाळी अंक सादर करताना आनंद होत आहे. वाचकांनी आमच्या या उपक्रमाला जो भरघोस प्रतिसाद दिला त्यामुळे आमची उमेद वाढत आहे. या अंकात आमच्या मान्यवर लेखकांनी आपल्या गाजलेल्या एकेका पुस्तकाची जन्मकथा सांगितली आहे. आपले पुस्तक खूप खूप वाचकांनी वाचायला हवे ही त्या लेखकांची भावना आहे. प्रकाशकांचीही भावना तशीच असणे स्वाभाविक आहे.

कोणतेही पुस्तक प्रसिद्ध केले जाते तेव्हा ते वाचकांकडून वाचले जावे ही अपेक्षा असते. वाचकांपर्यंत जे पोचत नाही ते पुस्तक निष्प्रभ, निरुपयोगी, निरर्थक ठरते. कवी भवभूतीने म्हटले आहे की कधीतरी कोणीतरी समानधर्मी रसिक भेटेल आणि माझ्या लेखनाचे चीज होईल. परंतु बहुसंख्य पुस्तके प्रसिद्ध झाल्यावर पुरेशा जाणकार वाचकांपर्यंत तत्काळ न पोचल्याने ती जन्मतःच मृत्यू पावणाऱ्या अर्भकासारखी - जीवन्मृत ठरतात. यात लेखकाचा दोष असतो असे म्हणता येणार नाही; पुस्तक वितरण व्यवस्थेशी संबंधित घटकाचा खरे तर तो दोष मानायला हवा. अमेरिका-यूरोप यांतील पुस्तकांची विक्री-वितरण व्यवस्था या दृष्टीने बरीच प्रगत व शिस्तबद्ध मानावी लागेल. विकसनशील देशात मात्र ग्रंथव्यवहार हा अत्यंत सीमित व संकुचित पातळीवर चालतो. आणि पुस्तकांचा खप अगदीच नगण्य म्हणावा अशा मर्यादेत राहतो. वाचकांना नेमके काय हवे आहे, विशिष्ट प्रकारच्या पुस्तकाचा नेमका वाचक कोण आहे, तो वाचक पुस्तकासाठी किती किंमत व किती वेळ देऊ शकतो, त्या पुस्तकातील गुंतवणूक त्याला कशी व कितपत लाभदायक ठरू शकते, त्या वाचक ग्राहकांपर्यंत पुस्तक पोचवण्यासाठी कमीत कमी खर्चाची व कमीत कमी वेळ घेणारी कुठली यंत्रणा उपलब्ध आहे - अशा अनेक बाबींवर विशिष्ट पुस्तकाच्या वितरणाची विक्रीची कसोटी लागते. भारतासारख्या देशात प्रकाशन व्यवसायाकडे शास्त्रशुद्ध दृष्टीने पाहिले जात नाही; साहजिकच ह्या व्यवसायाचा पायाच डळमळीत राहिलेला आहे. परंतु याबाबत केवळ प्रकाशकाला व प्रकाशनसंस्थेला दोष देऊनही भागणार नाही. आपल्या देशातील एकूण आर्थिक विषमता, शिक्षण प्रसारातील असमतोल, ज्ञानसंपादनाबाबतची अनास्था, शिक्षणपद्धतीतील परीक्षातंत्राच्या विशिष्ट आग्रहामुळे ज्ञानसंपादनापेक्षा पाठांतर व स्मरणशक्ती यांना आलेले महत्त्व, पुस्तकांच्या जलद व स्वस्त वितरणाबाबत पोस्टखात्याचे अदूरदर्शी धोरण, पुस्तकांवर जकातीसारखे जाचक कर लादण्यातल्या महापालिका-पालिकांचा अ-सांस्कृतिक व असंस्कृत पवित्रा, ग्रंथालयांची तोकडी अनुदाने व तीही वेळेवर देण्याबाबतचा अक्षम्य हलगर्जीपणा, वृत्तपत्रांमध्ये पुस्तकविषयक जाहिरातींचे

आकारण्यात येणारे अ-वास्तव व आटोक्याबाहेरचे दर, विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात कालबाह्य व पारंपरिक चौकटीचा ज्ञान-विरोधी पगडा, पुस्तकांची तोकडी व अपुरी विक्री केंद्रे, पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर वेगवेगळ्या गावी अविलंब पोचवण्यात येणाऱ्या अडचणी, ग्राहकांपर्यंत पुस्तक पोचविण्यातील अडथळे, शासकीय यंत्रणेत ग्रंथव्यवहाराचे मोल जाणणाऱ्या ज्ञानोपासकांची अत्यल्प संख्या- अशी नकारात्मक मुद्द्यांची मालिका खूप लांबलचक होऊ शकेल.

—परंतु तरीही हे लक्षात घ्यायला हवे की या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय भाषांमध्ये ग्रंथप्रकाशन आणि ग्रंथव्यवहार हा सतत वाढत राहिलेला आहे. मराठी भाषेपुरताच विचार केला तरी दरवर्षी पंधराशेवर पुस्तके प्रसिद्ध होतात. सुमारे चारशे प्रकाशक कमीजास्त व्यवहार करतात. वर्षाला पन्नासावर पुस्तके प्रकाशित करणाऱ्या दहा-पंधरा प्रकाशन संस्था आहेत. केशव भिकाजी ढवळे प्रकाशन पुढच्या वर्षी आपल्या शतकमहोत्सवी वर्षात पदार्पण करील. पन्नास-साठ वर्षे प्रकाशनव्यवसाय वा ग्रंथविक्री करणाऱ्या अनेक संस्था आहेत. आणि आता तर डीटीपीची सोय सर्वदूर पोचल्याने कोणीही लेखक कवी प्रकाशकाकडे खेटे न घालता स्वतःच आपले पुस्तक स्वखर्चाने काढून मोकळा होतो. पूर्वी मान्यवर प्रकाशनसंस्थेने आपले पुस्तक काढावे म्हणून लेखक आग्रह बाळगत; आणि प्रकाशकाने पुस्तक स्वीकारल्यावर दोनचार वर्षेही ते निघण्याची वाट निमूटपणे बघत. आज विशिष्ट प्रकाशकाचा आग्रह धरणारे लेखक मोजकेच उरले आहेत; आणि पुस्तक लिहून झाल्यावर दोनचार वर्षे थांबण्याची तर तयारी कोणाचीच नसते.

प्रकाशनव्यवसाय हा एक विचित्र व्यवसाय आहे. पुस्तक खपले तर त्यात फायदा होतो. परंतु एक हजार प्रतींची पहिली आवृत्तीही ज्यांची पाचदहा वर्षात संपत नाही अशी शेकडा ऐंशी तरी पुस्तके गोडाऊनमध्ये धूळ खात पडतात. पाठ्यपुस्तके, धार्मिक पुस्तके, व्यक्तिविकासात्मक वा काउंटरसेलची पुस्तके (ज्योतिष, पाकशास्त्र, गृहव्यवस्था, करमणूक, छंद इ.) ही अर्थातच खपत राहतात. भगवत् गीता, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा वर्षानुवर्षे निरनिराळे प्रकाशक निरनिराळ्या आकारात, निरनिराळ्या पद्धतीने व जास्त कमी किंमतीच्या वेगवेगळ्या आवृत्त्यांच्या स्वरूपात काढत आहेत, आणि खपवत आहेत. अंकलिपी, स्तोत्रे, रामरक्षा, आरत्या यांच्या खपाचे आकडे नवीन पुस्तकापेक्षाही जास्त असतात. पाठ्यपुस्तकांच्या सरकारीकरणामुळे बारावीपर्यंतची पाठ्यपुस्तके ही सरकारी मक्तेदारी झाली. पूर्वी पाठ्यपुस्तकात होणारा फायदा काही अंशी कमी खपाच्या ललित वाङ्मयाच्या निर्मितीसाठी उपलब्ध होई. परंतु आता ती शक्यता उरलेली नाही. पाठ्यपुस्तकांच्या क्षेत्रात शासकीय मक्तेदारी असल्याने एकूण मराठी व प्रादेशिक भाषांतील प्रकाशनव्यवसायाच्या प्रगतीला फार मोठी खीळ बसलेली आहे. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीतील प्रयोगशीलता आणि विषय रंजक करणाऱ्या विविध क्लृप्त्या याबाबत अनुभवी शिक्षक-अभ्यासक-लेखकांची उपक्रमशीलताच त्यामुळे दडपली, मारली गेली आहे. बालभारतीची पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांच्या सळसळणाऱ्या जिज्ञासेची पूर्तता करण्याच्या दृष्टीने अगदी

कुचकामी आहेत. त्यांची विज्ञान-गणित इ. विषयांच्या पुस्तकातली भाषा ही मराठी असली तरी ती सर्वसामान्य मराठी माणसालाही दुर्बोध वाटणारी आहे. मराठी मुलांचे व भाषेचे फार मोठे नुकसान 'बालभारती'ने केलेले आहे. एसएससी पास होणाऱ्या अनेक मुलांना मराठीत वा इंग्रजीत दहा वीस वाक्येही शुद्ध लिहिता येत नाहीत ही मोठीच शोकान्तिका आहे. त्या बद्दल खूप लिहिण्यासारखे आहे. येथे बालभारतीने मराठी प्रकाशन व्यवसायाच्या विकासात जो अडसर आणला त्याकडेच फक्त लक्ष वेधायचे आहे. उत्पन्नाचे व कमाईचे एक हक्काचे साधन हिरावून घेतले गेल्यावरही मराठी प्रकाशकांनी आपला व्यवसाय व्रतस्थपणे चालू ठेवला याबद्दल खरे म्हणजे त्यांचे कौतुकच करायला हवे. सहा आसनी रिक्षावाले स्वस्त व मस्त सेवा देऊ लागताच, तीन आसनी रिक्षावाले आंदोलन करतात; परंतु आमचे प्रकाशक आपले निर्वाहाचे साधन हातचे गेले तरी निमूट राहतात. सरकार दरबारी आपला आवाज पोचवण्याची क्षमता मराठी प्रकाशकांत नाही. त्यांच्या संघटनेत नाही. ऑपरेशन ब्लॅक बोर्ड, विज्ञानविषयक पुस्तक खरेदी याबाबत अधिकाऱ्यांची अन्याय्य अरेरावीही ते मुकाटपणे सहन करतात. हे आपले दुर्दैव आहे.

शंभर कोटींच्या घरात भारताची लोकसंख्या जाणार आहे. आणि पन्नास कोटी लोक आज साक्षर आहेत. हे लक्षात घेता भारतात आज पुस्तकांना व पुढे सीडी-रॉम वगैरे इलेक्ट्रॉनिक ज्ञानसाधनांना सतत मागणी असणार आहे. आजही अमेरिका व इंग्लंड यांच्या नंतर इंग्रजी पुस्तकांच्या प्रकाशनात भारताचा नंबर लागतो. भारतातून आज मोठ्या प्रमाणावर पुस्तकांची निर्यात होते. अनेक बुक क्लब भारतीय भाषांमध्ये निघालेले आहेत; आणि त्यांना वाचक ग्राहकांचा स्थिर पाठिंबा मिळत आहे. जगातील नामवंत प्रकाशन संस्था भारतात आपली कार्यालये थाटण्यासाठी प्रयत्नशील आहेत. एकूण वातावरण निराशाजनक आहे असे मुळीच नाही.

दिवाळीच्या प्रसंगी हे सर्व लिहिण्याचे कारण एकच आहे. दिवाळीतील दीपज्योती अंध:कारावर मात करून आसमन्त लखलखीत उजळून काढतात. पुस्तकांच्या रूपातले मानवाचे पिढ्यानुपिढ्यांचे संचित व ज्ञान हे वर्तमान व भविष्यकालीन अंधारावर, अशुभ शक्तींवर मात करून एकविसाव्या शतकाकडे होणारी आपली वाटचाल प्रकाशमय व सुलभ करू शकेल. त्यासाठी प्रकाशनव्यवसायाने सर्व दृष्टींनी आपली ताकद वाढवली पाहिजे. पुस्तकांच्या निर्मितीत विविधता आणली पाहिजे, त्यांच्या वितरणाची व्यवस्था प्रगत देशांच्या पातळीवर नेली पाहिजे, सरकारदरबारी आपला आवाज ऐकला जाईल अशी संघटना उभी केली पाहिजे. या दिवाळीचा हाच संदेश आहे असे आम्हांला वाटते.

ही दिवाळी व नववर्ष आपणांस भाग्यशाली ठरो ही प्रार्थना.

दीपावली व नूतन वर्ष आमचे सभासद,
ठेवीदार ग्राहक व हितचिंतक यांना सुखसमृद्धीचे जावो!

इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

६१८ नवा सदाशिव पेठ, विश्रामबागवाड्याजवळ, पुणे-३०.

- आजच्या गतिमान जीवनात उद्याचे विस्मरण होऊ देऊ नका.
- बचत ही काळाची गरज आहे.
- उज्ज्वल व चिंतामुक्त भवितव्यासाठी विविध ठेव योजनांत आजच सहभागी व्हा.
- आमच्या ठेव योजना निश्चितपणे आपल्या उज्ज्वल भवितव्याची काळजी घेतील. आपणास आकर्षक व्याज मिळवून देतील.

आम्ही आमच्या खालील अठरा शाखांसह आपल्या सेवेस सदैव तत्पर आहोत :

शाखा : मुख्य शाखा : इचलकरंजी, भेंडे गल्ली-कोल्हापूर, शिरोली, जयसिंगपूर, पेठ वडगाव, गांधीनगर, शाहूपुरी-कोल्हापूर, इंडस्ट्रियल इस्टेट-इचलकरंजी, मुंबई, पुणे, हुपरी, गारगोटी, गडहिंग्लज, आजरा, कराड, सांगली, सुळकूड, गावभाग इचलकरंजी

जे.एन्. शाळगावकर — *जनरल मॅनेजर*
जी.टी. शिंदे — *व्हा. चेअरमन*
ए. बी. सौंदत्तीकर — *चेअरमन*

With Best Compliments from

MP CARDS

WHOLESALERS - VISITING CARDS
Shop No. 6B, 530, Shaniwar Peth, Yashovinayak Apts,
Pune - 411030. **TEL.: 491457**

CALL US FOR :

- ✔ **Four Colour Wall Calendars**
- ✔ **Four Colour Products Brouchers**
- ✔ **Printed Computer Stationery**
- ✔ **All kinds of Printing Jobs**

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

सुयोग प्रकाशनाचं

नवे कोरे आणि १५०वे पुस्तक प्रसिद्ध झाले!

राजीव बर्वे यांचा कवितासंग्रह

मोहरलेले क्षण

"या कवीच्या अनुभूतींच्या मोत्यांची ही माळ ओघळली तर त्यातील मणी न् मणी इतस्ततः पसरतील; परंतु एकत्र करून पुन्हा हेच मणी एका दोऱ्यात ओवले तर फिरून ते मणी हारामध्ये 'स्वस्थानी' असलेले जाणवेल. अबोध मनाच्या चिंतनातून निर्माण झालेल्या या कविता, कवीला जाणवलेले मोहरलेले क्षण - शब्दबद्ध होण्यातच धन्यता मानतात."

–गंगाधर महाम्बरे यांच्या प्रस्तावनेतून

मोहरलेले क्षण *राजीव बर्वे*

- कवितासंग्रहाचे प्रत्येक पान ब्राईट कोट आर्ट पेपरवर
- प्रत्येक पानावर चाररंगी सुरेख चित्र
- पाहताक्षणीच घ्यावासा वाटणारा, आपले ग्रंथदालन समृद्ध करणारा हा अप्रतिम कवितासंग्रह आपल्या संग्रही हवाच.

मूळ किंमत रु. २०० ■ सवलतीत रु. १५०

(कोणत्याही बुकसेलर्सकडे मागा किंवा लिहा)

⇩

सुयोग प्रकाशन

प्लॉट नं. ५४ विश्वकर्मा सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे - ४११०३८.

With Best Compliments from

Contact Person :
Kalika Patankar

Hallmark Enterprises

MANUFACTURERS OF
PRINTED CIRCUIT BOARDS

OFFICE :
39, Shiv Krupa, Vivekanand Society,
Sant Nagar, Pune - 411009.
Phone : 522929

FACTORY :
47/30, Ameya Housing Society,
Aranyeshwar, Pune - 411009.
Phone : 520958

'झोंबी'ची निर्मिती

आनंद यादव

'झोंबी' आत्मचरित्रात्मक कादंबरीचे लेखन करावंसं वाटू लागलं त्याला एक तात्कालिक पण महत्त्वाचं निमित्त - कारण घडलं. १९७८च्या आसपास मी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून भरपूर हिंडत होतो. व्याख्यानं, परिसंवाद, चर्चासत्रे या निमित्तानं मी जरी ग्रामीण विभागात जात असलो तरी एक ग्रामीण साहित्यिक म्हणून वर्तमान ग्रामीण समाज-वास्तव समजून घेण्याची मला सतत निकड भासत असे. मराठी माणूस या नात्यानं मी ग्रामीण महाराष्ट्र पाहिला पाहिजे, असंही वाटत होतं. या हेतूनं मी फिरताना पुनःपुन्हा माझ्या लक्षात येत होतं की ग्रामीण तरुण पिढी शिक्षणाविषयी, एकूण जीवनाविषयी उदास, निराश होत चालली आहे. त्याला सामाजिक, राजकीय, आर्थिक कारणे बरीच होती. 'एवढे शिकूनही नोकऱ्या मिळत नाहीत, लाच दिल्याशिवाय कॉलेजात प्रवेश नाही, भरपूर लाच दिल्याशिवाय नोकरी नाही. एवढा प्रचंड पैसा लाच देण्यासाठी आणायचा कोठून? आणि शिकायचं तरी कशासाठी? त्यापेक्षा जमेल ते काळे-पांढरे उद्योग करावेत,' असा उद्विग्न विचार ही पिढी चिडून - चवताळून करत होती. तिचा नैतिक अधःपात होईल की काय, अशी भीती वाटत होती.

मला वाटत होते की नोकरी नाही मिळाली तरी तरुण पिढीने शिकले पाहिजे. नोकरी आणि शिक्षण यांची सांगड घालता कामा नये. शिक्षणाने माणूस शहाणा होतो. त्याला ज्ञान आणि प्रतिष्ठा मिळते. तो स्वतंत्र, संतुलित विचार करू शकतो. त्यातूनच त्याला जीवन व वर्तमान समाजस्थिती कळते. त्यामुळे अंतिमतः तो जीवनात यशस्वी होऊ शकतो. सध्या दुबळ्या घटकांना शिक्षण मोफत मिळत असल्याने त्याचे महत्व कळत नाही. पण ते मुळात अतिशय महत्वाचे आहे. माणसाला पशुत्वातून माणुसकीत आणून सोडणारे आहे. म्हणून काही झाले तरी शिकले पाहिजे. - असा विचार मी मांडत होतो.

असे विचार मांडता मांडताच मला वाटू लागले की माझे स्वतःचे जीवन हेच माझ्या विचारांचा दृष्टान्त होऊ शकते. आपण ते आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या

रूपाने मांडावे. त्याचा प्रभाव तरुण पिढीवर पडू शकेल, म्हणून आत्मचरित्रात्मक कादंबरी लेखनाचा विचार करू लागलो होतो.

योगायोगाने १९८० साली पुण्यातील 'रसिक' वार्षिकाच्या दिवाळी अंकासाठी मी 'लघुकादंबरी' लिहावी, असे श्री. राजेन्द्र बनहट्टी यांचे निमंत्रण आले. मी मान्यता दिली. पण आत्मचरित्रात्मक कादंबरी असेल याचीही त्यांना पूर्वकल्पना दिली. त्यांना ती आवडली आणि मी जुलैमध्ये (१९८०) लेखनाकडे वळलो. 'झोंबी' या नावाने ती 'संपूर्ण लघुकादंबरी' म्हणून प्रसिद्ध झाली. वस्तुतः आजच्या 'झोंबी' पुस्तकामधील तो फक्त पहिला भाग होता. नंतर १९८१च्या 'रसिक' दिवाळी अंकातच दुसराही भाग 'जिद्द' या नावाने 'संपूर्ण लघुकादंबरी' म्हणूनच प्रसिद्ध झाला. नंतर १९८२च्या 'बागेश्री' (मुंबई) दिवाळी अंकात तिसरा भाग 'फरपट' या नावाने 'संपूर्ण लघुकादंबरी' म्हणूनच प्रसिद्ध झाला. - प्रसिद्ध झालेले हे तीनही भाग दिवाळी अंकांसाठी करावयाच्या घाईगर्दीच्या काळात केलेली केवळ पहिली लेखने होती. त्यामुळे त्यांना खूप मर्यादा पडल्या होत्या.

हे तीन भाग म्हणजे माझ्या आयुष्याचा पहिल्या वीस वर्षांचा काळ होता. (१) बिगरी ते पाचवी, (२) सहावी ते सातवी, (३) आठवी ते अकरावी, असे हे तीन भाग होते. सारांश, प्रामुख्याने माझ्या बालपणावर आधारित हे लेखन होते.

बालपणात मी माझ्या अवखळ, धाडशी स्वभावाला अनुसरून बेधडक वागत होतो; त्यामुळे इकडतिकडच्या अनेक घटना भिरभिरत्या मनाला आठवत होत्या. गल्लीतली अनेक खट्याळ पोरं आठवत होती. त्यांच्यांशी झालेल्या मारामाऱ्या, स्वीकारलेले पराभव आठवत होते. त्यांचे विशिष्ट स्वभाव आठवत होते. मला मदत करणारे, आवडते शिक्षक तर आठवत होतेच, पण चमत्कारिक स्वभावाचे इतर शिक्षकही आठवत होते. वैशिष्ट्यपूर्ण वडीलधारी माणसे आठवत होती. बायकांची भांडणे आठवत होती. पुष्कळ पुष्कळ आठवत होते. हॉटेलचे ग्रामोफोन ऐकणे, चोरून अनेक चित्रपट पाहणे, चित्रपट पाहताना प्रत्येक वेळची तिकिटाचे पैसे जमा करण्याची निरनिराळी पद्धत इत्यादी पुष्कळ आठवत होते. ते सर्व जसे आठवले तसे लिहीत गेलो.

प्रत्येक भाग 'संपूर्ण लघुकादंबरी' म्हणून

लिहिला गेला होता. त्यामुळे प्रत्येक भागाचे आरंभ आणि शेवट कादंबरीचे स्वयंपूर्णत्व दाखवू शकतील, अशा हेतूने लिहिले होते.

पण जेव्हा १९८४ साली मी संकल्पित 'झोंबी' या ग्रंथाविषयी विचार करू लागलो तेव्हा माझ्या निदर्शनास काही गोष्टी आल्या :

१) माणसाचा पहिला १५-२० वर्षांचा काळ हा अतिशय महत्त्वाचा असतो. या वयात त्याच्यावर झालेले संस्कार हेच नंतरच्या त्याच्या आयुष्याचे प्रामुख्याने नियंत्रण करत असतात. त्याच्यावरचे हे संस्कार अतिशय सखोल आणि जाणीव-नेणीवेच्या दोन्ही पातळ्यांवरचे असतात. म्हणून मी या काळातील माझ्या भोवतालचा परिसर, माझे गाव, त्याची जीवनशैली, ज्या शेतीच्या परंपरेत वाढलो त्या परंपरेचे स्वरूप, ज्या कुटुंबात वाढलो त्या व्यक्ती, त्यांचे-माझे नातेसंबंध, माझे घनिष्ठ मित्र, माझे शिक्षक, गावातील मला महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटना आणि या सर्वांना सामोरा जाणारा माझा विशिष्ट स्वभावाचा पिंड हे सर्वच मला लेखनात आणणे आवश्यक होते. पण लिहिलेल्या तीनही भागात वेधक रीतीने मी हे सर्व आणू शकलो नाही.

२) हे तीनही भाग ग्रंथात 'संपूर्ण लघुकादंबरी'च्या स्वरूपात घालून उपयोगाचे नाही. ते अलग अलग पडतात. ते एकजीव करण्यासाठी तीनही भागांच्या आरंभांची आणि शेवटांची प्रकरणे एक तर वगळून टाकली पाहिजेत किंवा पुढच्या भागांशी सुसंगत होतील, सलग होतील अशा पद्धतीने ती पुन्हा लिहून काढली पाहिजेत.

३) १९७५ ते १९८१ या पाचसहा वर्षांत कादंबरी लेखनाबरोबरच मी ललित लेखही लिहीत होतो.

नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या तीनही भागांवर या माझ्या ललितलेखांच्या भाषाशैलीचा काहीसा असर होता. ही भाषा लालित्यात विशेष रमणारी, क्रीडाशील प्रकृतीची, तरल संवेदनांच्या अंगाने सौंदर्याचा वेध घेऊ पाहणारी, आत्मनिष्ठेकडे अधिक झुकणारी होती. ललितलेखांच्या या भाषेचा प्रभाव काढून टाकणे जरूर आहे, असे लक्षात आले.

४) आत्मचरित्र हा जीवनातील केवळ सौंदर्याचा वेध घेणारा प्रकार नाही; तो प्रत्यक्ष जगलेल्या जीवनातील अनेकपदरी वास्तव आणि नाट्य वस्तुनिष्ठपणे व्यक्त करणारा प्रकार आहे. जीवन जगलेल्या 'मी'च्या चिंतनशील, गंभीर वृत्तीला सामोरा जाणारा हा कठोर वास्तववादी प्रकार आहे. त्यामुळे ललितरम्य भाषा टाळून अलिप्त, वस्तुनिष्ठ प्रकृतीची, निवेदनशील वृत्तीची भाषा स्वीकारूनच पुनर्लेखन करावे लागेल.

५) हे तीन भाग माझ्या जीवनाच्या वीस वर्षांच्या पहिल्या टप्प्याचेच होते. विसाव्या वर्षी मी गाव सोडले. तोवर ग्रामीण बोलीचे संस्कार विशेष होते. म्हणून संकल्पित दुसरे लेखन नागर-ग्रामीण बोलींच्या मिश्र शैलीत केले पाहिजे, तसे लेखन करण्याची दक्षता घेतली पाहिजे, असे वाटले.

६) दरम्यान म्हणजे १९८३ सालाच्या

'विशाखा'च्या दिवाळी अंकात मी एस.एस.सी.नंतरच्या (महाविद्यालयाच्या) पहिल्या वर्षाचा माझ्या रत्नागिरीतील काळ 'वरचे वारे' या नावाने 'संपूर्ण लघुकादंबरी' म्हणून प्रसिद्ध केला होता.

तो लिहितानाच माझ्या असं लक्षात आलं होतं की या भागातील वातावरण व संदर्भ हे अगोदरच्या तीनही भागांतील वातावरण आणि संदर्भ यांच्यापेक्षा एकदम वेगळे आहेत; आपल्या आयुष्याचा इथं दुसरा टप्पा सुरू होतो आहे. तेव्हा जीवनातील विविध टप्प्यांचाही विचार केला पाहिजे.

वरील सर्व गोष्टी लक्षात आल्यावर मी अधिक गंभीर झालो. संकल्पित 'झोंबी'सह येथून पुढे होणारे आत्मचरित्राचे सर्वच लेखन अधिक अभ्यासपूर्वक, अधिक विचारपूर्वक आणि अधिक मन:पूर्वक केले पाहिजे, याची जाणीव झाली.

आतापर्यंत माझी वीसभर पुस्तके लिहून झाली होती. ती विविध प्रकारची होती. एखादी साहित्यकृती निर्माण करण्यापूर्वी तिची पूर्वतयारी कशी करावयाची असते, कोणकोणत्या प्रकारची दक्षता घ्यावयाची असते, याचा बराचसा अनुभव माझ्या पदरी होता. काळजीपूर्वक पूर्वतयारी करण्यास जणू मी सरावल्यासारखा झालो होतो. साहित्यिक म्हणून ते माझ्या अंगवळणी पडले होते.

अर्थात आत्मचरित्र हा प्रकार मी यापूर्वी कधी हाताळलेला नव्हता. मात्र ललित गद्याचा पीएच.डी संशोधनासाठी अभ्यास करताना आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचा मला तुलनेसाठी काही अभ्यास करावा लागला होता. त्यामुळेही आत्मचरित्राचा थोडाबहुत तात्त्विक अभ्यास केला होता आणि काही आत्मचरित्रे त्यासाठी वाचावीही लागली होती. पण का कुणास ठाऊक; १९५८ पूर्वीची मराठीतील 'स्मृतिचित्रे' (लक्ष्मीबाई टिळक) सोडता मला आत्मचरित्रे मनापासून आवडली नव्हती. याचा दोष माझ्याकडे आहे, माझ्या पिंडधर्माकडे आहे, याची मला पूर्ण जाणीव होती. पण हेही खरे की १९७० नंतरची स्त्रियांची, सिनेतारकांची, सिनेमा-नाटकांतील नट-नायकांची आत्मचरित्रे मला आवडली होती. 'बलुतं' (दया पवार), 'आठवणींचे पक्षी' (प्र. ई. सोनकांबळे) ही आत्मचरित्रात्मक लेखनेही मला आवडली होती. - 'झोंबी'चे पुनर्लेखन करण्यापूर्वी माझ्या या आवडानिवडीचा मला पुरेशा गांभीर्याने अभ्यास करून 'झोंबी'चे संकल्पित स्वरूप कसे असावे, हे निश्चित करावे लागणार होते.

म्हणून मी १९६० पूर्वीची काही निवडक आत्मचरित्रे पुन्हा एकदा वाचून अभ्यासली. ती प्रामुख्याने समाजसुधारक, विचारवंत, समाजाच्या एखाद्या कार्यक्षेत्रातील प्रतिष्ठित प्रौढ-प्रकृती मंडळींची होती. त्यांचे स्वरूप एखाद्या तत्कालीन चरित्र-ग्रंथासारखे होते. ही आत्मचरित्रे त्या त्या व्यक्तींच्या कार्याचा परिचय करून देणारी, समाजसुधारणेची दिशा दाखविणारी, सुधारणांवर भाष्य करणारी,

जीवनाच्या आधुनिक मूल्यांचा व आधुनिकतापूर्व मूल्यांचा मेळ घालणारी व नव्या विचारांची मांडणी करणारी होती. नायकाच्या स्वजीवनाचा अन्वयार्थ वैचारिक पातळीवर सांगणारी आणि आपल्या त्या विचारसूत्रांसाठी स्वजीवनातील घटना, प्रसंग, अनुभव यांचा उदाहरणांसाठी, दृष्टान्त–दाखला देण्यासाठी वापर करणारी होती. त्यामुळे विचारसूत्रे प्रमुख स्थानी आणि घटना, प्रसंग, अनुभव गौण स्थानी अशी त्यांची अवस्था होती. सारांश ही आत्मचरित्रे नायकांच्या स्वजीवनाची वैचारिक मीमांसा करणारी होती. त्यांत वैयक्तिकतेला, खाजगीपणाला कमी अवसर होता व व्यक्तींच्या सार्वजनिक, सामाजिक जीवनाला जास्त अवसर होता. त्यामुळे ती आत्मचरित्रे प्रबोधनाच्या हेतूने लिहिलेली वाटत होती. स्वजीवनाचा वैचारिक परिपाक द्यावा, असा त्यांचा हेतू असे. आत्मचरित्राचे हे स्वरूप मला मानवणारे नव्हते. दलित आत्मकथांतीलही दोनतीन अपवाद सोडले तर ते लेखन नेहमीच एकारलेले, पवित्रा घेतलेले, जीवनाच्या पहिल्याच टप्प्यात थांबलेले वाटल्याने मला उपयुक्त ठरणारे नव्हते. म्हणून मी त्यांचाही नाद सोडून दिला.

१९७०नंतरची मध्यमवर्गीय स्त्रियांची, सिनेतारकांची, सिनेमा–नाटकाशी संबंधित व्यक्तींची व नटनायकांची निवडक आत्मचरित्रे पुन्हा अभ्यासण्याच्या दृष्टीने वाचून काढली. ती आवडत होती याचे कारण त्यांचा हेतू 'प्रबोधन' हा नाही, हे जाणवले. ही आत्मचरित्रे लिहिणारी माणसे 'आपल्यातली' वाटली. मानसिकदृष्ट्या जवळची वाटली. जीवनातील सुखदु:खांच्या, यशापयशांच्या गोष्टी, जीवनातील आनंदाचे, नाट्यात्मतेचे, काव्यात्मतेचे क्षण रंगून सांगण्यात त्यांना मजा वाटते; जीवनाचे 'वैचारिक सार' काढण्यापेक्षा जीवनाची हकीकत आणि तिच्यातील भलेबुरे अनुभव व चित्तरकथा सांगणे, यातच त्यांना धन्यता वाटते, असे जाणवले. – हे सगळे वाचनीय, सुरस–सरस असले तरी एकपदरी हकीकतीच्याच पातळीवर राहते, हेही लक्षात आले.

मला माझ्या आत्मचरित्रात अशी एकपदरी हकीकत लिहायची नव्हती. मी साहित्यिक होतो. समीक्षक–प्राध्यापक होतो. समाज आणि व्यक्ती यांच्या संबंधांचा मी माझ्यातील साहित्यिकाला आवश्यक तेवढा मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय अभ्यास केला होता. साहित्यनिर्मिती हे माझे महत्त्वाचे कार्यक्षेत्र होते. या सर्वांचा उपयोग माझ्या आत्मचरित्राचे स्वरूप निश्चित करताना मला झाला. '...ललित साहित्याचा प्रमुख हेतू जीवनदर्शन घडवणे हा असतो. तेव्हा आपण जे जीवन जगलो त्याचे सर्वांग दर्शन आत्मचरित्रात घडवावे. त्याची हकीकत होता कामा नये; ते वाचकाच्या मनासमोर साक्षात् उभे राहिले पाहिजे, त्यात चैतन्य जाणवले पाहिजे. त्याचे काय सार काढायचे असेल, त्याच्यापासून जो काही प्रबोधक संदेश घ्यावयाचा असेल किंवा त्या जीवनावर

जे काही भाष्य करावयाचे असेल ते त्या वाचकाने आपल्या प्रकृतीनुसार जरूर करावे. आपण ते आपल्या आत्मचरित्राच्या बाहेर ठेवायचे. वास्तववादी कादंबरीची असते तशी आपण आपल्या आत्मचरित्राची प्रकृती ठेवायची –असा निर्णय मी मनाशी घेतला.

हा निर्णय घेताना वाचलेली आत्मचरित्रे आणि त्यांच्याविषयीची माझ्या मनात निर्माण झालेली प्रतिक्रिया यांचा मला भरपूर उपयोग झाला, हे उघडच आहे. अर्थात माझ्यातील चिंतनशील साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यावर विशेष होता, हेही माझ्या लक्षात आले. मी या काळात कादंबरीलेखनाकडून आत्मचरित्राकडे वळत होतो, हेही कारण असू शकते.

आत्मचरित्राच्या लेखनाच्या स्वरूपाचा निर्णय मनाशी झाल्यावर मी संपूर्ण आत्मचरित्राचा मूळ ऐवज किंवा कच्ची सामग्री याचे स्वरूप तपासण्याकडे वळलो. माझ्या जीवनाचे उघडउघड चार टप्पे दिसत होते.

१) जन्मल्यापासून वीस वर्षे गावातच होतो. पाच एक हजार वस्तीचा गाव. अगोदर तो जहागीर, मग संस्थान, त्यानंतर तालुका अशा अवस्थेतून गेलेला. एस.एस.सी.पर्यंतच्या शिक्षणाची सोय गावातच होती. त्यामुळे एस.एस.सी. होईपर्यंत गावातच होतो.

२) एस.एस.सी. झाल्यावर गाव सोडलं, घर सोडलं. एकट्याच्या जिवावर मदतीसाठी धडपड करत रत्नागिरी, कोल्हापूर, पुणे इथं एम.ए.पर्यंतचं शिक्षण घेतलं. या काळात माझं गाव, घर, शेती यांच्यापेक्षा वेगळ्या संस्कृतीत वाढलो. ही संस्कृती नागर, मध्यमवर्गीय, सुशिक्षित, पांढरपेशी, वसतिगृहवासिनी अशी होती. या सर्वांचे माझ्यावर संस्कार झाले. माझा काहीसा शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, मानसिकदृष्ट्या विकास झाला. जीवनाचा हा दुसरा टप्पा होता.

३) तिसऱ्या टप्प्याच्या आरंभी मी प्राध्यापक होतो. नोकरी मिळाली होती. घरातला सर्वांत मोठा मुलगा असल्यामुळे गावाकडच्या घरादाराच्या, भावंडांचा विकास करण्याची जबाबदारी माझी होती. परंपरेनं ही रीत संस्कृतीत चालत आलेली आणि मी ती स्वेच्छेने स्वीकारलेली होती; कारण भावंडं, घरदार यांच्यांत माझाही जीव गुंतलेला होता. १९६१साली स्वीकारलेली ही जबाबदारी १९७८साली पूर्ण झाली. सर्वात शेवटचं भावंड शिकून नोकरीस लागलं आणि त्याचं लग्नही झालं. वडिलांचा संसार मी अशा रीतीनं वडिलांच्या देखतच मार्गी लावला. योगायोगाने त्याच वर्षी वडिलांचं निधन झालं नि त्यांचा संसार संपुष्टात आला. इथं माझ्या जीवनाचा तिसरा टप्पा पूर्ण झाला.

४) चौथ्या टप्प्यावर मी १९८० च्या आसपास उभा होतो. गावाकडच्या जबाबदारीतून मी मनाने मोकळा झालो होतो. माझ्या संसाराकडे मला आता संपूर्ण लक्ष द्यायचं होतं. कॉलेजच्या नोकरीतून

मुक्त होऊन पुणे विद्यापीठात प्रपाठक म्हणून मी गेलो होतो. त्यामुळे माझ्या भोवतालच्या शैक्षणिक वातावरणात गुणात्मक बदल झाला होता. माझ्या मुलांच्या शिक्षणाची माझी जबाबदारी वाढली होती. माझ्या साहित्यनिर्मितीला अधिक गती आली होती. एकूणच ग्रामीण समाजाचे प्रश्न वाढून कोंडी झाली होती. आणीबाणी नुकतीच येऊन गेली होती. तरुण ग्रामीण सुशिक्षित पिढीचा फार मोठा भ्रमनिरास झालेला पाहत होतो. अस्वस्थ होऊन ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करावी असे मला वाटू लागले होते. हा माझ्या आयुष्याचा चौथा टप्पा होता. वय ५०च्या आसपास होतं. वयाच्या साठाव्या वर्षी मी निवृत्त होणार होतो. निवृत्तीनंतर पुढं काही विशेष करता येईल असं वाटत नव्हतं. म्हणून १९८४सालीच संकल्पित चौथा टप्पा हा आत्मचरित्राचा शेवटचाच टप्पा असेल असं वाटत होतं.

१९८४साली मनात आत्मचरित्राच्या पुनर्लेखनाचा विचार जेव्हा येऊ लागला तेव्हा त्याचे असे चार टप्पे मनोमन कल्पिले. या चार टप्प्यांचे चार खंड पूर्ण होतील तसे प्रसिद्ध करायचे की चारही खंड एकदम प्रसिद्ध करायचे, याचा निर्णय मनोमन होत नव्हता. अगोदर 'झोंबी'चे पुनर्लेखन तरी पूर्ण करू; नंतर त्याचा विचार करता येईल, असे ठरवले

प्रत्यक्ष पुनर्लेखन करताना वर सांगितलेल्या पाचसहा गोष्टी मनासमोर ठेवल्या होत्या. त्यामुळे पहिल्या लेखनाचा चेहरामोहरा पार बदलून गेला. कारण संकल्पित 'झोंबी' ग्रंथाच्या अनुभवविश्वात नवी भर पडली. त्यामुळे आशयाचे परिमाण बव्हंशी बदलून गेले. प्रत्येक भागाच्या आरंभ-शेवटाची प्रकरणे बदलली आणि तीन भागांतील अनुभव-आशय एकजीव केला. भाषेचे स्वरूप बदलल्यामुळे बहिरंगही बदलले. अनुभवाकडे पाहण्याचा दृष्टिकोण लालित्यपूर्ण न ठेवता वास्तववादी ठेवल्याने सर्व लेखनातील खेळकर वृत्ती जाऊन त्याला गांभीर्य प्राप्त झाले. माझे जीवन विशद करताना मी पूर्णतः गंभीर आहे, याचा प्रत्यय ते पुनर्लेखन वाचताना येऊ लागला. पुनर्लेखनात 'झोंबी'ची भाषा बोली-बहुल झाली. संकल्पित अखंड 'झोंबी'चे बाड खूप मोठे झाले. ते लिहिण्यात बराच काळ गेला.

हे पुनर्लेखन प्रा. गं. ना. जोगळेकर, प्रा. अरविंद वामन कुलकर्णी, प्रा. सुधाकर के. भोसले, विद्यार्थी मित्र श्री. शरद फटांगरे यांना वाचण्यास दिले. त्यांनी काही सूचना केल्या. त्यानुसार जागोजागी कात्री लावली. त्यांनी दाखविलेल्या त्रुटी भरून काढल्या. त्यातून तिसरे लेखन झाले. हे तिसरे लेखन संपूर्ण अथपासून इतिपर्यंत करावं लागलं नाही. अधेमधे कमीजास्त प्रमाणात करावं लागलं.

सवयीप्रमाणं चारएक महिने ते बाजूला ठेवले. दुसऱ्या उद्योगांकडे वळलो. याकाळात ग्रामीण साहित्याची चळवळ जोरात होती.

भटकंती खूप करावी लागत होती. त्यामुळे 'झोंबी'च्या बालविश्वातून बाहेर पडावंच लागलं.

पुढे चारएक महिन्यांनी अंतिम वाचनासाठी मी ते हाती घेतलं. वेधक झालं आहे असं वाटलं. पण ही वेधकता माझ्याच बालपणात मी रमतो आहे म्हणून वाटते की तो लेखनाचा गुणधर्म म्हणून वाटते, याचा निर्णय मला घेता येईना. माझी वाचनातील अलिप्तता सतत ढळत होती आणि मी बालपण-विवश होत होतो. आपण काही वाचतो आहे, हे विसरून माझ्या बालपणातच रंगून जात होतो. – अशा अवस्थेतच ते श्री. पु. ल. देशपांडे आणि सौ. सुनीताताई देशपांडे यांच्याकडे वाचण्यासाठी आणि प्रस्तावनेसाठी दिले.

भाई उद्योगात होते. प्रस्तावना लिहिण्यास त्यांनी मान्यता दिली होती. पण 'पाचसहा महिने तरी लागतील. मी एन.सी.पी.ए.च्या कामात खूप बुडून गेलो आहे.' असे म्हणाले होते. ऑक्टोबर १९८६च्या दुसऱ्या पंधरवड्यातील ही घटना होती. भाई कामात बुडून गेले होते, ही गोष्ट खरी होती. नॅशनल सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट, मुंबई, या संस्थेचे ते संचालक होते. रात्रंदिवस तिथेच राहून खूप संस्मरणीय गोष्टी त्यांनी तिथे केल्या. त्यांच्या कामांची गर्दी सुरू होती. म्हणून मी भाईंना म्हणालो; 'वर्ष लागलं तरी चालेल. चार-सहा ओळींची लिहिली तरी चालेल, पण प्रस्तावना तुम्ही लिहिणे मला महत्त्वाचे वाटते.' असे म्हणून मी निघून आलो. त्यानंतर मधे दोनच दिवस गेले आणि भाईंचा पुणे विद्यापीठात मला फोन आला. "डिपार्टमेंट सुटल्यावर जाताना माझ्याकडे येऊन जा रे." ते म्हणाले.

"जरूर येतो. काय विशेष?" मी.

"प्रस्तावना लिहिली आहे!" भाई.

मी उडालो!

"लिहिलीही! किती? चार की सहा ओळी?"

"ये तरी खरा. माझ्या हस्ताक्षरातली सव्वीस पाने झाली आहेत."

मी चकित झालो आणि थक्कही झालो. हस्तलिखित ज्या संध्याकाळी मी देऊन गेलो त्या रात्रीच भाई अंथरुणावर पडल्यापडल्या स्क्रिप्ट चाळू लागले. चाळता चाळता त्यांची समाधी लागली. त्या वाचनासमाधीतच रात्रभर फुलस्केप पाचशे पृष्ठांचे स्क्रिप्ट त्यांनी वाचून काढलं. दुसऱ्या दिवशी मुंबईला जायचं रहित करून त्यांनी झपाट्यानं दीर्घ प्रस्तावना लिहून काढली. 'झोंबी'चे अंतिम लेखन वेधक झाल्याची वस्तुनिष्ठ पावती भाईंकडून अशी नाट्यपूर्ण रीतीने मला मिळाली. मी हरखून गेलो. 'झोंबी'च्या लेखनासाठी घेतलेल्या कष्टाचे चीज झालं, असे वाटले. प्रसिद्धीनंतरच्या काळात वाचक-समीक्षक-रसिकांनी उदंड प्रतिसाद देऊन 'झोंबी'चे लेखन वेधक झाले असल्याचे पत्रे-परीक्षणांच्या द्वारे कळविले. माझ्या अपेक्षेप्रमाणे 'झोंबी'ची निर्मिती साधली, याचा तो पडताळा होता. ■

आवर्जून वाचावें असे...

"डॉ. आनंद यादव ह्या नावाने साहित्यक्षेत्रात बोलबाला झालेल्या लेखकाने आपली आई, वडील, ढीगभर भावंडे, आप्त, शाळूसोबती, बरेवाईट शिक्षक ह्या साऱ्यांना आपल्या स्मृतिकोषात किती कसोशीनं जपले होते, याचे प्रत्यंतर त्या बालजीवनातले बारीक सारीक तपशील पाहिल्यावर येते.

आनंदला त्या होरपळीची कथा लिहिण्याचे देणे लाभले. सारी दुःखे भोगत असताना, अंगावर माराचे वळ उमटत असताना आपण कविता लिहावी, शाळेत उत्तम निबंध लिहावा, कथा लिहाव्यात-थोडक्यात म्हणजे; ग्रंथाच्या जगात वावरावे असे वाटायला लावणारी ही एक प्रकारची भूतबाधाच असते. आनंदला ती जडली. ग्रंथ नावाच्या वस्तूला जिथे अजिबात थारा नव्हता, अशा वातावरणात त्याला ही साहित्यनिर्मितीची भूतबाधा झाली आणि झाड फुलून आले. आज आनंद, साहित्यनिर्मितीमुळे लाभलेल्या यशाच्या एका उंच पायरीवरून; साहित्याच्या भुताने, झपाटलेल्या आणि उपेक्षेच्या अंधारातून प्रकाशाकडे झेपावणाऱ्या, ग्रामीण भागातल्या मुलांना हात देण्याच्या कार्यात गुंतलेला आहे.

साऱ्या जगातलं साहित्य समृद्ध केलं आहे ते ह्या 'झोंबी'सारख्या वाचकाला अस्वस्थ करणाऱ्या ग्रंथांनीच!"

पु.ल. देशपांडे (प्रस्तावनेतून)

झोंबी *डॉ. आनंद यादव*

पृष्ठे : ४०४ **किंमत : एकशेपंचवीस रुपये**

दीपावली व नूतन वर्ष सर्वांना सुखसमृद्धीचे जावो!

गौरवास्पद भारतीय विचार परंपरेचा पहिलाच साद्यंत इतिहास

भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास

डॉ. ग. ना. जोशी

- सुमारे ५७०० पृष्ठ संख्या - एकूण १२ खंड
- कोणत्याही भाषेत आतापर्यंत उपलब्ध नाही असा भारतीय तत्त्वज्ञानाचा विस्तृत व समावेशक इतिहास
- जागतिक कीर्तीचे महान पंडित डॉ. रा. ना. दांडेकर यांचा 'आमुख' (प्रस्तावना) स्वरूप आशिर्वाद लाभलेला ग्रंथ
- **खंडवार किंमत रु. ४३२०/-**
- **संपूर्ण संचाची किंमत रु. ४०००/-**

⇩

शुभदा सारस्वत प्रकाशन

६७ पाटील इस्टेट, पुणे-४११००५.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

लवकरच प्रकाशित होत आहे....

सातारचे सुपरिचित वैद्य सुयोग दांडेकर लिखित

पथ्यकर तरीही रूचकर

''आपल्या कुटुंबातील कोणीही आजारी पडू नये यासाठी त्यांना काय खाऊ घालावे व कोणी आजारी असल्यास त्याला त्याच्या रोगानुरूप काय खायला द्यावे याची सोपी कृती व गुणधर्म सांगणारे पुस्तक''

किंमत - रु. १००/- प्रकाशनपूर्व सवलत रु. ८०/-

खास वैशिष्ट्ये

- आयुर्वेद
- सुलभ, व्यावहारिक मराठी भाषा
- वरणभातापासून, पुरणपोळीपर्यंतचे एकूण १८५ खाद्यपदार्थ
- गहू, तांदूळ, इ. धान्ये, कडधान्ये, डाळी, फळभाज्या, पालेभाज्या, दूध, तूप, इ. सर्व कच्च्या पदार्थांचे ग्रंथोक्त गुणधर्म
- बँका, एल.आय.सी.कर्मचारी, व्यापारी इ. व्यवसायानुरूप काय खावे?
- ऋतु, प्रकृती, जन्मतारीख इ. अनुरूप काय खावे?
- जाडी कमी करणे, वीर्यवृद्धी, मुलांची बौद्धिक वाढ करणे इ.साठी काय खावे?
- सर्दीपासून पॅरेलिसिसपर्यंत कोणताही रोग बरा करण्यासाठी मदत म्हणून काय खावे?
- स्त्री हा कुटुंबाची आरोग्यरक्षक असे समजून लिहिलेले पुस्तक
- आयुर्वेदाचार्य वैद्य सुयोग दांडेकर यांच्या अनुभवातून व सिद्धहस्त लेखणीतून उतरलेला, समाजाच्या आरोग्यासाठी उपयुक्त आरोग्यग्रंथ

संपर्कासाठी पत्ता : **वैद्य सुयोग सुभाष दांडेकर** *आयुर्वेदाचार्य*
साईमाऊली चिकित्सा मंदिर, 'परळे संकुल', राधिका टॉकीजजवळ,
सातारा. **फोन : २२४२९, ३४०६३**

T Book Club

ग्रंथप्रेमींसाठी आकर्षक योजना

या बुक क्लबचे सभासद २० रुपये भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासद झाल्यास ही पुस्तके आपण निम्म्या किंमतीत मिळवू शकता. जसजशी पुस्तके प्रकाशित होतील, तसतशी आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाईल. आपण ही सर्व सहाही पुस्तके घ्यावयाची आहेत.

T बुक क्लब-८ मधील पहिले पुस्तक उपलब्ध आहे.
गतिमान काळाच्या झंझावाती प्रवाहात वेगानं बदलत चाललेल्या स्त्री पुरुषांमधल्या नात्यांची अत्याधुनिक कहाणी

डिस्क्लोजर

मूळ लेखक : **मायकेल क्रिस्टन**
अनुवाद : **माधव कर्वे**

■ मूळ किंमत **रु. २२०.००** ■ सभासदांना **रु. ११०.०**
सभासद फी २०रु. व पोस्टेज १५रु. मिळून एकूण १४५रु. मनीऑर्डरने पाठवावे अथवा पुस्तक समक्ष येवून घेऊन जावे.

आतापर्यंतच्या बुक क्लब मधील उपलब्ध पुस्तके

पुस्तकाचे नाव	मूळ लेखक	अनुवाद
मध्यस्थ	फ्रेडरिक फोरसीथ	लीना सोहोनी
वाईल्ड कार्ड	रेमंड हॉकी/ रॉजर बिंग हॅम	अरुण मांडे
लव्ह स्टोरी	एरिक सेगल	अनिल इनामदार
सिटाडेल	ए. जि. क्रोनिन	मंगला निगुडकर
नो कम बॅक्स	फ्रेडरिक फोरसीथ	विजय देवधर
हे बंध वात्सल्याचे	हेरॉल्ड रॉबिन्स	योगिनी वेंगुर्लेकर
तू असा जवळी रहा	हेरॉल्ड रॉबिन्स	पद्मा अभ्यंकर
मुखवटे	ॲगाथा ख्रिस्ती	शर्मिला गाडगीळ
पाषाण	ॲगाथा ख्रिस्ती	शर्मिला गाडगीळ
नाईट	इली वायझेल	आशा कर्दळे
द मिरर क्रॅकड	ॲगाथा ख्रिस्ती	श्रीनिवास गुळवणी
हंट द मॅन डाऊन	विल्यम ह्यूमन	अरुण डावखरे
ट्रिनिटीज चाईल्ड	विल्यम प्राक्नो	अनिल काळे
साक्षी	सरला बार्नबस	स. वा. मुळे
सिटी ऑफ जॉय	डॉमिनिक लॅपिए	अनिल कुलकर्णी
नॉट विदाऊट माय डॉटर	बेट्टी महमूदी	लीना सोहोनी
द टर्मिनल मॅन	मायकेल क्रिश्टन	अरुण मांडे

कॉम्प्युटर : नवा मित्र

डॉ. बाळ फोंडके

आज आपणास संगणकाचा प्रभाव जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात जाणवतो आहे. दहा पंधरा वर्षांपूर्वी परिस्थिती वेगळी होती. त्यावेळी संगणक हा शब्दही तितकासा परिचयाचा झालेला नव्हता. त्याऐवजी इंग्रजीतील कॉम्प्युटर हाच शब्द अधिक ओळखीचा होता. त्याचाच सर्रास उपयोग होत असे. बागुलबुवाच्या जातकुळीतला तो आहे अशी भावना होत असे कारण ही जी काही चीज आहे, तिचा उपयोग फक्त आपल्याच आगळ्यावेगळ्या विश्वात रममाण होणाऱ्या वैज्ञानिकांपुरताच मर्यादित आहे अशीच सर्वसाधारण कल्पना होती. त्यामुळं ते काहीतरी अगडबंब, जटिल, अतिशय गुंतागुंतीचं, वापरासाठी वेगळ्याच प्रकारची कुशाग्र बुद्धीची गरज असणारं असं यंत्र आहे आणि त्याचा आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनाशी दूरान्वयानंही संबंध येण्याची शक्यता नाही, अशीच समजूत प्रचलित होती. एकंदरीतच विज्ञानाबद्दल आदरयुक्त भीती, प्रसंगी दहशतही वाटत असल्यामुळं साहजिकच तिचं प्रतिबिंब कॉम्प्युटरविषयीच्या भावनांमध्ये पडत असे. त्यावेळचे संगणकही खरोखरीच आकारानं मोठे, रचनेनं गुंतागुंतीचे, वापरासाठी खास प्रशिक्षणाची गरज असणारे आणि किंमतीनं सामान्य व्यक्तीला न परवडणारे होते. त्यामुळं हा संगणक आपल्या घरात येणं तर सोडाच, पण त्याची सावलीही आपल्या रोजच्या व्यवहारावर पडेल, याची सुतराम शक्यता वाटत नव्हती.

पण परिस्थिती झपाट्यानं बदलत होती. हा आज एखाद्या राक्षसासारखा वाटणारा, अनामिक भीती उत्पन्न करणारा संगणक घराघरात शिरणार आहे, जीवनाचा स्थायी घटक बनणार आहे, किमान काही व्यावसायिकांचं तर त्याच्याशिवाय पाऊलही कुठं पडणार नाही, एवढंच कशाला पण आपल्या जीवनशैलीतही कमालीचा बदल घडवणार आहे, याची चाहूल लागली होती. संगणकाचा आकार छोटा होत होता. तो ठेवण्यासाठी लंबंचवडं दालन असण्याची गरज राहिली नव्हती. लवकरच तो आपल्या घरच्या मेजावर राहू शकेल इतका छोटा होणार आहे, याची चिन्हं दिसू लागली होती. युरोपअमेरिकेत स्टीव्हन जॉबनं ॲपल नावाचा वैयक्तिक संगणक, पर्सनल कॉम्प्युटर,

बनवून बाजारातही आणला होता. त्याची किंमत तशी फारशी आवाक्याबाहेर नसल्यामुळं त्याला मागणीही बऱ्यापैकी होती. त्यामुळं उत्साहित होऊन त्याच्याच सुधारून वाढलेल्या आवृत्त्या तयार करण्यावर लक्ष केंद्रित होत होतं.

या ॲपलच्या शिरकावामुळं दुसरा अतिशय महत्त्वाचा बदल झाला होता. तोवर कॉम्प्युटरशी संवाद साधण्यासाठी एक वेगळीच भाषा वापरावी लागत असे. आपलं म्हणणं आपण आपल्या भाषेत सांगितल्यावर त्याचं संगणकाला समजेल अशा द्विमान गणिती भाषेत रूपांतर करण्यासाठी भाषांतरकारांची गरज भासत असे. एवढंच नाही, तर तो गणिती भाषेत संदेश संगणकापर्यंत पोचविण्यासाठी छिद्रांकित कार्ड किंवा तदसदृश अन्य माध्यमाची गरज असे. त्यामुळं संगणक वापरावासा वाटला तरी आपण त्याच्याशी थेट संवाद साधू शकत नव्हतो. ॲपलमध्ये संगणकाशी थेट संवाद साधण्यासाठी टंकलेखन यंत्रामध्ये, टाईपरायटरमध्ये असणाऱ्या कीबोर्डचाच वापर करण्याची सोय केली होती. त्यामुळं आपण आपलं म्हणणं आपल्याच भाषेत त्या कीबोर्डच्या मदतीनं थेट संगणकाला सांगू शकत होतो. यामुळं संगणकाबद्दल जवळीक निर्माण होत होती.

दैनंदिन जीवनात ज्यांच्याशी आपला संबंध येतो, अशा अनेक यंत्रणांनी हळूहळू संगणकाचा वापर करायला सुरुवात केली होती. आपलं आयुष्य पुढं कोणतं वळण घेणार आहे हे जिच्यावरून ठरतं, त्या शालान्त परीक्षेचा निकाल संगणकाच्या मदतीनं जाहीर व्हायला सुरुवात झाली होती. आपलं गुणपत्रक संगणकाच्या मदतीनंच तयार केलं जात होतं. विजेची, टेलिफोनची बिलं संगणकाकरवी तयार करून आपल्याकडे पाठवली जात होती. बँकांच्या व्यवहारात कॉम्प्युटरचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जावा, अशा शिफारशी केल्या गेल्या होत्या. जर कर्मचाऱ्यांनी इतरांप्रमाणेच त्यांनाही संगणकाबद्दल वाटणाऱ्या खऱ्याखोट्या भीतीपायी त्या प्रस्तावाला विरोध केला नसता, तर तोवर कदाचित त्या शिफारशी अंमलातही आणल्या गेल्या असत्या. मुख्य म्हणजे त्या वेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या देशात संगणकयुग आणण्याचा चंग बांधला होता. ते स्वत: तर त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर करत होतेच, पण सर्वच क्षेत्रात त्याचा संचार व्हावा या दृष्टीनं दूरगामी योजना आखून

त्यांची अंमलबजावणी व्हायलाही सुरुवात झाली होती.

त्यामुळं या संगणकाविषयी वाटणारी अनाठायी भीती घालवून त्याचा अनेक क्षेत्रात कसा वावर होऊ शकतो, हे समजावून, पटवून देणं आवश्यक आहे; समाजाच्या प्रगतीच्या दिशेनं तसं पाऊल उचलण्याची तातडीची गरज आहे, असं मला वाटू लागलं होतं. तोवर संगणकाविषयी शिक्षण देणाऱ्या अन्य संस्था निघाल्या होत्या गरज तसा पुरवठा या बाजाराच्या आधारभूत तत्त्वानुसार नव्या संस्था झपाट्यानं उभ्या राहू पाहत होत्या. परंतु या सर्व संस्थांमध्ये संगणकाच्या वापरासाठी लहानसहान आज्ञावल्या तयार करण्याचं किंवा आपल्या भाषेतला संदेश संगणकाच्या भाषेत रूपांतरित करण्याच्या कामाचंच (सॉफ्टवेअरचं) शिक्षण देण्यात येत असे. त्यामुळं ज्यांची संगणकाविषयीची भीती नाहीशी झालेली आहे व ज्यांना व्यावसायिकरीत्या संगणकाशी जवळीक साधायची आहे, अशांचीच सोय होत होती. सर्वसामान्य व्यक्तीला संगणकाविषयी वाटणारं दूरत्व कमी व्हायला मदत होत नव्हती.

त्यामुळं संगणकाविषयीचं अनाठायी भय दूर करून त्याच्याविषयी कुतूहल, उत्सुकता वाटायला मदत करणारं पुस्तक लिहावं ही कल्पना मनात रुजली. त्या त्या विषयाचा अभ्यास नसणाऱ्या सर्वसामान्य वाचकासाठी विज्ञानविषयक लेखन करताना त्यात सुबोधता आणण्याचा माझा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. त्यासाठी तांत्रिक तपशीलाचा फापटपसारा टाळून मूलभूत संकल्पना साध्या सोप्या भाषेत मांडण्याचा माझा प्रयत्न असतो. तसं करण्यासाठी ललित साहित्याची चौकट अधिक उपयुक्त ठरते, असाही माझा अनुभव होता. वाचक आपल्यासमोर बसला आहे, अशी कल्पना करून त्याच्याशी शिळोप्याच्या गप्पा माराव्या, अशा भाषेत लेख लिहिला तर तो वाचकाला भावतो आणि त्याच्या मनात विज्ञानविषयासंबंधी असणाऱ्या अडसरावर मात करतो. खेळकर भाषा वापरतानाच नेहमीच्या अनुभवातल्या घटनांचा उपमा देण्यासाठी किंवा साक्षात्कारासाठी वापर केल्यास वाचकाशी जवळीक साधता येते, असाही माझा अनुभव होता.

त्यामुळंच एकंदरीत पुस्तकाच्या शैलीचा ढाचा मनात तयार झाला. लेखनाला सुरुवात केल्यानंतर मात्र संगणकाच्या इतिहासाची तसंच त्याच्या कार्यक्षमतेची ओळख करून दिल्याशिवाय विविध क्षेत्रातल्या त्याच्या भरारीची आणि संभाव्य वापराची व्यवस्थित ओळख करून देता येणार नाही, हे दिसून आलं. त्यानुसार मग त्याही विभागांचा समावेश केला. निरनिराळ्या क्षेत्रातल्या संगणकाच्या घोडदौडीची ओळख व्हावी, या दृष्टिकोणातून संगणकाला थोडंसं मानवी स्वरूप देऊन संगणकच जणू लेखक, चित्रकार, डॉक्टर बनला आहे अशी कल्पना करून त्याच्या त्या क्षेत्रातल्या कामगिरीचा आढावा सादर केला.

ही विशिष्ट शैली स्वीकारल्यामुळं साहजिकच काही मर्यादा पडल्या. त्यामुळं काही गुंतागुंतीच्या किंवा समजावणं कठिण पडेल, अशा कामांना फाटा द्यावा लागला. ते योग्य आहे की नाही याचा निवाडा सुरुवातीला करता येईना. त्यावेळी मग तोपर्यंत झालेलं लेखन संगणकाविषयी बहुश: अजाण असणाऱ्या काहीजणांना दाखवून त्यात त्यांना काही त्रुटी वाटते का याचा अंदाज घेतला. त्यावरून हे स्पष्ट झालं की कोणत्याही एका क्षेत्रात संगणकाचा किती आणि कसा उपयोग होऊ शकतो, ज्याचा संबंध आपण सहसा संगणकाशी जोडणार नाही अशा क्षेत्रातही तो किती उपयोगी पडू शकतो याची चुणूक दाखवण्याच्या दृष्टीने दिलेली उदाहरणं पर्याप्त आहेत. विशिष्ट क्षेत्रातल्या संभाव्य उपयोगाचा समग्र आढावा देण्याची गरज नाही. वाचकाचं कुतूहल चाळवलं जाईल आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा उपयोग होऊ शकतो, तसं केल्यानं काही फायदे मिळू शकतात हे त्याच्या ध्यानात येईल इतपतच पुस्तकाचा आवाका ठेवणं योग्य ठरेल हे समजून आलं. तसं केल्यानं वाचकाचं मनोरंजन करता करता त्याला संगणक वापरायला उद्युक्त करता येईल हेही समजलं. आणि मूळ उद्देश तोच असल्यानं लेखनाची रंजकता कमी न करता देता येईल तितपतच माहितीची व्याप्ती ठेवणं रास्त होईल हेही पटलं. त्यानंतर मात्र शैलीच्या किंवा लेखनविस्ताराच्या बाबतीत कोणतीही अडचण आली नाही.

तरीही लेखनासाठी इतर दोन पैलूंबाबत काही अडचणी होत्याच. पहिली अडचण होती संदर्भांची. खरं तर त्याला अडचण हा शब्द तितकासा समर्पक नाही. कारण इंग्रजी भाषेत याविषयीचे कितीतरी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके आणि तांत्रिक अहवाल यांच्या रूपात उपलब्ध होते. मी त्या वेळी 'सायन्स टुडे' या मासिकाचं संपादन करत असे. त्याशिवाय त्यापूर्वी मी भाभा अणुसंशोधन केंद्रात संशोधन केलेलं असल्यामुळं तिथल्या संदर्भ ग्रंथालयातही जाऊ शकत होतो. त्यामुळं संदर्भांची उणीव नव्हती. पण त्या संभारातून हवा तो नेमका संदर्भ शोधून काढणं वेळ घेणारं होतं आणि अवघडही होतं. आज संगणकाच्या मदतीनंच हवा तो नेमका संदर्भ थोड्या वेळात शोधून काढणं सोपं झालं आहे. ती सोय त्यावेळी उपलब्ध नव्हती. त्यामुळं एका अर्थी ज्याला 'प्रॉब्लेम ऑफ प्लेन्टी', वैपुल्यानं उभी केलेली समस्या असं त्याचं वर्णन करता येईल, अशी अडचण उभी राहिली. त्यामुळं लेखन पूर्ण करायला अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागत होता.

दुसरी अडचण होती परिभाषेची. एकतर संगणकाचं क्षेत्र हे अतिशय वेगानं विकसित होणारं क्षेत्र होतं. त्यामुळं त्यात अक्षरश: नवनवीन शब्दांची भर पडत होती. यातले काही शब्द इंग्रजी भाषेत पूर्वीच रूढ झालेले होते. पण संगणकाच्या संदर्भात त्यांना आता वेगळाच अर्थ प्राप्त होत

होता. इंग्रजी भाषेत त्या नवीन अर्थालाही मान्यता मिळत होती. पण त्याचा परिचय मराठी भाषिकांना असणं शक्य नव्हतं. त्यामुळं तोच शब्द वापरायचा तरी त्याचा नेमका अर्थ वाचकापर्यंत पोचण्याची शक्यता नव्हती. उलट त्याचा गैरसमज होण्याचीच शक्यता अधिक होती. त्याला पर्यायी असा आणि तरीही बोजड किंवा क्लिष्ट नसलेला मराठी शब्द उपलब्ध तर नसेच पण घडवणंही अवघड होतं.

काही शब्द तर इंग्रजीतही नव्यानंच घडवले जात होते. त्यामुळं इंग्रजी भाषेशी जवळीक असणाऱ्यांनाही ते अनोळखी होते. मराठी भाषिकांना तर त्याचा अर्थबोधही झाला नसता. त्यांना पर्यायी शब्द शोधणं तर अधिकच कठिण होतं. त्यामुळं ते शब्द वापरण्याऐवजी त्यांच्या मागची संकल्पना समजून देण्याचा मार्ग चोखाळावा असा विचार केला. तसं करताना मग आपली नेहमीची ओळखीची भाषा वापरणं, उपमा आणि साक्षात्कार यांचा सढळ वापर करत ती संकल्पना स्पष्ट करणं शक्य झालं. ते झाल्यावर जिथं शक्य होतं तिथं त्या इंग्रजी शब्दाचीही ओळख वाचकांना करून दिली. पण ही तारेवरची कसरतच होती.

त्या बाबतीत माझे चित्रकार मित्र मुकुंद तळवलकर यांची मदत झाली. एक तर काही वेळा शब्द अपुरे पडतात त्यावेळी चित्रांची खूपच मदत होते. शिवाय तळवलकरांची चित्रं व्यंगचित्रशैलीतली असल्यामुळं खेळकर भाषेशी त्यांची चपखल जोडी जमली. या चित्रांमुळं पुस्तकाच्या रंगतीत भर पडली आहे असं मला वाटत.

पुस्तकाला वाचकांचा, समीक्षकांचाही चांगला प्रतिसाद लाभला. विज्ञानविषयक, खरं तर कोणतंही वैचारिक वाङ्मय ललित किंवा खेळकर भाषेत सादर करणं अनेक पंडित किंवा खानदानी समीक्षकांना पसंत पडत नाही. त्यांना असे प्रयत्न थिल्लरपणाचे वाटतात. त्यांना अर्थात हे पुस्तक फारसं आवडलं नाही. तसंच आपल्याच हस्तिदंती मनोऱ्यात बंदिस्त राहून संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकांना ते आक्षेपार्ह वाटलं नसलं तरी फारसं भावलंही नाही, परंतु सर्वसामान्य वाचकांचा मात्र त्याला चांगलाच प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे शासकीय परीक्षक मंडळाच्या सभासदांनाही ते पसंत पडलं आणि त्यामुळं राज्यशासनाचा पुरस्कारही त्या पुस्तकाला मिळाला.

विज्ञानविषयक उपयुक्त पुस्तके

मोहन सराफ
संगणकाची तोंडओळख

चंद्रसेन टिळेकर
गणकयंत्राचे अंतरंग
प्रश्नोत्तर गणकयंत्र

डी. एस्. इटोकर
वैज्ञानिक खेळणी
छंदातून विज्ञान

डॉ. अरुण मांडे
विज्ञान गमती
विज्ञान जमती

दीपावली व नूतन वर्ष सर्वांना सुखसमृद्धीचे जावो!

स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस

स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, म.फुले सभागृहामागे, ज्ञानप्रबोधिनीजवळ, पुणे-४११०३०.
फोन : कार्यालय: ४७२५४९, निवास : ३३४४४८, ३५८६६६

आमची १९९८मधील प्रकाशित पुस्तके

मराठी वाङ्मयाची सद्य:स्थिती	दासबोध : वाङ्मयीन समीक्षा
चैतन्यवेल	ज्ञानेश्वरांचे निवडक अभंग
मराठी समीक्षेची वाटचाल	लोकसाहित्यमीमांसा
चित्रकथा	बीजेची कोर
असे खेळ असे खेळाडू	भारताचे सुपुत्र : यशवंतराव चव्हाण
थोर चित्रकार - भाग १ ते ४	भारतीय संत - भाग १ ते ४
खेळाडूंचा आहार	निसर्ग मित्र - बाग १ ते ३
स्वराजाचे शिलेदार	मराठी भाषिक अभ्यास - नवी आवृत्ती
ज्ञानेश्वरी व विसावे शतक - नवी आवृत्ती	त्रिदल - नवी आवृत्ती
व्यावहारिक मराठी - नवी आवृत्ती	सौंदर्योत्सव - नवी आवृत्ती
ट्युलिप्सच्या देशातून - नवी आवृत्ती	महाराष्ट्रातील किल्ले - नवी आवृत्ती
कर्मवीर भाऊराव पाटील- नवी आवृत्ती	शिवरायांची आई : जिजाई- नवी आवृत्ती
Selected Indian English Poetry	Laughter Club

॥ दीपावली शुभेच्छा ॥

ॲडव्हर्टायझिंग तसेच अभिनय तसेच अभिनय क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांनी, स्वत:चे उत्तम फोटोसेशन करून घेणे हे फार आवश्यक असते. अशा हौशी तरुण-तरुणींचे **प्रोफेशनल मेक-अपसह उत्कृष्ट पोर्टफोलिओ (फोटो सेशन) करून दिले जाईल.** त्याचप्रमाणे फंक्शन फोटोग्राफीच्या ऑर्डर्सही स्वीकारल्या जातील.

सर्व वयोगटातील स्त्रिया व पुरुषांकरिता सर्व प्रकारच्या ब्युटी ट्रीटमेंटस् दिल्या जातील. केस गळणे, कोंडा, पिंपल्स, पिंपल्सचे डाग, पुळ्या, सनटॅनिंग, कोरडी, रुक्ष त्वचा, तेलकट त्वचा, ब्लॅक हेडस्, व्हाईट हेडस्, सुरकुत्या, काळे चट्टे इ. प्रकारांनी त्रस्त झालेल्या तरुण-तरुणींना बाह्योपचारांबरोबरच (Beauty Treatments) पोटातून उपचार घेण्याबाबतही (अंतर्गत उपचार-आहार व पथ्य) मार्गदर्शन केले जाईल.

संपर्क : **अतुल शिधये**

नेचरोक्युअर

सुपर्णा अपार्टमेंटस्, प्लॉट नं. २, तुळशीबागवाले कॉलनी, एलोरा वॉच हाऊसच्या मागे, सहकारनगर नं. २, पर्वती, पुणे-४११००९. **फोन : ४४९२२३/४३७५८३**

शोध अधिनायकाचा

शिवाजी सावंत

'युगंधर' हे विशेषण आहे श्रीकृष्णाचे. महाकाव्य महाभारत, हरिवंश व श्रीमद्‌भागवत या महाकाय तीन ग्रंथभर व्यापून राहिलेला हा महानायक! गेली पाच हजार वर्षे भारतीय जनमानसावर जीवनाच्या सर्व स्तरांवर अधिसत्ता गाजविणारा हा अधिनायक.

व्यक्तिचरित्रात्मक कुठलीही साहित्यिक संरचना करताना रचनाकारानं एकच एक प्रश्न प्रथम स्वत:ला करायचा असतो, "हा नायक झालाच नसता तर? काय परिणाम झाला असता अवती भवतीच्या सर्व सर्व जीवनांगांवर? पुढील पिढ्यांच्या भावपर्यावरणावर?"

हा प्रश्न स्वत:ला न विचारता बहुसंख्य लिखाण केलं जातं. मग ते एकारलेलं होतं. दर दहा वर्षांनी वाचकांची पिढी बदलली जाते असा साहित्यजाणकारांचा निष्कर्ष आहे. असं लिखाण मग बदलत्या पिढीबरोबर विस्मृतीत जातं. यासाठी 'साहित्य' हा निव्वळ शब्दांचा नि:सत्त्व खेळ नसून ती एक जीवनगुटी आहे हे पटलेल्या साहित्यकारांनी तरी 'नायक' सर्व कसोट्या लावून निवडावा. या दृष्टीनं 'श्रीकृष्ण' हा महानायक, अधिनायक ठरविण्यापूर्वी त्याच्याबद्दल एकच एक 'कसोटी-प्रश्न' विचारून घेता येईल. "श्रीकृष्ण झालाच नसता तर कसं झालं असतं भारतीय जनमानस?" हा एकच प्रश्न आपणाला केवढ्या वेगळ्या अंगानं त्याचं आगळं दर्शन घडवितो!

श्रीकृष्ण झालाच नसता तर - गीता नसती - तिच्यातून विकासलेले मीरेपासून, सुरदास, गौरांग प्रभू, नरसी मेहता, ज्ञानोबा ते तुकोबा हे संत स्त्री-पुरुष कवी झाले नसते, पारतंत्र्यातील भारताला गीतारहस्य जाणून- 'स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. आम्ही तो मिळवूच मिळवू' असं भान देणारे निर्भय लोकमान्य झाले नसते. गीता हाती घेऊन 'वंदेमातरम्' असा स्वातंत्र्यघोष घुमवीत हसत फाशी जाणारे देशवीर झाले नसते, नाटक, काव्य, कादंबरी, तत्त्वज्ञान, चित्रपट, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प या भारताच्या समृद्ध ललितकलांचा विभाग पोरका, रुक्ष झाला असता. आपल्यानंतर परवा परवा स्वतंत्र झालेला आफ्रिका आणि आपण यात काही फरक राहिला असता काय?

मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित

केलेले माझे 'युगंधर श्रीकृष्ण - एक चिंतन' हे एक चिंतनपर प्रस्तावनावजा पुस्तक आहे. ती स्वतंत्र रचना नाही. कादंबरी नाही. आहे एक सलग उलटसुलट प्रश्नांच्या शक्य तेवढ्या कसोट्या लावलेलं ते साहित्य-नवनीत आहे. एका प्रमुख विचारामुळं ते सिद्ध झालं आहे. कोणता तो विचार? तर "महाभारत-श्रीकृष्ण, अर्जुन, भीम, कर्ण, भीष्म' या व्यक्तींचं आणि 'महाभारतीय युद्ध' नावाची भयानक घटना झालीच नाही. महाभारत, श्रीकृष्ण या सर्व भाकडकथा आहेत, कविकल्पना आहेत." असं आग्रहानं प्रतिपादन करणाऱ्या विचारवंतांचा एक वर्ग आहे.

'महाभारत' हा देशाचा उपलब्ध इतिहास आहे. तो पाच हजार वर्षांच्या वाटचालीत अनेक प्रक्षिप्तांनी लडबडून गेला आहे हे मान्य करण्याची त्यांची तयारी नाही. त्यासाठी लागणारे परिश्रम उपसण्याची त्यांची तयारी नाही. तीन बाजूंनी दुर्लंघ्य सागर, चौथ्या बाजूला दुष्कर हिमालय यांच्या बंदिस्त पेटीत जीवनयात्रा करणारा हा देश खैबर खिंडीतून मध्ययुगीन आक्रमक येण्यापूर्वीही एक सशक्त समाजजीवन जगत होता हे रोकडं सत्य मान्य करण्याची तयारी नाही.

अशांना नम्रतापूर्वक सांगावसं वाटतं की असा प्रयत्न म्हणजे कालबाह्य झालेल्या विचारांचं, धर्माचं आग्रही नि अभिनिवेशी केवळ पुनरुज्जीवनही नाही. या विचारवंतांनी हजार वर्षं मायभूमीला पारखा झालेला इस्त्राएल देश कशाच्या बळावर पुन्हा उभा राहिला हे सूर्यसत्य ध्यानी घ्यावं. तसंच आइनस्टाइनसारखा विज्ञानपुरुष गांधीजींबद्दल म्हणाला की, "गांधी नावाचा कुणी वास्तव पुरुष होऊन गेला हे पुढील पिढ्यांना खरंही वाटणार नाही."

श्रीकृष्णाबाबत आपण आज नेमक्या त्याच मानसिक स्थितीत नाही काय? त्याच्या चरित्रात हजारो वर्षं प्रक्षिप्तपणे घुसडलेल्या चमत्कारांनी त्याला आपल्यापासून दूर नेऊन ठेवलेलं नाही काय? संस्कृतीचा, साहित्याचा मूळ शोध घ्यायचा असेल तर श्रीकृष्ण या अधिनायकाचा नाही तर कुणाचा शोध घ्यायचा?

'युगंधर-एक चिंतन' या पुस्तकात एक साहित्यकार कलावंत म्हणून हा वेध मी कसा घेऊ इच्छितो याचं विवेचनमात्र आहे. असंख्यात स्त्री-पुरुष वाचकांच्या मन:पूर्वक शुभेच्छांवर श्रीकृपेनंच ते शक्य आहे. यापरते सध्या तरी अधिक काहीही नाही. इति शुभं भवतु!

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

राज्य मराठी विकास संस्था

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,३ महानगरपालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१. दूरध्वनी : २६५३९६६/२६३१३२५

राज्य मराठी विकास संस्थेची उपयुक्त प्रकाशने

राज्य मराठी विकास संस्थेने मराठीच्या अभ्यासकांना विविध संदर्भात उपयुक्त ठरणारी पुस्तके प्रकाशित केली आहेत. संस्थेच्या कार्यालयात ती सवलतीच्या दरात उपलब्ध होतील. ग्राहकांनी हव्या असलेल्या पुस्तकांच्या किंमतीएवढी रक्कम मनिऑर्डरने/डिमांड ड्राफ्टने पाठविल्यास टपालखर्चाच्या हशिलाइतक्या रकमेच्या व्ही.पी.ने पाठविली जातील.

- **मराठी लेखन मार्गदर्शिका - यास्मिन शेख**
  पृष्ठे-१८२, मूल्य-७५ रुपये, सवलत मूल्य-६० रुपये
  (सर्वसामान्य नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, मराठी भाषा शिकणाऱ्या अन्य भाषक व्यक्ती, दूरचित्रवाणीपटावर लेखन करणारे कलावंत, पाट्या रंगविणारे रंगारी, टंकलेखक, संगणकावर अक्षरजुळणी करणारे जुळारी... अशा सर्वांना बिनचूक मराठी लेखन करण्यासाठी उपयुक्त पुस्तक)
- **प्रशासनिक मराठी भाषेचा विकास - गीता भागवत**
  पृष्ठे-४२२, मूल्य-१५० रुपये, सवलत मूल्य-१३० रुपये
  (प्रशासनिक मराठीचा वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेला अभ्यास. प्रशासनिक लेखन करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचनांसह)
  वा. वि. मिराशी स्मृती वैचारिक लेखन पुरस्कार, (विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९९७)
- **कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य**
  संपादन - सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन
  पृष्ठे-३७८, मूल्य-२०० रुपये, सवलत मूल्य-१७० रुपये
  (एम.ए. मराठीचे विद्यार्थी, ग्रंथालयशास्त्राचे शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच संशोधनपर निबंध लिहू इच्छिणाऱ्यांसाठी उपयुक्त. संस्कृत-इंग्रजी-मराठी भाषांतील कोश व सूची वाङ्मयाचा सांगोपांग विचार करणारा ग्रंथ)
- **मराठी लघुलेखन शब्दकोश** - श्री. व. वा. इनामदार
  पृष्ठे-३२२, मूल्य-१४० रुपये, सवलत मूल्य-१०० रुपये
  (लघुलेखनाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांना सरावासाठी उपयुक्त ठरू शकणारा एकमेव ग्रंथ)
  ना. गो. कालेलकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार १९९५-९६.
- **शिक्षकांसाठी अध्ययन पुस्तिका**
  पृष्ठे-११५, मूल्य-२० रुपये, सवलत मूल्य-१५ रुपये
  ('मराठी वाचनपाठ' (इंग्रजी माध्यम) या इयत्ता ९वीच्या पुस्तकाच्या अध्यापनासाठी शिक्षकांना उपयुक्त)
- **त्र्यंबक शंकर शेजवलकर साहित्याची वर्णनात्मक सूची** - संपादक - सुषमा पौडवाल
  पृष्ठे-३१२, मूल्य-१५० रुपये, सवलत मूल्य-१३० रुपये

  (इतिहासकार शेजवलकरांच्या लेखनाची आणि शेजवलकर-विषयक लेखनाची, शेजवलकर जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित केलेली वर्णनात्मक सूची)
- **शालेय मराठी शब्दकोश** (इ. ५वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी) - वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके
  पृष्ठे-२४०, डेमी चतुष्पत्री, मूल्य-६० रुपये
  (इयत्ता ५वी ते १२वी पर्यंतच्या सर्व विषयांच्या मराठी पाठ्यपुस्तकांशी संबंधित शब्द, संज्ञा, वाक्प्रचार आदींची सचित्र व सोदाहरण ओळख. शुभदा सारस्वत प्रकाशन)

''अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण'' या पुस्तकमालेतील व्यक्ती, संस्था आणि विविध विचारप्रवाह संबंधित पुस्तके

- **महाराष्ट्र साहित्य परिषद - म. श्री. दीक्षित**
  पृष्ठे-११४, मूल्य-५० रुपये, सवलत मूल्य-४० रुपये
- **व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य - कृ. श्री. अर्जुनवाडकर**
  पृष्ठे-१०३, मूल्य-५०रुपये, सवलत मूल्य-४० रुपये
- **काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य - मृणालिनी जोगळेकर**
  पृष्ठे-१८०, मूल्य-१५० रुपये, सवलत मूल्य-१३० रुपये
- **गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य - हेमंत वि. इनामदार**
  पृष्ठे-१०८, मूल्य-६० रुपये, सवलत मूल्य-५० रुपये
- **बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य - मोहिनी वर्दे**
  पृष्ठे-११४, मूल्य-६० रुपये, सवलत मूल्य-५० रुपये

'दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास' या प्रकल्पांतर्गत पुस्तके :

- **त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते - संपादन - डॉ. वसंत जोशी**
  पृष्ठे-४१, मूल्य-३० रुपये, सवलत मूल्य-२० रुपये
  (त्रिवेंद्रमच्या ग्रंथालयातील प्राचीन मराठी हस्तलिखितांची सूची)
- **मद्रासची मराठी हस्तलिखिते - संपादक - डॉ. वसंत जोशी**
  पृष्ठे-२०८, मूल्य-१५० रुपये, सवलत मूल्य-१३० रुपये
  (गव्हर्नमेंट ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट्स लायब्ररी, चेन्नई (मद्रास) येथील मराठी हस्तलिखितांची सूची)
- **तंजावर सूची (खंड ६) - संपादक - वसंत जोशी**
  पृष्ठे-१९६, मूल्य-२०० रुपये, सवलत मूल्य-१७० रुपये
- **दक्षिण भारतातील वाङ्मयाचा इतिहास - तंजावर खंड - संपादक - डॉ. वसंत जोशी**
  (१६ अभ्यासकांच्या सहकार्याने)
  पृष्ठे-७११, मूल्य-५०० रुपये, सवलत मूल्य-४२५ रुपये
- **दाक्षिणात्य साहित्य-संस्कृतीचा मराठीशी अनुबंध - डॉ. माणिक धनपलवार**
  पृष्ठे-३६२, मूल्य-३०० रुपये, सवलत मूल्य-२५५ रुपये

मुद्रण चालू

साहित्य सेतू - श्री. रं. कुलकर्णी
दखनी भाषा - मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार - डॉ. श्री. रं. कुलकर्णी

आगामी

दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास - आंध्र-कर्नाटक खंड संपादन-डॉ. वसंत जोशी
मराठी लेखन मार्गदर्शिका (दुसरी आवृत्ती) - **यास्मिन शेख**
आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन - डॉ. मिलिंद मालशे (दुसरी आवृत्ती मुद्रणाधीन)

आवर्जून वाचावें असे...

"आजच्या रसरसत्या विज्ञानयुगात तर निसर्गाच्या अनेक गुपितांचा वेध घेण्यासाठी इरेसरीला पडलेली 'प्रज्ञा-प्रज्ञा' म्हणतात, ती हीच आहे. हे मानवी देहात निसर्गातील अनेक सत्यांचा वेध घेण्याची अंगभूत क्षमता असलेले हार्मोन्स प्रकट होऊ शकतात, याचं श्रीकृष्ण हे एकमेव उदाहरण आहे. साहित्याच्या सोप्या भाषेत आपण ते समजून घेतलं पाहिजे. तत्त्वज्ञानाच्या किचकट व क्लिष्ट वेष्टनात त्याला यापुढे शतकानुशतक भारतीयांना ठेवताच येणार नाही. श्रीकृष्णाचं जीवनचरित्र हा कसलाही चमत्कार नाही. आपण त्याच्या देशीचे, त्याच्या मातीतले असून त्याला निकोप मनी नीट समजून घेऊ शकत नाही, हा मात्र नक्कीच घनघोर चमत्कार वाटतो मला!

एकच आवर्जून सांगावंसं वाटतं. जशी माथ्यावरच्या निळया आकाशाकडं, त्यातील सूर्यबिंबाकडं अगदी सहज व निकोप दृष्टी आपण टाकतो, तशीच श्रीकृष्णचरित्राकडं आता टाकली पाहिजे. कितीही प्रश्न सामोरे येवोत, 'श्रीकृष्ण' हा भारतीयांसाठी अनेकविध मूक-मार्गांनी 'उत्तिष्ठ कृतनिश्चयः' असं युगानुयुगं म्हणत आलेला एकमेव प्रेरणास्रोत आहे. दीपस्तंभवत युगंधरी प्रेरणास्रोत आहे."

युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन *शिवाजी सावंत*

पृष्ठे : १०० *किंमत : साठ रुपये*

जन्मकथा - 'द प्लेन ट्रूथ'ची !

माधव मोर्डेकर

मेहता पब्लिशिंग हाऊसने मला आपला एक मान्यवर लेखक मानून माझा फार मोठा आदर केलेला आहे. अर्थात, त्याला सर्वस्वी कारण आहेत संस्थेचे व माझे अकृत्रिम ऋणानुबंध. मला त्याची जाणीव पूर्ण आहे.

माझ्या आतापर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांपैकी एकाची जन्मकथा सांगण्याचा हा प्रयत्न आहे. आजपर्यंत मेहतांनी स्वत:च निवडलेल्या इंग्रजी पुस्तकांचे मराठीत अनुवाद करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली. मी ती माझ्या मगदुरानुसार पार पाडत आलो. प्रकाशित झालेल्या माझ्या पुस्तकांपैकी बहुतांश 'राजकीय' विषयापुरती मर्यादित आहेत. आणि तसे पाह्यला गेले तर त्या पुस्तकांचे तात्कालिक, प्रासंगिक महत्त्वच अधिक असते. इतके असूनही त्यापैकी काही पुस्तके वाचकांना भावली याचे समाधान खूप आहे. सी.बी.आय. या भारत सरकारच्या गुप्तचर संस्थेचे निवृत्त संचालक श्री. एन. के. तथा निर्मलकुमार सिंग यांचे 'द प्लेन ट्रूथ' हे त्यातील एक गाजलेले पुस्तक.

एका अर्थाने, अनुवादक त्या पुस्तकाला जन्माला घालत नाही. ते गुटगुटीत हसरेखेळते बालक जन्मदात्याने अनुवादकाकडे सोपवलेले असते एका विशिष्ट उद्देशाने. त्याला नीटनेटके नटवून वेगळया भाषेत सादर करण्यासाठी. याचाच अर्थ अनुवादक रंगभूषाकाराची भूमिका बजावतो. त्याच्या स्वाधीन केलेल्या मूळ कलाकृतीला जास्तीत जास्त न्याय देण्याचा अनुवादक प्रयत्न करतो. एका परीने तेवढ्यापुरता तो त्याचा 'जनक' पिता नसून 'दत्तक' वडील असतो.

'द प्लेन ट्रूथ' हे अतिशय भावस्पर्शी, प्रांजळ आत्मकथन आहे. प्रकाशकांना आवडले म्हणून ते माझ्याकडे आले इतकेच. अर्थात, केवळ त्यांनी सोपवले म्हणून ते उचलले अशातला प्रकार नाही. मला स्वत:लाही त्यातील 'फील' जाणवणे गरजेचे असते. त्याप्रमाणे तो 'स्पर्श' जाणवला आणि लेखनास आरंभ केला.

प्रथमदर्शनी एक अडचण आली. संपूर्ण निवेदन वृत्तपत्रीय लेखनाच्या - रिपोर्टेड स्पीचच्या धर्तीवर झाले होते. त्यातील एकूण आशय नक्कीच ठाशीव भक्कम, मूलगामी आणि विशेष म्हणजे कमालीचा

प्रामाणिक वाटला. त्यामुळे सुरुवातीलाच एक निर्णय घेणे भाग पडले. वाचक डोळ्यासमोर ठेवून, निवेदनातील एकसूरीपणा काढून टाकण्याची आवश्यकता वाटली आणि नंतर अधूनमधून मूळ निवेदनाला 'संवादरूप' देत गेलो. त्यामुळे, संबंधित पात्रे सजीव झाल्यासारखी वाटायला लागली. एक दृश्य वाचकासमोर उभे करण्याचा तो एक प्रयत्न होता. तो बऱ्याच प्रमाणात लाभदायक ठरला. निवेदनाला गती आली, वळणे लाभली. एक वेगळी दिशा मिळाली.

राजकीय विषय तात्कालिक असतात. जोपर्यंत ते चर्चेत असतात तोपर्यंतच वाचकांना त्यात रस असतो. या अडचणीमुळे लेखन शक्य तितक्या जलदीने पूर्ण करण्याची गरज असते. साहजिकच, त्याचा परिणाम अंतिम सादरीकरणावर झाल्या शिवाय राहत नाही. अनेकदा, शेवटचा हात फिरवायलाही वेळ उरत नाही. त्या धावपळीत मूळ कलाकृतीवर अन्याय होण्याचा संभव नाकारता येत नाही. तो दोष पत्करूनच काम हातावेगळे करावे लागते.

राजकीय विषयासाठी संदर्भ आसपास लागतातच. त्या बाबतीत, विशेषत: रोजच्या नियतकालिकांचा, वृत्तपत्रांचा उपयोग अधिक होतो. माझ्या सुदैवाने, मला वृत्तपत्रांतून स्तंभलेखन करण्याची संधी मिळाली. गेली काही वर्षे विविध प्रकारच्या राजकीय टीकाटिपण्या मी दै. पुढारी (कोल्हापूर) व दै. तरुण भारत (बेळगाव) यांच्या साप्ताहिक पुरवण्यांच्या माध्यमातून सादर केल्या. त्या लेखनाचा उपयोग अनुवाद करताना खूपच झाला. शिवाय, माझ्या विद्यार्थीदशेपासूनच मला देशविदेशच्या राजकीय घडामोडीत रस वाटत आलेला आहे. त्यांच्या संदर्भातील माहिती शक्य तेवढी अद्ययावत राखण्याकडे घेण्याकडे माझा कल आहे. पेशाने मी शिक्षक होतो त्यामुळेही सर्व काही सुलभ होत गेले. अनुवाद करताना लागणारे संदर्भ डोक्यातच होते असे म्हणायला हरकत नाही. माझ्या या अंगभूत बलस्थानाची कल्पना प्रकाशकांना असल्यामुळे ते बिनधास्तपणे त्यांना महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या राजकीय विषयांवरील पुस्तकांची जबाबदारी माझ्यावर टाकत असावेत. एका परीने, मी त्यांच्या त्या विश्वासास पात्र ठरलो याचा आनंद वेगळाच.

स्वतंत्र व अनुवादित साहित्यकृती यांच्यातील फरक अर्थातच फार मोठा आहे. त्यामुळे त्यांचे मूल्यमापन करणारे समीक्षक, आस्वाद घेणारे वाचक आणि दखल घेणारे पत्रकार तुलनेने कमीच आढळतात. त्यात स्वत:ला कधीच गैर वाटले नाही. तो त्यांचा दोष नाही. शिवाय, माझ्या वाट्याला येणारी मूळची साहित्यकृती लौकिकार्थाने 'ललित' नसल्यामुळे तर तो प्रश्नच निर्माण होत नाही.

तरीही, 'द प्लेन ट्रूथ' सारख्या पुस्तकाला मिळालेला प्रतिसाद आनंददायक होता. 'तुम्ही हा ग्रंथ मराठीत आणून आम्हांवर फार मोठे उपकार करता...' असे लिहिणारा वाचकही भेटला. माझ्या दृष्टीने सर्वांत आश्चर्यकारक धक्का दिला तो पुणे मराठी ग्रंथालय या नामवंत संस्थेने. त्यांनी या पुस्तकाची निवड नारायण हरी आपटे पारितोषिकासाठी केली. काही क्षण का होईना, आजवरच्या माझ्या परीने 'उसन्या अवसानाचे' चीज झाले अशी भावना झाली.

समीक्षक, पत्रकार यांच्याबद्दल म्हणाल तर बहुतेकजण आपल्या परीक्षणात मूळ पुस्तकाचा आशय देण्यातच वेळ खर्च घालतात. अनुवादाविषयी फार त्रोटक लिहिलेले आढळते. त्यातील साचेबंदपणाही पहाण्याजोगा असतो. 'द प्लेन ट्रूथ'च्या शैलीबद्दल केलेल्या बदलाची कल्पना या आधी दिलेलीच आहे. त्याबद्दल, पुस्तकाच्या प्रस्तावनेतच उल्लेख केला होता. तरीही, एका समीक्षणात 'तसे केल्याने मूळ कलाकृतीवर अन्याय केल्याचा...' ठपका ठेवण्यात आला.

त्याप्रमाणे, काहीजणांना विशिष्ट वाक्ये खटकतात. त्याचाही परामर्श मी या आधी घेतलाच आहे. लिहिण्याच्या ओघात तसे घडतेही. त्याला नाईलाज असतो. निवेदनाच्या प्रवाहात असा पालापाचोळा आढळणारच ना! मी इतकेच नमूद करू इच्छितो, की पुस्तकाचे परीक्षण करताना समीक्षकांनी उदार भूमिका घ्यावी. एखाद्या परीक्षेची उत्तरपत्रिका तपासताना आवश्यक असणाऱ्या काटेकोरपणाला, कठोरपणाला, काटछाटीला वाव देऊ नये. हां, अनुवादक खरोखरच बेछूट, स्वैर असेल तर त्याचे कान जरूर पकडावेत. कारण, शेवटी प्रत्येक भाषा विविध छटा धारण करून अवतरत असते. वेगवेगळ्या रूपांत विलसत असते. त्याची जाणीव करून देणारी पत्रे, होणाऱ्या भेटी नक्कीच संतोषजनक वाटतात. 'द प्लेन ट्रूथ'चे झालेले स्वागत लक्षवेधक होते. कदाचित, त्यामुळेच त्याचा समावेश १९९७च्या 'ललित'च्या लक्षवेधी पुस्तकांत झाला असावा. हा प्रतिसाद जतन करून ठेवण्याइतपत फलदायी होता यात शंका नाही.

'द प्लेन ट्रूथ'या पुस्तकाच्या प्रकाशन–समारंभातील औचित्याचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. त्या समारंभासाठी मेहता पब्लिशिंग हाऊसने पुस्तकाचे मूळ लेखक श्री. एन. के. सिंग यांना आवर्जून निमंत्रण दिले आणि ते स्वत:ही तितक्याच आपुलकीने, प्रसन्न मनाने उपस्थित राहिले. माझ्या व्यक्तिगत दृष्टीने ती घटना संस्मरणीय

ठरली. या प्रसंगोचित औचित्यदर्शनाबद्दल मेहता पब्लिशिंगचे मनोमन आभार मानावे लागतील, या निमित्ताने मी ते व्यक्त करू इच्छितो. असो.

शेवटी, अनुवादकाचे आणखी एक गाऱ्हाणे आपल्या कानावर घालण्याचे धाडस करतो. 'अनुवाद' 'भाषांतर' याकडे सामान्यत: उपेक्षेनेच पाहिले जाते. अगदा अलीकडे राज्यशासन अनुवादित कलाकृतीची दखल घेऊन पारितोषिके देत आहे. तरीही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन त्याबाबतीत उदासीन आहे असे वाटते.

अनुवाद हा एक वेळ खाणारा विषय आहे. माझ्या अनुभवावरून मी ठामपणे सांगतो की स्वतंत्र निर्मिती करताना लेखकाला जे स्वातंत्र्य लाभते त्याचा फायदा तो उठवतो. अनुवादकाची अडचण दुहेरी असते. म्हटले तर बंधनात, म्हटले तर मुक्त. लेखनाच्या ओघात त्याला काही मोह पडतात. ते टाळणे कठीण होऊन बसते. त्याची मन:स्थिती द्विधा होते. परिणामी, त्याच्या पुढ्यातील पाने चटकन संपत नाहीत. घड्याळाचे काटे जलदगतीने पुढे सरकतात. मारलेली बैठक मोडणे जीवावर येते. ज्याला आपण 'वेळखाऊ' म्हणू शकू त्याचा पुरेपूर प्रत्यय येतो. केवळ, या एका दृष्टिकोनातून पाहिला गेले तरी अनुवाद करणे वरवर दिसते तितके सोपे नाही हे मान्यच करावे लागेल. दुहेरी अवधान ठेवून ती जबाबदारी पार पाडावी लागते. बऱ्याच वेळा मूळ कलाकृतीत पूर्णांशाने गुंतवून घेणे परवडणारे नसते. त्या मानसिकतेचा विचार जरुर व्हावा. कारण, नाही म्हटले तरी ते एक 'सोंग' असते. त्याचे भान राखून भूमिका वठवावी लागते. केव्हा ना केव्हा ती वस्त्रे उतरून ठेवावी लागणार हे लक्षात ठेवून वावरणे तसे अवघड आहे. तरीही, अखेर तो आनंद आगळाच असतो. आजपर्यंत त्याची गोडी चाखण्याचे भाग्य मेहता पब्लिशिंगने मला दिले. मी त्यांचा निरंतर ऋणी आहे. ■

राजकीय वास्तवाचा निर्भीडपणे वेध घेणारी पुस्तके

पुस्तकाचे नाव	*मूळ लेखक*	*अनुवाद*
द प्लेन ट्रूथ	निर्मल कुमार सिंग	माधव मोर्डेकर
बोफोर्स	बी. एम्. ओझा	माधव मोर्डेकर
भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत	शशि थरूर	मधुकर तोरडमल
अस्वस्थ दशकाची डायरी	अविनाश धर्माधिकारी	
वुई द नेशन	नानी पालखीवाला	वि. स. वाळिंबे
भारत विकणे आहे	चित्रा सुब्रह्मण्यम्	वि. स. वाळिंबे

आवर्जून वाचावे असे...

"श्री लक्ष्मीनारायणन यांच्या खोलीतून मी बाहेर आलो. माझी पावले अगदी जड झाल्याचा भास मला झाला - ११ वर्षे ज्यांनी भारताचे पंतप्रधानपद भूषवले होते त्या एका भूतपूर्व प्रधानमंत्र्यांना अटक करण्याचा आदेश मला मिळालेला होता. त्या अकरा वर्षांत माझ्या सी. बी. आय. मधील कारकीर्दीची जवळपास पाचएक वर्षेही होती. तसे पाहायला गेले तर ते प्रकरण मी हाताळत नसूनही त्यांना अटक करण्याचा आदेश माझ्या हातात अकस्मात पडलेला होता. पण मी फर्स्ट इन्फर्मेशन रिपोर्ट नीट वाचलेला होता. एका भ्रष्टाचाराच्या प्रकरणात त्यांचे नाव पहिल्या क्रमांकावर त्या अहवालात झळकलेले होते. अर्थात, श्रीमती इंदिरा गांधींना अटक करण्याची कामगिरी खूपच नाजूक, अवघड आणि जोखमीची होती. ती पार पाडण्यासाठी माझीच निवड झाली - ते प्रकरण मी हाताळत नसतानाही - याला अर्थ होता. खरे सांगू का, मला त्याबद्दल वेगळा आनंदही झाला. माझ्या अंगावर मूठभर मांसही चढले. अगदी मोकळेपणाने सांगतो. माझ्या वरिष्ठांनी आणि, विशेषतः मुख्य संचालकांनी माझ्या कर्तबगारीवर विश्वास ठेवून ती बाब हाताळण्यासाठी मलाच निवडावे! खरोखर त्यांनी एका परीने माझा बहुमानच केला होता."

द प्लेन ट्रूथ

अनुवाद : माधव मोर्डेकर

पृष्ठे : ३४०

किंमत : दोनशेपन्नास रुपये

‘पर्व’ची अनुवाद कथा

सौ. उमा वि. कुलकर्णी

ही गोष्ट १९८४ सालची. ‘वंशवृक्ष’चा अनुवाद पूर्ण होऊन प्रकाशक शोधण्याची खटपट सुरू होती. एक दिवस भैरप्पांचे पत्र आले. ‘साक्षी’ या कादंबरीचे लेखन हातावेगळं करून ते आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे प्रवासाला बाहेर पडणार होते आणि त्यावेळी ते पुण्याला येणार होते.

त्यांच्या पुण्याच्या मुक्कामात दररोज बऱ्याच गप्पा होत होत्या. त्यात त्यांच्या कादंबऱ्यांचाही विषय निघत होता. एकदा यांनी गप्पांच्या ओघात त्यांना विचारलं, ‘गांधारीच्या जीवनावरची तुमची एक कादंबरी अलीकडे प्रकाशित झाली आहे ना? एका नियतकालिकात मी त्यातला थोडा भाग वाचला.’

यावर भैरप्पा म्हणाले, ‘केवळ गांधारी नव्हे, संपूर्ण महाभारतावरची कादंबरी आहे.’

तो विषय तिथेच थांबला. मराठीमधील या विषयावरील अनेक पुस्तके वाचली असल्यामुळे अनुवादाच्या दृष्टीने मलाही त्यात फारसा रस नव्हता

म्हैसूरला परतल्यावर भैरप्पांनी भेट म्हणून ‘पर्व’ची प्रत पाठवून दिली.

‘पर्व’ हाती आल्यानंतर काही दिवसांनी ह्यांचं वाचन सुरू झालं. त्यावेळी हे खडकीच्या हाय एक्स्प्लोझिव्ह फॅक्टरीमध्ये नोकरीला होते. ओव्हर टाईम सुरू असल्यामुळे सकाळी सात वाजता हे घराबाहेर पडले की संध्याकाळी सहा वाजता घरी यायचे. त्यामुळे वाचायला फारसा वेळ मिळायचा नाही. जेवढं वाचून होईल तेवढं ते मला सांगायचे. ते ऐकता - ऐकता मला जाणवलं, मराठीमध्ये महाभारतावरील ज्या कादंबऱ्या आणि पुस्तके आहेत, त्यापेक्षा ही कादंबरी पूर्णपणे वेगळ्या दृष्टीकोनातून लिहिली आहे. या कादंबरीचा अनुवाद करायचा असे आम्ही ठरवलं.

भैरप्पांना पत्र लिहून त्यांची परवानगी घेतली आणि प्रत्यक्ष अनुवाद करायला सुरुवात केली. कच्चे लिखाण झाल्यानंतर पुन्हा एकदा पक्के लिखाण सुरू झाले. कादंबरी आवडल्यामुळे अत्यंत आनंदात दिवस चालले होते. दिवसभरात सहा ते आठ तास लेखन चाले. त्यात कुठल्याही कारणानं खंड पडला की मन अस्वस्थ होई. लिहिता-लिहिता मनाला भिडणाऱ्या आणि वेगळ्या वाटलेल्या मुद्द्यांवर संध्याकाळी यांच्याशी चर्चा होई. वाचताना निसटलेली बारीकसारीक सौंदर्यस्थळे अशा वेळी जाणवत. लेखनात व्यत्यय येऊ नये म्हणून दुपारच्या वेळी घराला बाहेरून कुलूप लावून मी लिहीत बसे. हे फक्त त्यावेळी समोरच्या खोलीत राहाणाऱ्या सौ. दिवाडकर वहिनींना ठाऊक असे. मग ही सखी-शेजारीण दुपारी साडेतीनचार वाजता हळूच खिडकीतून ‘वैनी, चहा-’ म्हणत गरमागरम चहाचा कप देऊन जात असे.

अनुवाद तयार झाला. संपूर्ण कादंबरीचाच अनुवाद आनंददायी होता. त्यातही कुंती, द्रौपदी, भीम, कृष्ण, अखेरचे युद्ध वगैरे प्रकरणे मला प्रभावित करून गेली होती. विविध पुस्तकांच्या वाचनातून मनात उमटलेली महाभारतातील पात्रांची बिंबे पुसली जाऊन तिथे ‘पर्व’ने वेगळ्याच व्यक्तिरेखा उमटवल्या होत्या. ही प्रक्रिया नेहमीच पटणारी आणि आनंददायीच होती असंही नव्हे. उदाहरणार्थ, अश्वत्थाम्याची ‘पर्व’मधील व्यक्तिरेखा पटवून द्यायला अशीच जड गेली.

अनुवादाचे काम बहुतांशी मनापासून चालले असले तरी प्रत्यक्ष अनुवाद लिहून काढताना अनुवादक म्हणून काही गोष्टींचे भान ठेवावे लागत होते.

या कादंबरीमध्ये लेखकाने संज्ञा-प्रवाहाचा फार मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. मुळात भैरप्पांची भाषा साधी आणि अनलंकृत आहे. या कादंबरीतील पात्रांच्या मनात येणारे विचार लेखक जसेच्या तसे मांडत जातो. एक विचार व्यक्त होता-होता त्यातील शेवटच्या एक-दोन शब्दांबरोबर विचाराचा प्रवाह वेगळ्याच दिशेला वाहू लागतो. कुंती, भीष्म, द्रोणाचार्य यासारख्या दीर्घायुषी पात्रांच्या वाढत्या वयाचा ‘फील’ देण्यासाठी आणि त्यांच्या अवाढव्य आयुष्याला गवसणी घालण्यासाठी लेखकाने याचा अत्यंत चतुराईने आणि कलात्मकतेने वापर करून घेतला आहे. अनुवाद करताना केवळ वाक्यांच्या अर्थाचा विचार न करता या शैलीचे प्रयोजन ध्यानात घेऊन अनुवाद करणे महत्त्वाचे होते.

कादंबरीतील अखेरचे प्रकरण मूळ कादंबरीमध्ये सलगपणे छापले आहे. इथे संपूर्ण प्रकरणाचा एकच परिच्छेद केला आहे. या प्रकरणात युद्धोत्तर काळातील छोटी-छोटी वेगवेगळ्या ठिकाणी घडणारी दृश्ये येतात.

मराठी अनुवादात मी रचना बदलली आहे. एवढी मोठी कादंबरी वाचून झाल्यावर एकाच सलग परिच्छेदाचे हे प्रकरण कदाचित वाचकांपर्यंत पोहोचणारही नाही या शंकेने मी यातील प्रत्येक प्रसंग सुटा करून वेगवेगळ्या परिच्छेदांमध्ये मांडला. या प्रकरणाची रचना तशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. जुन्या काळच्या भारतीय चित्रकलेत जसे एकाच चित्रात एकीकडे राजवाड्यातील अंत:पुरातले दृश्य, दुसरीकडे गावाबाहेर शेकोटीभोवती जमलेले, गुराखी, तिसरीकडे त्याहूनही लांब अरण्यात घडणारा प्रसंग मांडला जात असे तसे काहीसे इथे आहे. या रचनेलाही धक्का बसू नये याचे भान ठेवून हा अनुवाद केला आहे.

अनुवाद पूर्ण झाल्यानंतर आम्ही काही कारणासाठी म्हैसूरला गेलो होतो. अर्थातच त्यावेळी भैरप्पांशी गप्पा मारताना 'पर्व' हाच विषय जास्त करून होता. भैरप्पांच्या पत्नी सौ. सरस्वती याही गप्पांमध्ये सामील होत होत्या. 'पर्व' लिहिताना भैरप्पा कसे झपाटल्यासारखे झाले होते याविषयीही त्या सांगत होत्या.

जातीयवादाचा उहापोह करणारी 'दादू' (मराठी अनुवाद – 'जा ओलांडुनी') ही भैरप्पांची कादंबरी त्यावेळी प्रकाशित झाली होती. एकीकडे तिला केंद्र साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला असला तरी दुसरीकडे कर्नाटकातील विशिष्ट समाज त्यांच्याविरुद्ध खवळला होता. रात्रीच्या वेळी घरावर दगड यायचे. दोन लहान मुलांना घेऊन त्या घाबऱ्या व्हायच्या. पण 'पर्व'च्या तंद्रीत असलेले भैरप्पा मात्र शांत असायचे!

कन्नड 'पर्व' प्रसिद्ध होऊन गाजत असतानाच त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकाने उत्साहाने ती वाचायला नेली. पण एक-दोन दिवसांतच ती परत आणून दिली आणि सांगितलं, 'ज्या ग्रंथावर हळद-कुंकू आणि फूल-अक्षता वाहून आम्ही पूजा करतो, त्या ग्रंथाचं हे स्वरूप आम्ही वाचणार नाही.'

'पर्व'चा अनुवाद पूर्ण होऊन प्रकाशकाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू होते. 'वंशवृक्ष'चा अनुवादही प्रकाशकाअभावी पडून होता. महाराष्ट्रातील प्रकाशकांना शिवराम कारंत माहीत होते, पण भैरप्पांचे नाव त्यांना अपरिचित होते. शिवाय कादंबऱ्यांची पृष्ठसंख्या पाहूनही प्रकाशक मागे सरत.

एक दिवस मुंबईहून डॉ. विजया राजाध्यक्ष याचं कार्ड आलं. ते पती-पत्नी दोघेही म्हैसूरला गेले असता भैरप्पांना भेटले होते. त्यावेळी भैरप्पांची 'गृहभंग' ही एकच कादंबरी मराठीत उपलब्ध असल्याचं त्यांना समजलं. नॅशनल बुक ट्रस्टचे प्रकाशन असलेल्या या अनुवादाविषयी सर्वसामान्य मराठी वाचकालाच काय, साहित्य-क्षेत्रात वावरणाऱ्या राजाध्यक्ष दांपत्यालाही माहिती नव्हती. भैरप्पांच्या दोन अनुवादित कादंबऱ्या प्रकाशकाअभावी पडून आहेत हे भैरप्पांकडून समजल्यामुळे त्यांनी पत्र लिहून आमच्याशी संपर्क साधला

होता. लगोलग त्यांनी 'पर्व'मधील काही भाग एका नियतकालिकाच्या दिवाळी अंकातून प्रकाशित करण्याची व्यवस्था केली आणि त्याचबरोबर या वैशिष्ट्यपूर्ण कादंबऱ्यांसाठी साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू केले.

दरम्यान प्रतिमा प्रकाशनाच्या श्री. पारगावकरांनी 'वंशवृक्ष' आणि 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या श्री. अनिल मेहतांनी 'पर्व'च्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली होती. डॉ. द. दि. पुंडे यांनी या संदर्भात बरेच लक्ष घातले होते. श्री. मेहतांनी हे अनुदान त्यांच्या काही अटींमुळे नाकारले. अखेर ८७ साली 'वंशवृक्ष' आणि ९० साली 'पर्व' ही दोन्ही पुस्तके मराठी वाचकांसाठी उपलब्ध झाली.

मध्यंतरीच्या काळात दूरदर्शनवरील महाभारत गाजत होते. मराठीतही आणखी काही महाभारतावरील कादंबऱ्या प्रसिद्ध होत होत्या. त्याच वेळी एका दिवाळी अंकामध्ये आलेला डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांचा लेख माझ्या वाचनात आला. भारतीय कादंबऱ्यांच्या संदर्भातील त्या लेखात त्यांनी 'पर्व'चा उल्लेख केला होता. आणि हिंदी 'पर्व' वाचून आपण भैरप्पांचा चाहता बनल्याचे मोकळ्या मनानं कबूल केलं होतं. हे वाचत असताना आपण 'पर्व'चा अनुवाद केल्याबद्दल बरं वाटलं!

मराठी 'पर्व'च्या छपाईचं काम जोरात सुरू होतं. पण पुस्तकासाठी श्री. मेहतांना मनाजोगतं कव्हर मिळत नव्हतं. अखेर श्री. अनिल उपळेकर यांचे चित्र पसंतीस उतरलं आणि लगोलग पुढील प्रक्रियेला सुरुवात झाली.

याच सुमारास एक दिवस सकाळी नऊ-साडेनऊ वाजता दारावरची बेल वाजली. दार उघडलं तर दारात श्री. शंकर सारडा उभे होते. त्यांनी मराठी 'पर्व' ची प्रुफं वाचली होती आणि त्याच संदर्भात ते भेटायला आले होते. त्यावेळी त्यांनीही स्वत:ला भावलेली 'पर्व'ची वैशिष्ट्ये सांगितली. त्यावेळीही मला खूप समाधान वाटलं.

मराठी 'पर्व' दिमाखात प्रकाशित झाली आणि तिनं मराठी वाचक, वार्ताहर आणि विचारवंतांचं स्वत:कडे लक्ष वेधून घेतलं. महाराष्ट्रातील बहुतेक सगळ्या मोठ्या वृत्तपत्रांमधून तिच्यावर अभिप्राय व्यक्त झाले. त्याशिवायही वेगवेगळ्या संदर्भात 'पर्व'चा उल्लेख होत राहिला. नंतर प्रकाशित झालेल्या काही महाभारताच्या संदर्भातील ग्रंथामध्ये भैरप्पांच्या 'पर्व'चा उल्लेख होत राहिला. त्यांच्या संदर्भ-ग्रंथांच्या यादीत 'पर्व'चे नाव मानानं झळकू लागलं. चर्चासत्रांमध्ये पौराणिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांमधील निबंधामध्ये 'पर्व'चा चांगल्या प्रकारे उल्लेख केला गेला.

मराठी 'पर्व' वाचल्यावर अनेक वाचकांनी आवर्जून पत्रे लिहून आपापले अभिप्राय कळवले. संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे, परदेशांमधूनही काही पत्रे आली. या पत्र-लेखकांमध्ये बहुसंख्य वाचक

उच्चशिक्षित आणि इतर व्यवसायातले होते. काही विद्यार्थ्यांनीही आपापले अभिप्राय कळवले होते.

यातील बहुतेक सगळे अभिप्राय अनुकूल होते. भैरप्पांनी चमत्कारांना फाटा देऊन आधुनिक पद्धतीनं लिहिल्यामुळे बहुतेकांना 'खरं महाभारत असं घडलं असलं पाहिजे' असं वाटलं. काहीजणांनी 'त्या काळच्या भारतवर्षाचा नकाशा सोबत दिला असता तर अधिक बरे झाले असते' असं मत मांडलं आहे. लेखकानं राक्षस, नाग या जमाती मानल्याचंही वाचकांना आवडलेलं दिसलं. या संदर्भात लंडनहून आलेलं मीना प्रभू यांचं पत्र प्रातिनिधिक म्हणता येईल. त्या म्हणतात, '.....(या लेखकानं) त्यानं तिच्यातील पात्रांना असं उभं केलं आहे की सजीवतेने भारून जाऊन त्यांना हात लावून पाहण्याचा मोह व्हावा. आकाश, धूळ, वादळ, पाऊस, समुद्र, अंधार यांचा त्यांनी पार्श्वभूमीसाठी आणि मनोभूमीसाठी विलक्षण उपयोग करून घेतला आहे. वर्णनं तर अशी चपखल की प्रसंग डोळ्यांपुढं साक्षात उभा रहावा, नव्हे त्यातले स्पर्श, रुची, नाद, गंधही अनुभवत आहोतसं वाटतं.... माणसाच्या शारीरिक सौंदर्याबरोबर अटळ अशी नैसर्गिक घाणही त्यांनी तिथं आवश्यक तेवढी आणली आहे. त्यामुळं सगळ्यालाच वास्तवाचं, सचोटीचं परिमाण लाभतं.'

मराठी 'पर्व' प्रसिद्ध झाल्यानंतर आकाशवाणीकडूनही याचे क्रमशः वाचन वा नाट्यरूपांतर करून प्रक्षेपित करण्याच्या संदर्भात पत्र आलं होतं. पण पुढं काही कळलं नाही.

मराठी 'पर्व' विषयीचे एकजात सर्वच्या सर्व अभिप्राय केवळ अनकूल होते असंही नाही.

ऐतिहासिक-पौराणिक कादंबऱ्या आवडणाऱ्या एका वाचक-वर्गाला भैरप्पांची अनलंकृत आणि साधी भाषा 'पर्व'च्या दृष्टीनं अनाकर्षक वाटली. काही वाचकांना यात येणारे घामाचे आणि जलबाधेचे उल्लेख किळसवाणे आणि कंटाळवाणे वाटले.

यातील यादवांच्या तोंडची शिवराळ भाषा, त्यांचे 'कुत्रे' 'थेरड्या'वगैरे संबोधन काही वाचकांना केवळ खटकलेच नाही, तर आक्षेपार्ह वाटले. या संदर्भात मीही भैरप्पांशी बोलले होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कृष्णानं समुद्र-व्यापाराचा मार्ग दाखवून दिल्यामुळे अत्यंत अल्पावधीत प्रचंड श्रीमंत झालेला हा समाज नव-श्रीमंतांप्रमाणे उद्दाम आणि संस्कृतिहीन असल्याचे दाखवणारी ही भाषा आहे.

शेवटच्या प्रकरणाविषयी दोन्ही प्रकारचे अभिप्राय आले. काहीजणांना त्यातून युद्धोत्तर वातावरणाचे प्रवाही आणि प्रभावी चित्रण दिसले, तर काहीजणांना हे प्रकरणच बांडगुळाप्रमाणे वाटले.

अनुवादाच्या संदर्भात वेगळे असे अभिप्राय कुठे आले नसले तरी काही ठिकाणचा 'म्हणे'चा वापर काहीजणांना खड्यासारखा खुपला तर काहीजणांना तोच शब्द लेहरा धरल्याप्रमाणे आकर्षक वाटला.

या कादंबरीच्या संदर्भात एक आक्षेप बऱ्याच विचारवंतांनी घेतला. भैरप्पांनी महाभारतातील दैवी चमत्कार, शाप आणि वर बाजूला सारले, हे काहीजणांना 'पर्व'चं बल-स्थान वाटलं आणि ह्याच मुद्द्यावर त्यांच्यावर बरीच टीकाही झाली. शाप आणि वर यांचे रामायण-महाभारतासारख्या ग्रंथांमध्ये विशिष्ट स्थान असते, ह्यात अंधश्रद्धेचा काहीही भाग नसतो, किंबहुना या दागिन्यांमुळेच महाभारत विलोभनीय दिसते असे मानणाऱ्यांना भैरप्पांनी ही अद्‌भूतता काढून टाकण्याचा उपद्‌व्याप करायला नको होता असं वाटलं. या दृष्टीने भैरप्पांना महाभारतच समजलं नाही असा आरोप केला गेला.

तीन वर्षांपूर्वी हैदराबाद येथे दहा मराठी अनुवादित कादंबऱ्यांवर चर्चासत्र घेण्यात आले. त्यातील 'पर्व' वरील निबंधनामध्येही हाच मुद्दा होता. भारतीय संवेदनशीलतेला हाकलून लावून तिथे पाश्चात्य संवेदनशीलतेची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न 'पर्व'मध्ये भैरप्पा करतात असा आरोप करून 'पर्व'चा धिक्कार करावा असे मत मांडण्यात आले. पुढील चर्चेमध्ये काही या बाजूने बोलले तर काहीजणांनी 'भैरप्पांनी विसाव्या शतकातील आधुनिक माणूस पुराणकाळाकडे कसा पाहू शकेल ती दृष्टी वापरली आहे, असे प्रयोग प्रत्येक कलेच्या क्षेत्रात होत असतात, त्यामुळे भैरप्पांनाही तसा अधिकार आहे' असे मत व्यक्त केले. ही सारी चर्चा 'पंचधारे'च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे.

याच चर्चेत 'पर्व'च्या मराठी अनुवादावरही आक्षेप घेण्यात आला. वर सांगितलेली मनोवृत्ती असलेल्या कलाकृतीचा अनुवाद व्हावा का, हा एक आक्षेप. 'वेगळ्या भाषिक आणि सांस्कृतिक परंपरांच्या भौगोलिक परिस्थितीने वेगळ्या मानलेल्या जीवनशैलीचा, मूल्यांचा परिचय करून देणे आणि त्या परंपरेच्या तत्त्वाशी नातेसंबंध प्रस्थापित करणे हा जर अनुवादाचा हेतू मानला तर .... या कादंबरीच्या अनुवादाची अर्थपूर्णता कोणती?' असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला.

मराठी 'पर्व' प्रकाशित झाल्यानंतर एवढ्या साऱ्या ऊहापोहानंतर आज मला काय वाटतं? इथे मला अनेक वाचकांच्या पत्रांमधले एक कॉमन वाक्य आठवतं, 'तुमच्यामुळे आम्हाला हे वाचायला मिळालं, आम्ही आपले ऋणी आहोत.'

मला वाटतं हेच अनुवादकाचं धन आहे.

आज मराठी 'पर्व'ची दुसरी आवृत्ती संपत आली आहे. या अनुवादाला साहित्य परिषदेचा स. ह. मोडक पुरस्कार मिळाला. भेटणारे वाचक आवर्जून 'पर्व'चा उल्लेख करतात. 'पर्व' वाचल्यावर वाचक चौकशी करतात : 'या लेखकाचे आणखी काय-काय मराठीत आले आहे? आम्ही ते सारं साहित्य वाचू.' मलाही म्हणतात, 'तुमचे आणखी कोणते अनुवाद उपलब्ध आहेत?

आम्ही ते सारे मिळवून वाचू.'

म्हणजे या कादंबरीने अनुवादित कादंबऱ्यांकडे काही वाचक वळविण्याचं काम केलं असंही म्हणता येईल.

सुमारे दोन-तीन वर्षांपूर्वी बालगंधर्व रंगमंदिरामध्ये विविध भाषांमधील स्त्री-दिग्दर्शिकांच्या नाटकांचा एक नाट्य-महोत्सव झाला होता. त्यामध्ये बेंगळूरहून आलेल्या बी. जयश्री या दिग्दर्शिकेची दोन नाटके सादर करण्यात आली. त्यातील 'आग्रपथ' हे नाटक महाभारतातील कुंती, गांधारी, माद्री, अंबा आणि द्रौपदी या पाच स्त्री-पात्रांवर आधारलेलं होतं. या पाचही स्त्रियांच्या जीवनाची परवड पुरुष-प्रधान समाजामुळे कशी झाली हे यात त्यांनी रंगवले होते. नाटकानंतरच्या चर्चेच्या वेळी मराठी पत्रकारांनी त्यांना विचारलं तेव्हा उत्तर मिळाल, 'पर्व'मध्ये लेखकाच्या तरल मनानं जे टिपलं होतं, तेच या संवेदनाशील दिग्दर्शिकेनं उचलून त्या वरून ही नाट्यकृती साकारली होती. (मराठी रंगभूमीवरही असा एक प्रयत्न झाला, पण तो फारसा यशस्वी झाला नाही.)

एकंदरीत पाहाता, 'पर्व'च्या निमित्तानं भैरप्पा मराठी वाचकांना, विचारवंतांना, पत्रकारांना, समीक्षकांना, नाट्य-रसिकांना बऱ्याच अशी परिचित झाले. 'पर्व'साठी प्रकाशक शोधताना ज्या परभाषिक लेखकाचे नाव मराठी साहित्यक्षेत्राला संपूर्णपणे अपरिचित होतं, ते आता चांगलंच ओळखीचं झालं आहे. 'पर्व'ला कन्नडमध्ये ज्या प्रकारच्या अभिप्रायांना सामोरं जावं लागलं तेच मराठीतही घडलं.

आणि मी? काहीजणांना ही कादंबरी मराठीत आणून काहीही साधलं नाही असं वाटत असलं तरी आजही मला अनुवाद करत असताना मिळालेला आनंद आठवतो आणि माझं मन आजही त्या आनंदात बुडून जातं.

वाचकप्रिय ठरलेली दर्जेदार चरित्रे/आत्मचरित्रे

पुस्तकाचे नाव	*मूळ लेखक*	*अनुवाद*
देव जो भूवरी चालिला	रंगास्वामी पार्थसारथी	लीना सोहोनी
एक एक पाऊल	ओशो	भारती पांडे
आय डेअर : किरण बेदी	परमेश डंगवाल	आशा कर्दळे
राजीव गांधींच्या सहवासात	राम प्रधान	माधव मोर्डेकर
नेताजी	वि. स. वाळिंबे	
नाथ हा माझा	कांचन घाणेकर	
शतदा प्रेम करावे	अरुण दाते	
डायाना आणि चार्ल्स	मीना प्रभू	
प्रवाहातील पक्षी	निलु गव्हाणकर	
अनुभव : बासु भट्टाचार्य	शब्दांकन : अशोक राणे	

आवर्जून वाचावे असे...

"माझी आणि अर्जुनाची पहिली दृष्टिभेट झाली, तीच मुळी स्पर्धेत. स्पर्धा म्हटली, की मत्सरही आलाच. माझ्या मनात तो वाढतच गेला. आणि तो तर - काय त्याचा ताठा ! काय रुबाब! त्यानंतर दुर्योधन महाराजा आणि पांडवांमध्ये ज्या कडवट घटना घडत गेल्या, त्या प्रत्येक घटनेच्या वेळी मी अर्जुनावर आग पाखडतच होतो. तेवढे केल्यावरच माझा जीव थोडा तरी शांत होत होता. प्रत्येक घटनेबरोबरच महाराजाचा माझ्यावरचा स्नेह दाट होत होता. फक्त महाराजाच्या संतोषासाठी मी अर्जुनाचा द्वेष केला नाही. कृष्ण खोटं बोलतोय्. समान शत्रुत्वही मैत्रीला कारणीभूत होत नाही का? आज हा विचित्र प्रसंग सामोरा येऊन ठाकला आहे. पण वेगळ्या संदर्भात माझ्या जन्माचं रहस्य बाहेर पडलं असतं, तर अर्जुनानं माझ्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला असता, याविषयी माझ्या मनात मुळीच शंका नाही. निश्चितच नमस्कार केला असता त्यानं. वयानं मोठं माणूस पाहिलं, की आदरानं वाकतो तो! माझ्याहून चवदा वर्षांनी लहान नाही का ! हा कृष्ण म्हणतो, 'कर्णा, तुझ्या आणि दुर्योधनाच्या मैत्रीची परीक्षा घेऊन पाहा.' किती स्पष्ट आणि सरळपणे सांगत होता! बोलण्यानं संमोहित करायची त्याची शक्ती! भीष्म, धृतराष्ट्र, द्रोण आणि विदुरही कसे मान डोलवताहेत! दृढ मनाचा नसता तर दुर्योधन महाराजालाही बोलण्याच्या ओघात सहज वाहवून घेऊन जाण्याचं सामर्थ्य असलेलं त्याचं वाक्चातुर्य!"

पर्व

अनुवाद : सौ. उमा कुलकर्णी

पृष्ठे : ७२०

किंमत : दोनशे रुपये

जीवनवादी तुकारामांची ओळख

डॉ. निर्मलकुमार फडकुले

संतवाणी ही मराठी साहित्याची अक्षय संपत्ती आहे. संतांच्या हृदयीचे उत्कट भाव या वाणीतून मुखरित झाले आहेत. शालेय वयातच ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या संतांचे अभंग अनेक वेळां माझ्या कानावर पडले होते. त्यातला उत्कट जिव्हाळा हृदयाला भिडला होता. त्यातलं भावसौंदर्य त्या वयातही मला ओढून घेत होतं.

एम.ए.ची पदवी घेईपर्यंत ज्ञानेश्वरांप्रमाणेच तुकारामही मला अनेक वेळां भेटला. काय असेल ते असो, तुकोबा माझ्या अधिक जवळ आला. अगदी खांद्यावर हात ठेवून सलगीनं बोलू लागला. त्याचं वात्सल्य मला पावलोपावली जाणवायचं. बी.ए., एम.ए.च्या विद्यार्थ्यांना संतसाहित्य शिकवताना तुकारामांच्या अभंगाबद्दल मी अधिकच उत्कटतेने बोलत आहे याची जाणीव मला होऊ लागली. 'तुकाराम गाथा' दोन तीन वेळा संपूर्ण वाचून काढली. एका अभंगात म्हटलं आहे, 'तुका म्हणे होय मनासि संवाद। आपुलाचि वाद आपुल्यासी।' मी एका बाजूने त्याच्याशी संवाद करीत होतो. पण दुसऱ्या बाजूनं वादविवादही करीत होतो. प्रत्येक अभंग वाचताना तुकारामांच्या मनाचे पीळ किती जबरदस्त आहेत याची जाण येत गेली.

वाङ्मयाचा एक अध्यापक म्हणून माझा थोडाफार बोलबाला याच काळात होऊ लागला. तुकोबांच्या कवित्वाविषयी, व्यक्तित्वाविषयी मी व्याख्यानांतून मी माझे विचार मांडु लागलो. थोडेसे वेगळे असे हे विचार श्रोत्यांना मी देत होतो. प्रा. गं. बा. सरदार यांनी संत वाङ्मयाकडं पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली. त्यापूर्वी मी डॉ. तुळपुळे, डॉ. पेंडसे, ल.रा. पांगारकर यांची पुस्तकं वाचली होती. पण त्यांचा दृष्टिकोन मला भाविकपणाचा वाटला. त्यात चिकित्सा कमी आणि भाबडेपणाचा अंश अधिक होता. त्यांच्याशी वाङ्मयीन विषयांवर अनेक वेळा चर्चा करण्याची मला संधी मिळाली. सोलापूरला व्याख्यानासाठी आले असताना तीन दिवस माझ्या घरी राहिले होते. त्यावेळी संत वाङ्मयासंबंधी पुष्कळ चर्चा झाली. 'संत केवळ टाळकुटे होते, त्यांना कसलीही समाजदृष्टी नव्हती.' 'संत हेच जगाचा उद्धार करणारे परमेश्वरी अवतार होते.' या टोकापर्यंतची मतं प्रकट होत असतात त्यांचा जो परामर्श त्यांनी घेतला त्यामुळं मी प्रभावित झालो. भाविकतेप्रमाणंच आधुनिक काळातली मूल्य मध्ययुगीन साहित्यावर लादण्याचा प्रयत्नही चुकीचा आहे. काळाच्या आणि परिस्थितीच्या संदर्भात हे साहित्य अभ्यासलं पाहिजे याचं भान मला आलं.

या दृष्टीनं अभ्यास करण्याची ओढ निर्माण झाली. प्रत्येक अभंग मी घासून पुसून पाहू लागलो. तुकारामांवरची पुस्तकं वाचू लागलो. या कवीबद्दल मराठीत भरपूर लिहिलं गेलं आहे. हिन्दी आणि इंग्रजीतही थोडंफार लेखन झालं आहे. ज्यानं तुकाराम अभ्यासला नाही त्याचं मराठी भाषेचं आणि मराठी मनाचं ज्ञान अर्धवट राहिलं आहे असं म्हणायला हरकत नाही. मराठी मातीचे सगळे गुणधर्म या कवीत दिसतात. कोमलपणा, आर्जव भडकपणा, कडकपणा, हळुवारवृत्ती, जिव्हाळा, भक्तीची उचंबळ, अनेक प्रकारचे रंग आणि गंध जे तुकोबांच्या व्यक्तित्वात होते तेच त्यांच्या काव्यात जसेच्या तसे उतरले आहेत. तुकारामाचं यथोचित मूल्यांकन अजून झालेलं नाही असं वाटू लागलं. ही खंत हीच तुकारामविषयक माझ्या लेखनाची प्रेरणा ठरली. घराघरात आणि झोपडी झोपडीत पोहोचलेला हा संत एका ठरविक समजुतीच्या वर्तुळात लेखकसमीक्षकांनी बंदिस्त करून टाकला असं दिसलं. एक भोळाभाबडा, व्यवहारज्ञान नसलेला आणि म्हणून प्रपंचात पार फसलेला एक टाळकरी, अशीच त्याची प्रतिमा बनली होती.

प्रारब्धाचं आणि निवृत्तीचं तुणतुणं वाजवीत बसलेल्या या संतानं संसाराकडं पूर्णतया पाठ फिरवली आहे; तो निष्क्रिय आहे असाच त्याच्याविषयी समज झालेला आहे. पण गाथा वाचताना ही प्रतिमा निखालस चुकीची आहे असं आढळलं. असा अपसमज ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांच्याबाबतीत आढळत नाही. तुकोबांच्या संदर्भात ही समजूत का असावी याचा विचार करू लागलो. त्यांच्या अभंगातली काही वचनं पुन्हा पुन्हा उल्लेखण्यात येतात. उदा. – 'आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना' 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' या सारख्या काही मोजक्या ओळींच्या आधारानं त्यांना दैववादी निराशावादी असं टीकाकारांनी मानलं. साऱ्याच संतसाहित्यावर हा आक्षेप आहे. पण तुकारामांवर अधिकच आगपाखड झालेली दिसते. साडेचार हजार अभंगांतून 'तुकारामांचं वेगळंच दर्शन होतं स्वतःचं जीवन आपल्या अखंड प्रयत्नातून त्यांनी घडवलं. 'सत्यअसत्यासी मन केले ग्वाही, मानियेले नाही बहुमतां' असं म्हणणारा आणि रात्रंदिन स्वतःशी आणि जगाशी संघर्ष करणारा माणूस निराशावादी कसा असेल? या स्वाभिमानी, जीवनवादी विचारवंतानं शिवाजी महाराजांनी पाठवलेली

धनदौलत ज्या सहजतेनं नाकारली त्यावरून त्यांची निरिच्छता आणि आत्मविश्वास उजळून निघतो. झापडबंद दृष्टीनं पाहून 'तुकाराम हा केवळ संत होता तो आमच्या दैनंदिन आयुष्याला कोणतीही दिशा दाखवू शकत नाही' अशी चुकीची कल्पना रूढ होऊन बसली.

पदव्युत्तर वर्गाला तुकाराम शिकवताना मला एका विद्यार्थ्यानं प्रश्न विचारला, ''सर, आजच्या जगात संत तुकाराम आऊट ऑफ डेट आहे असं आम्हाला वाटतं. माणूस विज्ञानाच्या क्षेत्रात नव्या विक्रमांची नोंद करीत असताना या संताचा विचार जुनापुराणा वाटतो. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' असं म्हणणारा माणूस प्रगतीच्या वाटा चोखाळू शकणार नाही. तुकाराम शिकून काय करायचं?''

वाङ्मयाचा काळ आणि परिस्थिती व समाज यांच्याशी अतूट संबंध असतो हे लक्षात न घेता संतांचा निवृत्तिविचारच तेवढा आळवून आणि घोळवून सांगितला जातो. संतांची जीवनदृष्टी केवळ पारंपरिक नव्हती. सांकेतिक नव्हती. तिची मुळं त्यांच्या अनुभवात होती. मध्ययुगीन वातावरणात होती याची चिकित्सा करणारे प्राध्यापक क्वचितच दिसतात. दुसरं असं की संतांच्या कवितेतलं भावनेचं आणि अभिव्यक्तीचं सौंदर्य समजावून सांगणारे अध्यापक दुर्मिळ आहेत.

या कवीच्या वाणीला आणि व्यक्तित्वाला एक प्रकारची धार आहे. म्हणून त्यांच्या अभंगसामर्थ्याची वाङ्मयीन दृष्टीतून चिकित्सा केली पाहिजे असं मला वाटू लागलं. त्या दृष्टीनं मी साधनं शोधू लागलो. पण फारसं काही पदरात पडलं नाही. गं. बा. सरदार, वि. भि. कोलते, पु. मं. लाड, यांचं लेखन माझ्या विचारांना चालना देणारं ठरलं. संतचरित्राला चिकटलेली चमत्कारांची आणि विभूतिपूजेची जळमटं झाडून टाकून शुद्ध स्वरूपात चरित्र व व्यक्तित्व ठेवलं पाहिजे ही माझी भूमिका. साक्षात्कार, इंद्रायणी नदीतून अभंगांच्या वह्या तेरा दिवसांनंतर वर येणं, सदेह वैकुंठाला विमानातून जाणं, हे तथाकथित चमत्कार लोकांच्या दृष्टीनं मोठेपण देणारे आहेत. पण माझ्या मते तुकोबांचा खरा चमत्कार म्हणजे त्यांनी तत्कालीन पुराणमतवादी कर्मठांशी आणि दांभिकांशी वैचारिक संघर्ष करून आपली भूमिका समाजाला पटवून दिली हाच आहे. जातीय अहंकार, पढिक पांडित्य, तीर्थयात्रा आणि होमहवन यांच्यावर प्रखर हल्ला चढवून ब्राह्मण्यग्रस्त प्रवृत्तीला त्यांनी धक्का दिला; प्रयत्न व कर्मयोग यांच्या उद्घोष केला. तो मला महत्त्वाचा वाटला. खरा तुकाराम यात आहे. भल्याशी भला आणि नाठाळाच्या माथ्यावर प्रहार करणारा तुकोबा हाच मला सर्वाधिक भावला. सारस्वतकार वि. ल. भावे या वाङ्मयेतिहासकारांनी तर तुकाराम आणि रामदास यांची अत्यंत अप्रस्तुत तुलना करून तुकाराम कनिष्ठ होता असा हास्यास्पद निष्कर्ष नोंदवला होता, तुलनेतला तर्कवादही

गमतीदार वाटावा असा आहे. रामदास अविवाहित होते. तुकारामांनी मात्र दोन लग्नं केली होती. म्हणून रामदास श्रेष्ठ असा त्यांचा निर्णय होता. हे सारं वाचल्यानंतर तुकारामांची यथातथ्य प्रतिमा त्यांच्या जीवनाच्या आणि काव्याच्या संदर्भातून त्या काळाच्या पार्श्वभूमीवर रेखाटावी या इच्छेने मी 'संतकवी तुकाराम : एक चिंतन' हे पुस्तक लिहिलं.

प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी थोड्याफार अडचणी आल्या. तुकारामविषयक साहित्यातून तुकोबांच्या गुरूचा उल्लेख आहे. स्वतः तुकोबांनी बाबाजी चैतन्य यांचा स्वप्नात दृष्टान्त झाला असं एका अभंगात उल्लेख केला आहे. पण या गुरूच्या पायाशी बसून त्यांनी अध्ययन केल्याचं दिसत नाही. गुरुकृपा जशी ज्ञानेश्वरांना आणि एकनाथांना लाभली तशी तुकोबांना लाभल्याचा पुरावा सापडत नाही. याचा अर्थ हा माणूस स्वत:च्या पायांनी आत्मबळावर पायथ्यापासून शिखरापर्यंतची खडतर वाट चढून गेला. तो स्वत:च स्वत:चा गुरू झाला. 'अणुरणिया थोकडा। तुका आकाशाएवढा' हे आत्मप्रत्ययाचे सार्थ उद्गार काढणारा माणूस दुबळा असू शकेल काय? प्रारब्धवादी असेल काय? आपल्याच बलिष्ठ हातांनी आपल्या आयुष्याच्या मातीला आकार देणारा हा माणूस स्वत:च्या ठिकाणी असलेल्या ईश्वरत्वाच्या ठिणगीवर फुंकर घालून तिची ज्वाला करीत होता. पण 'यातिहीन' असलेला पांडित्याचं दर्शनी भांडवल नसलेला एक कष्टाळू कुणबी व्यापार-उदीम करता करता भागवतधर्म मंदिराचा कळस होऊन बसतो ही गोष्ट प्रेरणा देणारी आहे. तुकाराम जितका संत होता तितकाच तो माणूसही होता. आमच्या सुखदु:खाचं, रागलोभांचं प्रतिनिधित्व करणारा तुकाराम मी प्राधान्यानं विद्यार्थ्यांसमोर ठेवीत होतो. 'निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ।' 'चणे खावे लोखंडाचे। तेव्हा ब्रम्हपदी नाचे।' ही त्यांची वैशिष्ट्ये होती. करुणा, क्षमा आणि शांती यांच्याबरोबरच कणखरपणा आक्रमकता, प्रतिकारक्षमता, आणि ओज यांचेही गडद रंग त्यांच्यात मिसळलेले होते.

माझ्या पुस्तकातली विवेचनशैली सहज पण वक्तृत्वपूर्ण आहे, मी शैलीच्या आवरणात गुरफटून गेलो आहे अशी टीका एका समीक्षकानं केली. इतरांनी मात्र ही शैली अर्थवाहक आहे, विवेचनाशी सुसंगत आहे असाच अभिप्राय दिला. शब्दांचा मोह मला आहे. आवडलेल्या व्यक्तित्वाबद्दल थोडी अधिक शब्दफुलं उधळली गेली तर ते स्वाभाविकच म्हणावं लागेल. मी कुठंही तुकारामाला देवपण दिलं नाही. माणुसकीचं उद्गान करणारा संतकवी आणि माणूस म्हणूनच मूल्यांकन केलं. पुस्तक लिहीत असताना 'आनंदाचे डोही आनंदतरंग' अशी अनुभूती मला आली.

'संतकवी तुकाराम : एक चिंतन' हे पुस्तक आठ-दहा दिवसांत लिहून झालं. मी मजकूर सांगत होतो आणि सौ. फडकुले

लिहून घेत होती. तोंडी मजकूर सांगताना त्यात अधिक सहजता व सुलभता येते असा माझा अनुभव आहे. अनिलकुमार मेहता यांच्या स्वाधीन हस्तलिखित केल्यावर महिन्याच्या आतच पुस्तक प्रसिद्ध झालं. मेहतांशी लेखक या नात्यानं संबंध आला तो मित्र म्हणून दृढ झाला. ही एक आनंदाची घटना.

पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर वृत्तपत्रांतून काही परीक्षणं आली. 'तुकारामांच्या कवित्वाचे वेगळे दर्शन' असं स्वागत झालं. गेल्या अठरा वर्षात त्याच्या दोन-तीन आवृत्त्या निघाल्या. महाराष्ट्रातल्या बहुसंख्य शाळा कॉलेजातल्या ग्रंथालयात आणि चोखंदळ वाचकांच्या संग्रहात या पुस्तकाला स्थान मिळालं. संतसाहित्याचा अभ्यासक आणि समीक्षक असा माझा उल्लेख होतो. तुकारामांची न्यायोचित प्रतिमा या पुस्तकात उभी राहते असा दावा केला तर तो अतिशयोक्त ठरणार नाही. कविवर्य कुसुमाग्रज आणि अनिल यांनी पत्रानं अभिप्राय कळवले. परिचित तुकारामापेक्षा या पुस्तकात जीवनवादी, पुरुषार्थी तुकारामाची सूक्ष्मपणानं ओळख होते असा या कविवर्यांचा अभिप्राय आहे.

दुसऱ्या एका कर्मठ सनातनी गृहस्थानं मी तुकारामांचा गौरव करून ब्राह्मण्याचं अवमूलन करीत आहे असा आक्षेप घेतला होता. तुकाराम हे शुद्र होते. त्यांना वेदाध्ययन, उपदेश, आणि कवित्व यांचा अधिकार नव्हता. तुकोबांना पर्यायानं ब्राह्मण्याच्या आणि श्रेष्ठत्वाच्या चौकटीत बसवलं याबद्दल मी प्रायश्चित्त घेतलं पाहिजे असं त्यानं मला पत्रातून फर्मावलं. या 'तत्त्वनिष्ठ' पत्रलेखकानं आपलं नाव मात्र पत्रात लिहिलं नव्हतं, त्याच्या तत्त्वनिष्ठेचं मला कौतुक वाटलं.

हे पुस्तक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आणि अध्यापकांना मार्गदर्शक ठरलेलं आहे. समाजप्रबोधन करणारा, जातीपातीवर आणि तज्जन्य अन्यायावर तुटून पडणारा, साधुत्वाचं सोंगं घेऊन भोळ्या-भाबड्या जनतेला लुबाडणाऱ्या संन्याशांची रेवडी उडवणारा तुकाराम मी ठसठशीतपणे मांडला. तुकोबांचं कवित्व जिवंत झऱ्यासारखं खळखळून वाहणारं आहे. काही ठिकाणचा शिवराळपणासुद्धा अपरिहार्य आहे. दंभ आणि अन्याय यांच्यावर कठोर प्रहार करणारा तुकाराम संतमंडळात वेगळा आहे. आजच्या अश्रद्ध आणि भोगवादी, संपत्तिपूजक समाजाला या संताचे न्यायनिष्ठुर पण माणुसकीनं ओथंबलेले शब्द योग्य मार्गदर्शन करू शकतात. तुकोबांनी मराठी भाषा आणि संस्कृती श्रीमंत केली. देहूच्या या वाण्यानं वाङ्मयाच्या व्यापारात शब्दांचं धन वापरून समाजाचं उदंड कल्याण केलं. म्हणूनच हे पुस्तक लिहिलं याचा आनंद वाटतो.

सावंतांच्या खास शैलीतील ढंगदार व्यक्तीचित्रणे

मोरावळा

शिवाजी सावंत

देखणे संपादन : निवडक केशवसुत

वामन देशपांडे

अगदी नेमकेपणानं सांगायचं म्हणजे, 'निवडक बालकवी' नंतरचा, 'निवडक केशवसुत' हा माझा दुसरा संपादित संग्रह. अत्यंत देखण्या स्वरूपात प्रसिद्ध झालेला हा प्रयत्न रसिक वाचकांना खूप आवडला. मी निवडलेल्या केशवसुतांच्या कवितांच्या संदर्भात छोटंसं संपादकीय लिहिलं. मुखपृष्ठ, मांडणी, छपाई हे सारे करून घेतले. मेहतांनी पूर्ण स्वातंत्र्य दिल्यामुळे ह्या पुस्तकाची निर्मिती मी मुंबईतच केली. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्यांनी माझी पाठ थोपटली.

केशवसुत हा माझा अभ्यासाचा विषय. मराठी अर्वाचीन कवितेचा हा उद्गाता. त्यांचं एकही छायाचित्र उपलब्ध नव्हतं. फक्त त्यांच्या कविता आणि इतरांनी सांगितलेल्या आठवणी. अवघ्या पंधरा दिवसात पुस्तकाची निर्मिती झाली. पुस्तकाचं मुखपृष्ठ सुप्रसिद्ध चित्रकार श्री. बाळ ठाकूर यांनी तयार केलं. स्क्रीन प्रिंटिंगही त्यांनी स्वतःच केलं. केशवसुतांच्या कवितेवर ठाकूर यांचं खूप प्रेम. त्याची सुंदर फलश्रुती म्हणजे त्यांनी मुखपृष्ठावर रेखाटलेला मोर. मलपृष्ठावर कवी शंकर वैद्य यांनी मजकूर लिहिला.

"केशवसुतांच्या काव्यसंग्रहातील 'मरणानंतर' नावाच्या कवितेत कवीने आपल्या सखीस उद्देशून म्हटले आहे : "जर मला निर्दय काळाने यमलोकी नेले आणि तू एकटीच मागे राहिलीस तर माझे स्मरण करून माझे साधे श्लोक तू पुन्हा वाचण्यासाठी हाती घेशील ना? त्यावेळी तू त्यांची तुलना माझ्या नंतरच्या काळातील कवींच्या सरस अशा काव्यकृतींशी करून पहा आणि त्यात माझे श्लोक जर कमी प्रतीचे ठरले तर त्यांना तू माझ्या प्रीतीसाठी जप आणि प्रेमाने असे म्हण की, जर माझा सखा अधिक जगला असता तर त्याचीही काव्यस्फूर्ती अशीच बहरली नसती काय?"

मराठी कवितेने आणि समीक्षेने केशवसुतांचे काव्यप्रेम आणि गुणसंपन्नता या दोन्ही गोष्टींना रसिकतेने भरभरून दाद दिलेली आहे. त्यांच्या कवितेचे मोठेपण टिकून राहिले आहे... 'निवडक केशवसुत' प्रसिद्ध करायचे ठरविले तेव्हा त्यांची समग्र कविता वाचून काढली. कविता निवडून त्यांचा क्रम निश्चित केला. माझे ठाण्याचे

मुद्रक मित्र श्याम गोखले यांना दादरच्या 'आयडियल पुस्तक त्रिवेणी'मध्ये बोलावून घेतले. 'आयडियल'चे कान्ताशेठ नेरुरकर यांना " 'मेहता हे पुस्तक प्रसिद्ध करतील का? " असे विचारले. त्यांनी पुण्याला फोन जोडला. मेहता पिता-पुत्र एकत्र ऑफिसात भेटले. त्यांनी हो म्हटले. गोखल्यांना 'समग्र केशवसुत' मधून खुणा केलेल्या कविता लगोलग 'कंपोज' करून द्या असे सांगितले. गोखल्यांनी दोन दिवसातच सर्व कविता निर्दोषपणे कंपोज करून दिल्या. माझी 'भूमिका' मी लिहून काढली. प्रा. शंकर वैद्य यांनी छोटेसे टिपण लगोलग लिहून दिले.

बाजारात केशवसुतांवर इतर ग्रंथ उपलब्ध असताना मी संपादित केलेला आणि 'मेहता पब्लिशिंग'ची सुवर्णमोहोर उमटवून प्रकाशित झालेला प्रस्तुत छोटेखानी संग्रह लोकांना खूप आवडला. संग्रहाचे देखणेपण, निवडलेल्या कविता आणि पुस्तकाच्या शेवटच्या पानावर प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्या १९२१ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तक परीक्षणातला एक परिच्छेद, ही या पुस्तकाची वैशिष्ट्ये आहेत.

'निवडक केशवसुत' मागची एकमेव प्रेरणा म्हणजे मालगुंड येथे उभारल्या जाणाऱ्या केशवसुत स्मारकाची मी वाचलेली बातमी

(१९९०). तेव्हा वाटले, आपण शब्दशिल्पातून हे स्मारक उभारावे. हे पुस्तक प्रकाशित झाले व बघता बघता त्याची पहिली आवृत्तीही संपली. मधु मंगेश कर्णिकांना केशवसुत स्मारकाला भेट द्यायला येणाऱ्या रसिक वाचकांना हे पुस्तक उपलब्ध करुन द्यायचे आहे. परंतु ते आता उपलब्धच नाही. मी त्यांना म्हटले की इतर संपादकांनी संपादित केलेल्या प्रती उपलब्ध आहेत ना? ते चटकन म्हणाले, "मला तुमचाच 'निवडक केशवसुत" हवा आहे.

'असे होते संत' हे बालवाङ्मयाचे आणि सहा व्यक्तिचित्रांचे 'नंदादीप' ही पुस्तकेही मेहतांनी काढली. उत्तम, देखणी निर्मिती हे मेहतांचे वैशिष्ट्य. चोख व्यवहार आणि लेखकावर, लेखनावर अलोट प्रेम. त्यामुळे मैत्री चटकन जमते. ह्या तीनही पुस्तकांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. मला वाङ्मयक्षेत्रात प्रतिष्ठा मिळाली. 'मैत्री, प्रेम आणि साहित्य या त्रिवेणी संगमावर मेहता पितापुत्र उभे आहेत. सोबत अनिल किणीकरांसारखा उत्तम संपादक. म्हणून मेहतांच्या पुस्तकांना एक दर्जा प्राप्त झालेला आहे.

'कुणाच्या खांद्यावर....' ची जन्मकथा

बा. ग. केसकर

पुण्याहून वालचंदनगरला जाताना निरेमार्गे गेलात तर तीन साखर कारखाने लागतात. सोमेश्वर, माळेगाव आणि सणसर! एकामागोमाग एक अशा पंचवीसतीस बैलगाड्या ऊस वाहून आणून कारखान्याला पुरवठा करीत असतात. ऊसाच्या खच्चून भरलेल्या गाडीवर गाडीवान, त्याची बायको, एखादं लहान मूल असं दृश्य नेहमी दिसतं.

या ऊस वाहतूक करणाऱ्या 'नगरी' गाड्यांविषयी मला नेहमी कुतूहल वाटे. मराठवाड्यातून आलेल्या या लोकांना इकडे 'नगरी भौ' म्हणतात. यांच्या ऊसतोडणीच्या अचाट कष्टाविषयी ऐकले होते. पहातही होतो. यावरून एक लघुकथा मनात आकार घेत होती की, या गाडीवानाच्या गाडीवरून त्याचे तान्हे मूल गाडीच्या हिसक्यामुळे खाली पडते, दगावते. त्याचे दुःख - अशा प्रकारची कल्पना बरेच दिवस मनात घोळत होती पण आकार घेत नव्हती. तपशील धूसर होते.

योगायोगानं वालचंदनगर कारखान्याने रेल्वेवहातूक बंद केली आणि आमच्याही कारखान्यावर 'नगरी भाऊ'चा तळ पडला. कथेतील तपशील, त्यांचे जगणे आता अधिक जिवंतपणे आणि वास्तव मांडता आले. त्यांचे मुकादम माझ्या ओळखीचे झाले. मी त्यांच्याशी चर्चा, करू लागलो. त्यांच्या तळावर संध्याकाळी जाऊन बसू लागलो. एकीकडे माल वजन करून देता देता, आलेल्या नगरी भौना मुकादम माझी ओळख करून देत असे व हे मोठे लेखक, यांच्या गोष्टी छापून येतात हो भौऽ, आपल्यानबी कायतरी गोष्ट लिवनार म्हणतेत भौ - असे सांगत असे. बिड्या पीत, तंबाखू मळत ती कष्टकरी माणसे बोलत, आपले अनुभव तुटकतुटक सांगत. त्यातूनच माझा नायक मल्हारी, बंड करून उठणारा पण परिस्थितीनं गार येणारा गोपा - तयार झाला.

मी त्यांच्या जीवनात खोल डोकावत गेलो तेव्हा त्यांचे कष्ट, त्यांचे शोषण यांनी फार अस्वस्थ झालो आणि हा एका कथेचा विषय नसून कादंबरीचा आहे हे ध्यानात आले. मुकादम नावाचा प्राणी या सर्व कष्टकऱ्यांचा कसा शोषक आहे आणि आपले ऊसतोडणीचे काम होतेय ना,

आणि हे धोंगडे आपल्या गळयात नको म्हणून साखर कारखाना चालवणारी मंडळी पण मुकादमाला कसा हातभार लावत असतात हेही ध्यानात आले.

या गाड्यांचा ठेका एखादा मुकादम घेतो. कारखाना त्याला लाख दोन लाख रुपये उचल देतो. ती रक्कम तो या गाडीवानांना बिगरहंगामात उचल म्हणून देऊन गाडी पक्की करतो, बैलांच्या खरेदी पावत्या आपल्या नावावर करून घेतो. कारखान्यावर आल्यानंतर ऊसतोडणीच्या बिलातून उचलीची रक्कम, दुकानाची बाकी सगळी वजावट करून शिवाय गाडीमागे मुकादमाचे कमिशन कापून घेऊन मग त्याला थोडेफार पैसे मिळतात. या सर्व प्रकारात हरबरे खाऊन हात कोरडेच असा प्रकार असतो. कारखान्यावर असताना सगळे काही पेंड, किराणा, कापड, औषध, किरकोळ उचल, शिलाई, हजामत सगळं काही मुकादमच पुरवत असल्याने तो भाव सांगेल ती किंमत. त्यामुळे उचलीची फेड होणे जवळपास अशक्यच असते. उचल नाही फिरली तर व्याज चालू होते. बैलांची निगराणी, बैल दगावणे, गाडीची मोडतोड, कुटुंबाचे आजारपण, गावाकडं जाऊन येणं अशा खर्चामुळे उचल फिरणे अशक्यच! त्यामुळे दरवर्षी नवीन उचलीची भर, व्याज, परतफेड अशा दुष्टचक्रात हे गाडीवान कायमचे अडकलेत.

हंगामी कामगाराला मिळणारा निर्वाह भत्ता (Retiring Allowance) या ऊसतोडणी कामगारांना मिळणे खरे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. ऊसतोडणी बिल टनावर द्या, परंतु बिगर हंगाम भत्ता मिळणे त्यांचा हक्क आहे. त्यांच्या मुलांसाठी साखरशाळा काढणे, निवाऱ्यासाठी चांगल्या सोयी करणे – गाडीतळ आपण एकदा बघायला पाहिजे – पाचराच्या झोपड्या, काळे रान, चुकून पाऊस झाला तर हाल कुत्रे खात नाही. कारखान्याने कायदेशीर पळवाटा काढून जबाबदारी झटकली आणि मुकादम, शेतकी अधिकारी क्वचित चेअरमनपर्यंत ही साखळी कायम! त्यात या ऊसतोडणी स्त्री मजुरांचे अजून हाल! ऊस सवळणे, मोळया वाहणे, गाडीतळावर आल्यावर दळण, पाणी आणणे, स्वैपांक करणे जळणकाटकांची सोय करणे, गोवऱ्या लावणे. अतिशय कामाचा धबडगा!

आता हे लिहिणे तसे म्हटले तर सोपे होते, म्हटले तर अवघड. कादंबरीच्या फॉर्ममध्ये लिहायचे म्हटले तर ओघवते

कथानक, नायकनायिका, त्यांचे नातेवाईक, मुकादम, कारखान्यावरचे अशी पात्रे आली. त्यांचा मराठवाडा मी बघितला नव्हता तो परिसर पहायचा म्हणताना सीझन संपल्यावर त्या मुकादमांच्याच संगे त्यांच्या गावी जाऊन राहून आलो. डोमरी, बेदरवाडी, नवगणराजूरी इ. गावातले ग्रामीण जीवन जवळून पाहिले. तिकडचे खास ग्रामीण शब्द, रीतिरिवाज डायरीत टिपून घेतले.

आता डोक्यात कथा आकार घेत होती. लग्न झाल्यावर पहिल्यांदाच ऊसतोडणीला येणारी नायिका! तिचे स्वप्न – सुखी संसाराचे, पैसे मिळवण्याचे आणि पोराबाळांना नीट वाढवण्याचे – पण पहिलाच सीझन पार पडल्यावर मुकादमाचे शोषण तिच्या लक्षात येते. तिने नवऱ्यापाशी यातून बाहेर पडायचा हट्ट धरणे – कारखान्यावर बागायतदाराच्या मळ्यात वाटा करून स्थिरता आणण्याचा प्रयत्न करणे, यातून त्याच्या मुलाच्या वासनेची शिकार! अगोदरच मुकादमाने भ्रष्ट केलेले शरीर – वगैरे वगैरे – शोषणाचा इतका बारीक विचार करणारी स्त्री त्यांच्यात अजून निर्माण व्हायची आहे.

विशेष वेगळा फॉर्म मी या कादंबरीसाठी वापरला नाही किंवा प्रथम पुरुषी (प्रथम स्त्री!) निवेदनही केले नाही. तसे ठेवले असते तर ती पूर्ण 'नगरी' ढंगाच्या बोलीभाषेत लिहावी लागली असती आणि एक मर्यादा पडली असती. वाचकांच्या रसास्वादात अडथळा आला असता कारखान्यातील कारभाराचे वर्णन, शोषण यासाठी सरळ प्रमाण भाषेत निवेदन आणि संवाद त्या त्या बोलीभाषेत असे लेखन केले.

कथा असो की कादंबरी, माझे लेखन एकटाकी असते. लेखनाअगोदर बरेच दिवस डोक्यांत, मनांत घुसळण चालू असते. पूर्ण कथानक आकार घेईतो मी लिहायला घेत नाही. संगणकाला जसे रिपोर्ट काढायची आज्ञा दिल्यानंतर तो नोंदीतील नेमका भाग अगोदर जुळवून घेतो व एकदा जुळवणी पूर्ण झाली की प्रिंटरला छापायची आज्ञा देतो तसे काहीसे – त्यामुळे लेखन एकटाकी होते आणि ते इतके सहजसुंदर नैसर्गिक होते की त्यात काही बदल करावा, प्रसंग परत परत लिहून काढावा असं वाटत नाही. उलट तशी कारागिरी करायला गेलो तर त्यातील प्राणतत्त्व हरवून जाईल की काय अशी भीती वाटते. कदाचित हा दोषही असेल. पण हा ज्याचा त्याच्या लेखनकामासाठीचा विशेष म्हणावा!

कादंबरी पूर्ण झाली. एकंदर प्रकारामुळे मी ती लढाऊ साखर कामगार पुढाऱ्यांना आणि सहकार महर्षींना अर्पण केलीय. श्रावणाचे दिवस होते. एका सकाळी सकाळी मी व्यंकटेश माडगूळकराकडे गेलो. त्यांनी माझ्या पहिल्या कथासंग्रहाचे प्रकाशन केले होते. त्यामुळे ओळख होती. नवीन काय म्हटल्यावर मी बाड काढले. विषय ऐकल्यानंतर तात्यांनी मान डोलावली. 'कुणाकडे देताय?'' मी विद्या प्रकाशनाचे नाव सांगितले. ओळख नाही म्हणताना

तात्यांनी लगेच आपल्या लेटरहेडवर मधुकाकांना ओळखीचे पत्र दिले. अर्थात ओळखीपुरतेच! मधुकाकांनी काहीशा अविश्वासाने पत्र पाहिले, "मी सकाळी तात्यांच्याकडे गेलो होतो. काही बोलले नाहीत, – बरे, तुम्हाला आमच्या कादंबरी स्पर्धेत ही द्यायची आहे का?" मी होय म्हटले. त्यानी पोच दिली. यथावकाश निर्णय जाहीर झाला. त्यात माझे नाव नव्हते. असो. मग मी स्त्री मासिकाच्या संपादक श्रीमती विद्या बाळ यांच्याकडे गेलो. त्यावेळी माझ्या बऱ्याच कथा स्त्री मासिकात प्रसिद्ध झाल्या होत्या. आपली कादंबरी क्रमशः प्रसिद्ध व्हावी ही इच्छा होती. दोन महिन्यांनी त्यांचे उत्तर – कादंबरी चांगली आहे पण मासिकातून क्रमशः करण्यासारखी नाही. मी पुण्याला जाऊन ते बाड परत घेतले आणि हंस प्रकाशनाच्या आनंद अंतरकरांच्याकडे दिले. त्यांनीही माझ्या कथा छापल्या होत्या व त्यांनीही योग्य वेळ घेतल्यानंतर भेटीत सांगितले की कादंबरी पुरीशी मनोविश्लेषणात्मक नाही. अजून असेच काही! आता ग्रामीण मनाचे कसले मनोविश्लेषण! ग्रामीण मन घटनेला सरळ सामोरे जाते आणि काथ्याकूट करत न बसता निर्णय घेते किंवा आहे हे वास्तव स्वीकारते. म्हणूनच अनेक हालअपेष्टा सोसत ते अजून आपली मायभू घट्ट धरून आहेत.

त्यावेळी ग्रंथाली चळवळ जोरात होती. अनिल बळेल काम पहायचे. शिवाय प्रा. प्र. ना. परांजपेही होतेच. मी अनिल बळेलना कादंबरी दिली. त्यांनी ती परांजपे यांना दिली. त्यांनी अनिल बळेल यांच्याकडून बाड परत नेण्याविषयी सांगितले. माझे हे ओझे कोणीच आपल्या खांद्यावर घेण्यास तयार नव्हते. मी निराश झालो. मनात म्हणालो, अरे बाबांनो, माझे नाव नका देऊ पण या कष्टकऱ्यांची वेदना, शोषण हे तरी छापा.

–नंतर पुढे सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार बाबा पाटील एकदा त्यांच्या मित्रांकडे वालचंदनगरला आले. माझीही त्या मित्रांमुळे बाबांची ओळख झाली होती. ते त्यावेळी मेहता पब्लिशिंगचे काम पहात होते. पण माझे धाडस झाले नाही की ही कादंबरी वाचा म्हणून! आमच्या मित्रांनीच बाबांना ही कादंबरी वाचायला म्हणून द्यायला लावली. बाबांनी ती वाचली आणि अनिल मेहतांना प्रकाशनासाठी स्वीकारा म्हटले. कादंबरी एकदाची प्रसिद्ध झाली.

मग मात्र वाचकांची पसंती पत्रे, समीक्षकांचे समीक्षण सुरू झाले. डॉ. मेधा सिधयेंनी 'माणूस'मध्ये चांगले परीक्षण लिहिले. म. वि. गोखले यांनी पुणे आकाशवाणीवर तर अविनाश सप्रेंनी सांगली केंद्रावर परीक्षण केले. शिवाय कोठे कोठे लिहून आले. त्याचा पत्ता नाही. पण मेळाव्यात लोक सांगत, कौतुक करत. श्री. शं. ना. नवरे यांनी सविस्तर पत्र लिहून तुम्ही ही कोल्हापूरकडच्या एखाद्या निर्मात्याला द्या. उत्तम चित्रपट निघेल असा सल्ला दिला. पण आमच्या खास मराठमोळ्या स्वभावामुळे मी तसा प्रयत्न केला नाही.

आणि एके दिवशी कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'ह. ना. आपटे पुरस्कार' मिळाल्याची तार आली. आनंद झाला. प्रा. स.शि. भावे आणि डॉ. द. ता भोसले परीक्षक होते. नंतर एकदोन वर्षांनी रामदास फुटाणे यांचे पत्र आले. मी याच्यावर चित्रपट काढतो. परवानगी द्या. त्यांना माझे कविमित्र चांदवडचे प्रा. सतीश पिंपळगावकरांनी कादंबरी देऊन भलावण केली होती.

तर या कादंबरीवर चित्रपट निघाला. माझ्या मनातील सुर्वंता ही नायिका प्रत्यक्षात पडद्यावर आली. ३२व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात चित्रपटाला उत्कृष्ट ग्रामीण चित्रपटाचे पारितोषिक मिळाले आणि समारंभानंतर 'ताजमहाल' मध्ये भोजन. जॅकी श्रॉफ, अमोल पालेकर, सांस्कृतिक मंत्री प्रमोद नवलकरांच्या बरोबर.

मी हातातल्या थाळीतला पदार्थ घेऊन गेटवेकडे पाहिले. उत्तररात्र झाली होती. समुद्र शांत होता. तिकडे भल्या पहाटे ऊसतोडणीसाठी जाणारी 'सुर्वंता' उठली असेल. शिळ्या भाकरीचं गठूळं, कमरेला विळा – तिच्या वेदनेच्या भांडवलावर आम्ही मुंबईच्या ताजमहालमध्ये जेवत होतो आणि ती अजूनही पळत पळत नाहीतर भरल्या ऊसाच्या गाडीवर शिळ्या भाकरीचे तुकडे मोडत असेल. सीझन संपल्यावर उन्हाळ्यात परत गावाकडे जाताना रणरणत्या उन्हात तिच्या पायात पायताण सुद्धा नसेल!

कादंबरी प्रसिद्ध झाली, चित्रपट निघाला, मराठवाड्यातले उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते चित्रपटाचे प्रदर्शन झाले पण कोणीही यातल्या मूळ समस्येकडे बारकाईने बघितले नाही. त्यानंतर थोड्याच दिवसात त्यांनी एका मुकादमाला हाताशी धरून तर काँग्रेसच्या बबनराव ढाकणे यांनी दुसऱ्या मुकादमाला जवळ घेऊन संप केला, फोडला. साहित्याने जगात काही बदल होतो यावरचा माझा विश्वास उडालाय. नाहीतर गाजलेल्या 'एकच प्याला' नाटकामुळे दारुबंदी झाली असती. आता सुधाकरबरोबर सिंधूही त्याला दारूची कंपनी देते आणि 'एकच प्याला' नाटकाचे कौतुक करते. जग बदलूया म्हणणारे जातात. जग आपल्या पद्धतीने बदलत असते असे कोणीतरी म्हटले आहे. तेच खरे!

असो! एक अस्वस्थ करणारा विदारक अनुभव मराठी वाचकांच्या पर्यंत, प्रेक्षकापर्यंत पोचवता आला, बाबा पाटील यांच्यामुळे आणि मेहता पब्लिशिंग हाऊसमुळे पोचवता आला, एवढे समाधान निश्चित आहे.

ल
व
क
र
च
उपलब्ध

अणसार

मूळ गुजराती लेखिका
वर्षा अडालजा
अनुवाद
अंजनी नरवणे

चित्रकलेकडून विज्ञानाकडे

डी. एस्. इटोकर

दारासमोर वाहणाऱ्या सांडपाण्याच्या नालीवर पात्यापात्याचे पत्र्याचे चाक स्पोकच्या सहाय्याने आडवे ठेवले की ते फिरत राहायचे. त्याचे चक्राकार फिरणे पहात बसणे हा माझा लहानपणीचा आवडता छंद. पुढे निरनिराळे प्रयोग वाचनात आले. बाजारात सहज उपलब्ध होणारी साधने विकत घेऊन त्यांच्या सहाय्याने पुस्तकातील प्रयोग घरी करुन पाहणे, दुसऱ्यांना दाखविणे असा छंदच जडला. त्यातून विज्ञानाच्या भौतिकशास्त्राची आवड निर्माण झाली.

जिज्ञासेपोटी शास्त्रज्ञांच्या चरित्रांची पुस्तके मी वाचली. भिंगे, चुंबक, सेल, बल्ब ह्या वस्तू जमा करून वेगवेगळे प्रयोग करण्यात सुटीचा दिवस कसा निघून जायचा ते समजतही नसे. सापडलेल्या वस्तू, घरातील निरुपयोगी वस्तू एका खोक्यात भरून ठेवीत असे. सुटीच्या दिवशी त्या बाहेर काढून कोणत्या वस्तूपासून काय तयार करता येईल याचा विचार करीत असे. टाकाऊ वस्तूपासून खेळणी तयार करण्याची सवयच लागली.

विमानाचा शोध लावणाऱ्या राईट बंधूंवरचे पुस्तक वाचनात आले. राईट बंधूच्या आईने त्यांना सांगितले होते की, 'कोणतीही नवीन कल्पना डोक्यात आली की, प्रथम कागदावर आराखडा काढा. त्यात काही त्रुटी आहेत का याचा विचार करा. नंतर प्रत्यक्ष प्रयोगाला सुरुवात करा.' हे वाक्य माझ्या मनात पक्के बसले. मीही आराखडे काढून नंतर प्रयोग करु लागलो. त्यामुळे खेळणी झटपट व चांगली होत.

विज्ञानाची आवड असूनही मला उच्च शिक्षण घेता आले नाही. मी चित्रकलेकडे वळलो. मुंबईच्या जे. जे. स्कूल मधून आर्टमास्टरची पदवी घेतली व चित्रकला शिक्षक म्हणून नोकरीला लागलो. विज्ञानात काहीतरी करावयाची इच्छा तशीच राहून गेली. पण विज्ञानाची आवड असल्याने प्रयोग करणे व खेळणे सुरूच होते.

एक दिवस इचलकरंजीच्या श्री. द्वा. वा. केळकर यांचे 'शास्त्रीय उपकरणे' ही हे पुस्तक वाचण्यात आले. मी जे काही प्रयोग करतो ते याच धर्तीवर आहेत याची मला जाणीव झाली. शास्त्रीय ज्ञान नुसते सांगून शिकविले तर ते लक्षात राहत नाही. तेच प्रयोगाद्वारे किंवा खेळण्याच्या माध्यमातून दिले तर अधिक पक्के होते. म्हणून मी शास्त्रीय तत्त्वाची बैठक कायम ठेवून त्यावर आधारित खेळणी तयार करण्याच्या दृष्टीने काही कृती केल्या व लिहून काढल्या. गंमत म्हणून ह्या कृती आकृती वगैरे काढून – अकोला येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'दैनिक देशोन्नती' ह्या वर्तमानपत्राकडे पाठवून दिल्या. रविवारच्या पुरवणीत त्या कृती येण्यास सुरुवात झाली. एका महिन्याच्या आतच बालवाचकाची अनेक पत्रे मला मिळाली.

'आणखी लेख लिहा, आम्हाला ते आवडतात, आम्ही ते प्रयोग घरी करून पाहिले. आम्हाला यश मिळाले' अशी पत्रांनी माझा आत्मविश्वास वाढला.

दोन वर्षे ह्या दैनिकात मी 'हसत खेळत' ही विज्ञान मालिका चालविली. अमरावती येथून 'प्रगत विज्ञान' मासिक निघत असे. त्यातील 'विज्ञान धडपड' ह्या सदरासाठी दरमहा लेख पाठवू लागलो. अशा प्रकारे बराच सराव झाला.

माझ्या कल्पना संपुष्टात येऊ लागल्या तेव्हा संदर्भ ग्रंथ, वैज्ञानिकांची माहिती, त्यांची चरित्रे इ. वाचण्यास सुरुवात केली. निरनिराळी मासिके वाचली. त्यातून कल्पना सुचत गेल्या, त्यावर लिहू लागलो. आमच्या चिखली शहरातील 'श्री शिवाजी डी. एड्. कॉलेज' 'युनिसेफ' या संस्थेने दत्तक घेतले होते. त्यामुळे त्यांच्या प्रयोगशाळेत विज्ञानविषयक उपकरणे व पुस्तके भरपूर होती. ती वाचण्याची परवानगी संस्थेच्या प्राचार्याकडून घेतली व सर्व पुस्तके वाचून काढली. वाचताना एखादी कल्पना सुचली तर कागदावर आकृती काढून टिपण करीत असे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील भौतिक शास्त्राची पुस्तके व मासिके वाचून काढली.

अशा प्रकारे विज्ञानातील बरीच तत्त्वे माहित झाली. त्यावर आधारलेली सोपी खेळणी तयार करून पाहिली. तत्त्व सिद्ध करण्यापुरता प्रयोग केला तर तो कंटाळवाणा होतो. त्याच तत्त्वावर एखादे खेळणे तयार केले तर ते तत्त्व मनात पक्के रुजते. त्यामुळे लेख लिहिताना आपण एखादे खेळणे तयार करण्याची कृती लिहीत आहो अशा थाटात लेखन करीत राहिलो. बालवाचक हे लेख आवडीने वाचू लागले. काही अडचणी आल्यास पत्राने मला विचारू लागले. त्यांच्या शंका दूर करण्यासाठी

आकृती काढून पत्रे पाठविण्यात एक वेगळाच आनंद मिळू लागला. आलापलीच्या डोंगराळ भागातूनही पत्रे येत. मुलांच्या मनात विज्ञान आहे पण त्याला चालना देणारे साहित्य पुरवले गेले पाहिजे याची मला जाणीव झाली. या लेखांचे पुस्तक काढण्याचा विचार मनात आला.

विज्ञान शिक्षकांनीही तसे सुचवले. मी मोठी हिंमत करून माझे हस्तलिखित मेहता यांचेकडे पाठवून दिले. त्यांचे पत्र आले की, एक महिन्यात निर्णय कळवितो. अर्धा जीव भांड्यात पडला. महिन्याऐवजी पंधरा दिवसातच मेहता यांचे पुस्तक प्रकाशनासाठी स्वीकारल्याचे पत्र आले.

बरोबर एक वर्षाने पोस्टमनने 'वैज्ञानिक खेळणी' ह्या पुस्तकाच्या वीस प्रतींचे पार्सल आणून दिले. सुंदर गुलाबी रंगाचे मुखपृष्ठ, ठळक छपाई, सफाईदार व बोलक्या आकृत्या यामुळे हे पुस्तक आपणच लिहिले की काय अशी शंका वाटली. आपण खरोखरच लेखक झालो याचा आनंद वाटला. हा आनंद पेढे वाटून साजरा केला. पुस्तकाच्या प्रती मान्यवर मंडळींना भेट दिल्या. 'विज्ञान लेखक' बुलढाणा जिल्ह्यात माझे नाव झाले. पुढे अनेक वाचकांची पत्रे आली. विज्ञान प्रदर्शनात ह्या पुस्तकाचा खप झाला.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

चित्रकल्प आर्ट इन्स्टिट्यूट

सरकारी चित्रकला ग्रेडपरीक्षा, छंद वर्ग, पोर्ट्रेट, पेंटिंग,
फॅब्रिक पेंटिंग सेमी फाऊंडेशन कोर्स, तबला वर्ग

एम. ग्राफिक्स

सर्व प्रकारची डी.टी.पी.ची कामे केली जातील.

संपर्क : **चित्रकार आपटे**
१२५९/६०, सदाशिव पेठ, निंबाळकर तालीम चौक,
सुजाता कोल्ड्रिंकच्या वर, पुणे-३०.८ ४८५०४३

शाखा : धनकवडी, मुकुंदनगर, महर्षिनगर, राजेंद्रनगर

दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्वे

आशा कर्दळे

माझ्या लेखकीय कारकीर्दीत १९९६ साल फार महत्त्वाचं ठरलं. दोन चांगल्या पुस्तकांचा माझ्या हातून अनुवाद झाला. एक 'आय डेअर' (किरण बेदी) आणि दुसरं 'माय स्टोरी' (इनग्रिड बर्गमन).

श्री. अनिल मेहता चांगली इंग्रजी पुस्तकं मराठीत आणण्यासाठी सतत प्रयत्नशील. एक दिवस त्यांचा फोन आला. 'पुस्तक माझ्यासमोर आहे. लगेच येऊन घेऊन जा. वाचून कळवा. आवडलं तर लवकर म्हणजे एक दीड महिन्यात अनुवाद करून हवा आहे.' मी गेल्यावर त्यांनी जे पुस्तक हाती दिलं, ते होतं किरण बेदी यांचं चरित्र – 'आय डेअर!' पुस्तक बघताक्षणीच मला त्याचं बाह्यरूप भावलं. हिरव्या रंगाचं मुखपृष्ठ आणि त्यावर किरण बेदींचं पोलिसी वेषातलं मोहक छायाचित्र. शीर्षक तर इतकं चपखल, की हे शब्द फक्त किरण बेदीसारखी निर्भय स्त्रीच उच्चारू शकते.

अनुवाद करायला सुरुवात केली. दिल्लीचे श्री. परमेश डंगवाल हे मूळ लेखक. किरण बेदी यापूर्वी वेळोवेळी निरनिराळ्या कारणांनी वृत्तपत्रांमधून भेटल्याच होत्या. दरवेळी काही वादग्रस्त कारणांनी त्या प्रसिद्धीच्या झोतात असायच्या. कधी वकिलाला बेड्या घातल्या म्हणून, कधी खुद्द पंतप्रधानांची गाडी क्रेन लावून रस्त्यावरून उचलली म्हणून, कधी गोव्यातून, मिझोराममधून रहस्यमयरीत्या निघून यावं लागलं म्हणून, तर कधी तिहार तुरुंगाचं आदर्श आश्रमात रूपांतर करूनही काही प्रवादामुळे केन्द्रशासनानं अचानक बदली करून टाकली म्हणून!

किरण बेदींच्या नावाशी निगडित असलेल्या सर्व रंजक कहाण्या अनुवाद करताना पुस्तकात भेटल्याच. पण ते तेवढंच नव्हतं. त्यातून दिसली एक करारी स्त्री. बालपणापासून आईवडिलांच्या संस्कारांमुळे वेगळ्या अंगानं वाढलेली. निश्चित ध्येय ठरवून भारतीय पोलीस सेवेत दखल झालेली आणि पुढे सेवेच्या काळात शासनाच्या प्रतिकूल वर्तणुकीला धीरानं तोंड देणारी आणि शिक्षा म्हणून मिळालेल्या 'डम्प पोस्टिंग'चंही सुवर्णसंधीत रूपांतर करणारी एक पोलीस अधिकारी. हे पुस्तक प्रसिद्ध

झालं तेव्हा किरण बेदींच्या आयुष्यातलं झळाळतं तिहार पर्व नुकतंच संपलं होतं.

मुळातल्या पुस्तकाची भाषा अगदी सरळ. सरकारी कामकाजातील असावी तशी. ती तशी असणं स्वाभाविकही होतं, कारण किरण बेदी सरकारी नोकरीतल्या. अनुवाद शब्दशः नाही, पण प्रामाणिक करायचा होता. कुठल्याच ठिकाणी संक्षेप किंवा बदल अजिबात नको होता. पोलिसी सेवेतल्या हुद्द्यांचे उल्लेख पानोपानी येत होते. किरण बेदींबद्दलच्या रसभरित कहाण्या सांगणं हा उद्देश लेखकाचा नव्हताच. सगळ्या प्रसंगांचं वर्णन अगदी वस्तुनिष्ठ पद्धतीनं केलेलं. स्वतः किरण बेदी आयुष्याकडे, आपल्या कामाकडे अत्यंत गांभीर्यानं पाहतात. त्याच वृत्तीचं प्रतिबिंब पुस्तकात पडलेलं.

अनुवाद अगदी वेळेत आणि सहज झाला. पुढे जो अनुभव आला तो केवळ अपूर्व होता. पुस्तकाचं सर्वच थरांवर अभूतपूर्व स्वागत झालं. राज्य पुरस्कारानं पुस्तकाच्या यशावर शिक्कामोर्तब केलं. अर्थात ही सर्व जादू होती किरण बेदी या नावाची आणि व्यक्तिमत्त्वाची.

पुस्तकाचा प्रकाशन समारंभ अनिल मेहता यांनी कोल्हापूरला अगदी थाटात केला. स्वतः किरण बेदी आल्या होत्या. शिवाय त्यावेळी प्रशासन सेवेतून राजीनामा देऊन बाहेर पडलेले आणि गाजत असलेले श्री. अविनाश धर्माधिकारी पुस्तकावर बोलले. कोल्हापूरकरांनी कार्यक्रमाला प्रचंड गर्दी केली. जिकडे तिकडे हेच पुस्तक दिसत होतं. जणू सारं कोल्हापूर हिरवं आणि किरणमय होऊन गेलं होतं!

माझ्यापुरता या पुस्तकाचा मला झालेला मोठा लाभ म्हणजे किरण बेदींचा सहवास मिळाला. सकाळी पुणे विमानतळावर त्यांना उतरवून घेतल्यापासून कोल्हापूरला जाणं, तिथला मुक्काम, परत पुण्याला येणं, सगळं आजही पुन्हा पुन्हा आठवतं. या वेळात त्यांना जवळून ओळखता आलं. एवढ्या मोठ्या व्यक्तीशी काय बोलायचं हा प्रश्नच व्यर्थ ठरवणारं त्यांचं मनमोकळं तरीही बुद्धिमत्तादर्शक हसू. पुरणपोळी कशी करायची याही विषयात त्यांनी रस घेतल्यावर प्रश्नच मिटला! पण त्याच वेळी देशातल्या परिस्थितीविषयी, आपल्या राजकारणाविषयी, आपल्या नेतेमंडळींविषयी त्या जे बोलल्या, ते त्यांची मूलभूत विचारशक्ती दर्शवणारं होतं. पुस्तकातल्यापेक्षाही प्रत्यक्षातल्या किरण बेदी अधिक परिमाणं असलेल्या होत्या.

या सहवासात त्यांच्या विलक्षण लोकप्रियतेचा जो प्रत्यय आला, तो थक्क करणारा होता. विशेषतः तरुण पिढी त्यांच्यासाठी अगदी वेडी झालेली आणि त्यांना आदर्श मानणारी. या मुक्कामात त्यांनी किमान तीनशे-चारशे प्रतींवर सह्या केल्या. प्रत्येक तरुण मुलगी म्हणत होती, आम्हाला तुमच्यासारखं व्हायचं आहे!

माझ्या नात्यातल्या, परिचयातल्या अनेक व्यक्तींनी हे पुस्तक मुद्दाम विकत घेऊन इतरांना भेट दिलं. ललित मासिकाच्या लक्षवेधी पुस्तकांमध्ये आय डेअर आणि माय स्टोरी या दोन्ही पुस्तकांचा समावेश झाला. किरण बेदींवर आणि 'आय डेअर'वर बोलायला बरीच आमंत्रणं आली. ती गोष्ट प्रत्यक्षात येवो न येवो, पण 'मी आत्मचरित्र लिहिते आहे आणि त्याचा अनुवाद तुम्हालाच करावा लागेल' असं त्यांनी म्हणणं हेच या पुस्तकाच्या जन्माचं मी सार्थक समजते.

'माय स्टोरी'ची जन्मकथा थोडी निराळी. इनग्रिड बर्गमन या रूपसुंदर, अभिनयसंपन्न अभिनेत्रीचं हे आत्मचरित्र आधीच जगभर खूप गाजलेलं. ते माझ्याकडे अनुवादाला आलं तेव्हा मला खूप आनंद झाला. मानवी भावभावनांचा कल्लोळ असलेलं हे पुस्तक भरपूर पृष्ठसंख्या असलेलं. हॉलिवूडच्या सुवर्णयुगावर आपली कसदार मुद्रा उमटवणाऱ्या अभिनेत्रीची सगळी दीर्घ कारकीर्द रेखाटायला इतकी पानं हवीतच. अनुवादाला नऊ महिने लागले.

मूळ इंग्रजीमध्ये हे आत्मकथन तीन स्तरांवर आकार घेतं. इनग्रिडचं प्रथम-पुरुषी कथन, तिच्या डायऱ्या आणि पत्रांमधलं प्रथमपुरुषी लिखाण, आणि ॲलन बर्गेस या सहलेखकाचं तृतीय-पुरुषी निवेदन. डायऱ्या आणि पत्रांमधल्या इनग्रिडच्या लिखाणाला ॲलन बर्गेसनं स्वतःच्या निवेदनानं आणि वृत्तपत्रांमधल्या मजकुरानं जुळवून घेतलं आहे. काही ठिकाणी हे जोडकाम अनावश्यक वाटल्यानं आणि त्यातली सलगता खंडित होते आहे असं दिसल्यानं संपूर्ण लिखाण प्रथमपुरुषी निवेदनात रूपांतरित करून घेतलं. वाचक आणि इनग्रिड यांच्यामध्ये तिसरं कुणी असू नये असं वाटल्यानं हा बदल करण्याचं स्वातंत्र्य घेतलं. अनुवादाला सुरुवात करण्यापूर्वी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' चे संपादक अनिल किणीकर यांच्याशी चर्चा केली. तीन स्तरांवर असलेलं मूळ पुस्तक मराठीत आणताना एक ओघ राहावा म्हणून त्याचा ढाचा बदलण्याची कल्पना त्यांचीच. मलाही ती पटली.

अनुवादाला प्रारंभ केल्यावर मी तर इनग्रिड बर्गमनच्या अक्षरशः प्रेमातच पडले. याआधी लिव उलमनच्या 'चेंजिंग' या आत्मकथनाचा अनुवाद केला असल्यानं ते सगळं वातावरण परिचित होतं. लिव नॉर्वेची तर इनग्रिड स्वीडनची. म्हणजे दोघी शेजारी देशांमधल्या अभिनेत्री म्हणून त्या महान होत्याच, पण स्त्री म्हणून मला त्या आपल्यापेक्षा कुठंही वेगळ्या वाटल्या नाहीत. कलेच्या क्षेत्रात यशाची नवी नवी शिखरं

गाठताना स्वतःच्या मुलांसाठी होणारी जिवाची घालमेल तीच!

इनग्रिड तर अतिशय बुद्धिमान. तिच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाच्या खुणा 'माय स्टोरी'मध्ये सर्वत्र दिसतात. तिचं आयुष्य खरोखरच विलक्षण म्हणावं असं. हे आत्मकथन इतकं रसाळ आहे की, मलाही अनुवाद करताना बरंच मोकळं वाटत होतं आणि मराठीचं पूर्ण मराठीपण त्यात ओतता आलं. कारण तांत्रिक असं त्यात काही नाही.

याच पुस्तकात इनग्रिडनं एका ठिकाणी म्हटलं आहे की, एखादी भूमिका मला पूर्ण कळल्याशिवाय, मला नेमकं काय करायचं आहे ते समजल्याशिवाय मी त्या भूमिकेला कधी हात घालत नसे. या पुस्तकाचा अनुवाद करण्यापूर्वी मलाही इनग्रिड समजून घेणं आवश्यक वाटलं. कारण ती जगातल्या सर्वश्रेष्ठ अभिनेत्रींपैकी एक. डेव्हिड सेल्झनिक, ग्रेटा गार्बो, हम्फ्री बोगार्ट, गॅरी कूपर, इंगमार बर्गमन, स्पेन्सर ट्रेसी, आल्फ्रेड हिचकॉक, चार्लस् बॉयर, व्हिक्टर फ्लेमिंग या महान दिग्दर्शक आणि कलाकारांबरोबर तिनं काम केलं. या आत्मचरित्रातून हॉलिवूडच्या सुवर्णयुगाचा संपूर्ण इतिहासही उभा राहतो. त्यामुळे मी या सगळ्यांचे मिळतील ते चित्रपट बघायचा धडाका सुरू केला. इंगमार बर्गमनची 'बर्गमन ऑन बर्गमन', 'मॅजिक लॅन्टर्न' ही पुस्तकं वाचून काढली. नॅशनल फिल्म अर्काइव्हज्‌मध्ये जाऊन इनग्रिडचे 'कॅसाब्लँका', 'ऑटम सोनाटा', 'इन ऑफ द सिक्स्थ हॅपीनेस' हे चित्रपट पाहिले. विशेषतः 'इन ऑफ द सिक्स्थ हॅपीनेस' पाहिल्यावर तिच्या अभिनयसामर्थ्यानं झपाटून गेले. कवी ग्रेस यांना ती, तिचे डोळे इतके का आवडतात ते कळलं. इनग्रिड एकदा अशी मनात भिनल्यावर 'माय स्टोरी' मधल्या तिनं लिहिलेल्या प्रत्येक वाक्याचा अर्थ अचूक कळला.

वाचकांनी या पुस्तकाचं स्वागत फारच उत्तम केलं. परीक्षणं किती आली त्याला गणतीच नाही. श्री. शंकर सारडा यांनी साप्ताहिक सकाळमध्ये खूपच सविस्तर परीक्षण केलं. हे पुस्तक खूप आवडल्याचं आवर्जून सांगणाऱ्या व्यक्ती म्हणजे शांताबाई शेळके, डॉक्टर अनिल अवचट, आनंद यादव, डॉ. गं. ना. जोगळेकर, अरुण साधू, डॉ. अरुण टिकेकर, मृणाल कुलकर्णी आणखी इतर बरेच. मृणाल स्वतः अभिनेत्री, तिनं हे पुस्तक नुसतंच वाचलं नाही, तर त्याचं परिशीलन केलं, इतरांना विकत घेऊन दिलं. या पुस्तकावर पत्रं खूप आली. ती पुस्तकांवर प्रेम करणाऱ्या वाचकांची. डोंबिवली इथून एका साठीच्या स्त्रीनं लिहिलं होतं, माझ्या डोळ्यांचं मोतीबिंदूचं नुकतंच ऑपरेशन झालं. डॉक्टरांनी वाचायला मनाई केलेली. पण हे पुस्तक वाचायला सुरुवात केली आणि आठ दिवसात पाचशे पानं संपवूनच खाली ठेवलं. अजमेरहून एक गृहस्थ लिहितात, माझी पत्नी पार्किन्सननं अंथरुणाला खिळून होती. मी पुण्याहून

काही पुस्तकं मागवली, त्यात आवर्जून 'माय स्टोरी' मागवलं. ती तेच मला वाचायला सांगायची. अखेरच्या दिवसात तेच तिनं ऐकलं. पुण्याचेच एक डॉक्टर म्हणतात, मी हे पुस्तक पुन्हा पुन्हा वाचलं. श्रीखंड चाटून पुसून खाताना कुठं एखादी केशराची काडी सापडेल या आशेनं पुन्हा भांडं बोटांनी चाटावं, तसा मी या पुस्तकाचा आस्वाद हपापून घेतला! लेखकांवर निरपेक्ष प्रेम करणारे हे वाचक मला मोलाचे वाटतात. त्यांना उलट उत्तराची सुद्धा अपेक्षा नसते.

दोन भिन्न क्षेत्रांमधली मोठी व्यक्तिमत्त्वं या पुस्तकांच्या अनुवादाच्या काळात माझ्यात राहायला आली होती, त्यांनी माझा तेव्हा कब्जा घेतला तो अजूनही सोडलेला नाही हेच या पुस्तकांचं फलित! अनुवादापूर्वीची मी आणि नंतरची मी वेगळी होते हा आनंद.

■

१९९८ मधील आमची नवीन प्रकाशने

कादंबरी

मी आणि माझा बाप	द. ता. भोसले
चितेवरच्या कळ्या	वसंत गायकवाड
मूल	संजोग वीरकर
डिस्क्लोजर	अनु. माधव कर्वे
इ्लाटाज् डायरी	अनु. ज्ञानदा नाईक
कमान	विजया राजाध्यक्ष

कथासंग्रह

सातव्या मुलीची सातवी मुलगी	अशोक पाटोळे
मायामृग	अनु. उमा कुलकर्णी
कालिंदीच्या तीरावरती	य. दि. फडके

ललितगद्य

रंग सुखाचे	डॉ. रमा मराठे
कोलाज	शिरीष पै
शेलका साज	शिवाजी सावंत

पाकशास्त्र

खानाखजाना	अंजनी नरवणे
मुलांसाठी गमतीजमतीचा स्वयंपाक	अनु. आशा परुळेकर

आवर्जून वाचावे असे...

'भविष्याचा विचार करताना, किरण तिची काही मते आणि 'अंदाजी योजना' सांगते.

'पोलीस सेवेत मी फक्त तेवीस वर्षे घालवली आहेत. अनेक संघटनांची प्रमुख पदे मी भूषवली नसतील, पण मला विविध प्रकारचे जे अनुभव मिळाले, ज्या परिस्थितीशी मी लढा दिला, ज्या तीव्रतेने आणि गंभीरपणाने कामांची विविधता अनुभवली, ते सार फार मोठे आहे. मी माझे आयुष्य अत्यंत समृद्धपणे क्रीडा, शिक्षण, पोलीस सेवा आणि लोकांबरोबर समाजकार्य यात गुंतवले आणि ते बक्षीसपात्र ठरले. देवाची दया आणि माझे नशीब चांगले म्हणून मी कठोर परिश्रम करू शकले आणि जे मिळवायचे होते ते मिळवू शकले. ईश्वर कृपेने प्रत्येक आव्हानाकडे शिकण्याची एक संधी म्हणून मी पाहू शकले. स्वतःला वाढू देण्याची संधी, स्वतःची परीक्षा घेण्याची संधी, मी कोण आहे ते शोधण्याची संधी. कधीही हार मानायची नाही, प्रयत्न सोडून द्यायचे नाहीत हे मी आयुष्यात सुरुवातीलाच शिकले होते. आजही मी याच तत्त्वाला चिकटून आहे. जे नैतिकदृष्ट्या चुकीचे आहे त्याविरुद्ध लढायला मी शिकले होते. आजही परिणामांची तमा न बाळगता मी तेच करते. भोवऱ्यात उडी घेण्यापूर्वी मी त्याची खोली कधीच मोजली नाही. मी उडी घेतली, कारण माझ्या सद्सदविवेकबुद्धीची ती मागणी होती. माझ्या दृष्टीने परिणामांपेक्षा नीतिपूर्ण स्वत्व जास्त महत्त्वाचे होते.'

आय डेअर : किरण बेदी *अनुवाद : आशा कर्दळे*

पृष्ठे : २५६ *किंमत : दोनशे रुपये*

आपल्या सुंदर बागेसाठी...

आ. बा. पाटील

झाडावर प्रेम न करणारा माणूस विरळाच! मी तर शेतीखात्यात नोकरीला असल्याने माती, पिके, भाजीपाला, झाडे यांचा दररोज संबंध. असे असले तरी फुलझाडांची मात्र फारशी माहिती नव्हती. कारण फुलझाडांची लागवड पूर्वी फार लोक करीत नव्हते. सध्या ज्याप्रमाणे व्यापारी पद्धतीवर फुलशेती करतात त्याप्रमाणे २० वर्षांपूर्वी फुलशेती फार प्रमाणावर नव्हती.

१९७१मध्ये आम्ही नवीन घर बांधले आणि तेथे रहायला गेलो. आमच्या घराच्या तिन्ही बाजूला भरपूर मोकळी जागा होती. त्या जागेत आपण छान बाग करावी, त्यात फुलझाडे, भाजीपाला लावावी असा मी विचार केला. म्हणून बंगला बाग किंवा परसबाग कशी करावी यासंबंधींच्या पुस्तकांचा शोध मी घेऊ लागलो. परंतु नवीन बाग करणाऱ्या माणसाला बागेच्या नियोजनापासून त्यात कोणती झाडे कोठे लावावीत, त्यासाठी खड्डे, वाफे कसे करावेत याची चांगली माहिती देणारे पुस्तक मराठी भाषेत तरी मला आढळले नाही. अशा परिस्थितीत आपणच या विषयावर एखादे पुस्तक लिहिले तर काय हरकत आहे, असा माझ्या मनात विचार आला. त्याचवेळी माझ्या एका प्रकाशक मित्राने सांगितले की या विषयावरील पुस्तकास फार मागणी आहे. परंतु चांगले मराठी पुस्तक नाही. म्हणून तुम्ही या विषयावर पुस्तक लिहा असे त्याने सुचविले.

माझी स्वत:ची अडचण सोडविण्यासाठी, माझे फुलबागेचे ज्ञान वाढविण्यासाठी मला अनेक पुस्तके वाचणे आवश्यक होते. भाजीपाला, फळझाडे हे विषय मला नवीन नव्हते. त्यावर आतापर्यंत अनेकदा लिहिले होते. म्हणून या विषयातील इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतील जेवढी मिळतील तेवढी पुस्तके मिळवली. त्यांचे वाचन केले, त्यातील मजकुरावर टिपणे काढली.

कोणत्याही विषयावर लेखन करण्यापूर्वी मी त्या विषयावरची अनेक पुस्तके वाचतो. आपल्या अनुभवाशी त्यांची सांगड घालतो. आपणास न पटणारी माहिती एखाद्या लेखकाने दिली असल्यास दुसऱ्या लेखकाने त्या

विषयावर काय लिहिले आहे याचा शोध घेतो. आवश्यकता भासल्यास तिसऱ्या लेखनाचे मत तपासतो. तरीही शंका राहिल्यास या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीशी चर्चा करतो. कृषी महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन तेथे पाहतो. मग मनात त्या विषयाची मांडणी नक्की करतो. त्याप्रमाणे कागदावर संपूर्ण पुस्तकातील विषयाचा थोडक्यात आराखडा तयार करतो. या कामात बरेच दिवस जातात. 'सुंदर आपली फुलबाग' आणि 'सुंदर आपली फळबाग' या दोन्ही पुस्तकांच्या बाबतीत तसेच झाले.

मनात विषयाचा ढाचा तयार झाल्यानंतर मग लिहायला सुरुवात करतो. माझी दोन पुस्तके नव्हती. मी एकच पुस्तक लिहिले होते. 'सुंदर माझी बाग' असे त्याचे नाव होते. त्यात फुले, फळे, इतर झाडे यांची माहिती दिली होती. माझ्या एका पुस्तकाची दोन पुस्तके करण्याची कल्पना श्री. सुनील मेहता यांची. फुले आणि फळे तशी वेगळीच असतात. एकच मोठे पुस्तक प्रसिद्ध करण्यापेक्षा 'सुंदर आपली फुलबाग' आणि 'सुंदर आपली फळबाग' अशी दोन पुस्तके प्रसिद्ध करणे योग्य ठरेल हे त्यांनी आपल्या यशस्वी व्यावसायिक अनुभवातून सांगितले. आणि प्रत्यक्षात तसे केले. त्यामुळेच कदाचित असेल, माझ्या या पुस्तकांच्या दुसऱ्या आवृत्या छापण्याचा योग लवकर आला. माझ्या दोन्ही पुस्तकांची जन्मकथा अशी आहे.

■

पालकांसाठी खुषखबर!

*खास मुलांसाठी आम्ही **एक आकर्षक सवलत योजना** जाहीर करीत आहोत. आपण ऑगस्ट महिन्यापासून १० महिने दरमहा २० रु. पाठवा. आपल्या मुलांसाठी पुढील मे महिन्यात ३०० रुपयांची आपल्या पसंतीची पुस्तके आम्ही आमच्या खर्चाने पाठवू. त्वरा करा. या योजनेचे सभासद व्हा व मुलांसाठी मे महिन्यात छान छान भरपूर पुस्तके घरपोच मिळवा.*

*आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन : ४७६९२४*

कथा 'आत्मवेध' ची

निरंजन घाटे

मी जसजसा विज्ञानविषयक माहिती मराठीत आणू लागलो तसतसं माझं मेंदूबद्दलचं कुतूहल वाढू लागलं. मी कोण? हा प्रश्न तत्त्ववेत्त्यांना कित्येक वर्षे सतावतोय, पण बुद्धी आणि मेंदू यांचा किंवा विचार प्रक्रिया आणि मेंदू यांचा परस्परसंबंध जोडला जाऊनसुद्धा मेंदूविषयी फार थोडं संशोधन झालं होतं. मेंदूबद्दल पहिल्यांदा मी वाचलं तेव्हाच या विषयावर आपण आज ना उद्या लिहायचं असं मी ठरवलं होतं. फिनिअस गेज नावाच्या माणसामुळं मी मेंदूकडं आकृष्ट झालो असं म्हटलं तरी चालेल.

गेल्या शतकातील गोष्ट आहे. एका सुरुंगाच्या स्फोटात फिनिएस गेजच्या डाव्या डोळ्यातून सुरुंग ठासायची एक पहार शिरली आणि कवटीच्या मध्यातून ती आरपार गेली. या अपघातानंतर मिनिटाभरानं गेज उभा राहिला. त्याला त्या अपघाताची कसलीही जाणीव नव्हती. त्या दिवसानंतर गेजच्या स्वभावात मात्र बदल झाला. आधीचा पापभीरू आणि भोळसट गेज अत्यंत खुनशी, चिडका, कावेबाज आणि व्यसनी बनला. या अपघातानंतर १९ वर्षांनी गेज मेला. तोपर्यंत त्याच्या मेंदूत डोकावण्यासाठी त्याच्या कवटीतली ही खिडकी डॉक्टरांना उपयोगी पडत होती.

मेंदूच्या बाबतीत अशा अनेक चित्रविचित्र घटना मी वाचत होतो. पुढं मेंदू या विषयावरचीच अनेक पुस्तकं मी वाचली. त्यात 'इडियट सॅव्हाँट्स' (अनयुज्युअली गिफ्टेड) व्यक्तींवरचं एक पुस्तक मला कोड्यात टाकून गेलं. तसंच मॅन हू टेस्टेड शेप्स, द मॅन हू मिसटुक हिज वाईफ फॉर अ हॅट, अशा लेखांमुळे आणि पुस्तकांच्या वाचनामुळं मेंदूबद्दलचं कुतूहल वाढतच होतं.

१९८६ साली किस्त्रीमच्या दिवाळी अंकात मी सुपरकॉम्प्युटरचा बाप-मेंदू हा लेख लिहिला. त्याआधी विज्ञानाचे शतकमधेही मी मेंदूवर एक प्रकरण लिहिले होतेच. 'सुपरकॉम्प्युटरचा बाप-मेंदू' हा लेख फार जणांना आवडला होता. पुढं 'स्वयंवेध' हे अशा लेखांचा संग्रह असलेलं माझं पुस्तक आवडल्याचं अनेकांनी कळवलं. त्याची पुढची आवृत्तीही निघाली. १९९२नंतरही मी मेंदूवर लिहीतच राहिलो.

१९९२ ते १९९७ या पाच वर्षात मी मेंदूवर बरेच लेख लिहिले. त्या प्रत्येक लेखाला चांगला प्रतिसाद मिळत होता. त्या लेखांचा संग्रह म्हणजे 'आत्मवेध'.

आत्मवेधमधे मेंदूवरील अलीकडच्या संशोधनाची माहिती आहे. मानवी मनाचा शोध घेण्यासाठी जे प्रयोग चालले आहेत त्याबद्दलचं लष्करी संशोधनही मी विचारात घेतलं आहे. शीतयुद्धाच्या काळात ईसेझपी म्हणजे एक्स्ट्रॉ सेन्सरी किंवा मराठीत ज्याला अतींद्रिय ज्ञान म्हणतात त्याच्या साहाय्यानं गुप्तहेरगिरी करता येईल का, या विषयी अनेक प्रयोग गुप्तपणे करण्यात आले. पुढं शीतयुद्ध संपल्यावर हे प्रयोग विज्ञानाच्या प्रमुख प्रवाहात आले. अशा प्रयोगांची माहिती इथं मराठीत प्रथमच वाचायला मिळेल.

१९९४मधे 'सायंटिफिक अमेरिकन' या मासिकानं 'माइंड अँड ब्रेन' या नावाचा एक खास अंक प्रसिद्ध केला होता. त्यातूनही

मेंदूबद्दलच्या संशोधनाची खूप माहिती मला मिळाली. याशिवाय वृत्तपत्रातल्या कात्रणांची मी नेहमीप्रमाणे मदत घेत होतोच.

मेंदूचं रहस्य उकलणे पुढच्या एकविसाव्या शतकातल्या शास्त्रज्ञांपुढे प्रमुख आव्हान असेल असं म्हटलं जातं. या आपल्या सर्वात महत्त्वाच्या अवयवावर मराठीत फारशी पुस्तकं नाहीत. इंग्रजीत मात्र अक्षरशः दरवर्षी याबद्दलची माहिती प्रसिद्ध होते. माझ्या अनुभवानुसार मराठी वाचकालाही मेंदूबद्दलची माहिती वाचावीशी वाटते.

अनेक संदर्भ वाचून मेंदूसंबंधी सुसूत्र आणि सुबोध लिहिणं हे शिवधनुष्य पेलण्याप्रमाणेच अवघड आहे. हे शिवधनुष्य मला पेललं की नाही ते वाचकांनीच ठरवायचं आहे.

पुस्तकाचे मागणे

कुणीतरी येऊन पुस्तकांच्या
या शोकेसमधून विकत घेतील का?
आपल्या घरी नेतील का?
कुणी मायबाप मित्र मिळतील का?
मालकही चालेल!
मालकाचा मालकी हक्क आणि
आपली गुलामगिरी आनंदाने स्वीकारू !
जरी म्हणत असतील ग्रंथाला गुरू !!
साठलेल्या ज्ञानामृताने
कुणीतरी तृष्णा भागवावी
एवढेच मागणे!

—मीना खोंड

अनुवाद : एका रोजनिशीचा

मंगला निगुडकर

आपण काही चांगले वाचले, ऐकले किंवा पाहिले की ते इतरांना सांगावे, त्यापासून आपल्याला जो आनंद मिळाला तसा तो इतरांनाही मिळावा, त्यांनी आपल्या आनंदात सहभागी व्हावे असे वाटणे ही माणसाची सहजप्रवृत्ती त्यामुळे डायरी ऑफ ॲन फ्रँक हे पुस्तक माझ्या वाचनात येताच मी ते वाचण्याची शिफारस मैत्रिणी, बहिणी, भाऊ वगैरेंना करू लागले. पण माझ्या आग्रहाला बेताचाच प्रतिसाद मिळाला. मग लक्षात आले की पुष्कळवेळा मुळातले इंग्रजी भाषेतले पुस्तक वाचणे कंटाळवाणे वाटते. अगदी पदवीधरांनाही! साधे उदाहरण द्यायचे म्हटले तर रोज सकाळी वर्तमानपत्रे आली की मी प्रथम त्यातले मराठी वर्तमानपत्र उचलते. ते संपूर्ण वाचून झाल्यावर मग 'टाइम्स ऑफ इंडिया' वरवर चाळायचे किंवा नुसतेच मथळे वाचायचे. त्यामुळे फार लोक हे पुस्तक वाचणार नाहीत हे लक्षात आले. शिवाय इंग्रजी लिहिता वाचता न येणाऱ्या कितीतरी नातेवाईक स्त्रिया होत्या. निदान त्यांच्यासाठी तरी या पुस्तकाचा अनुवाद करावा असे वाटले. म्हणून मग रीतसर अनुवाद केला.

डायरी ऑफ ॲन फ्रँक ही एका तेरा वर्षाच्या ज्यू मुलीची रोजनिशी आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तिच्या कुटुंबाला हिटलरच्या पाशवी जुलमातून स्वतःचा बचाव करण्यासाठी हॉलंडमधील ॲम्स्टरडॅम या शहरातल्या एका मोठ्या वर्कशॉपच्या माळ्यावर दोन वर्षे लपून रहावे लागले. या काळात आपण वरती रहात आहो हे खाली काम करणाऱ्यांना अगर त्या रस्त्यावर आसपास रहाणाऱ्यांना समजू नये म्हणून दिवसा अत्यंत हळू बोलायचे, चालतांना पायाचा आवाज होऊ द्यायचा नाही, खिडकीतून बाहेर डोकावायचे नाही, असे अनेक निर्बंध पाळावे लागले. आजारी पडले तर बाहेरून डॉक्टर बोलावता येत नसे, खोकला आला तर त्याचा आवाज खाली कुणाला ऐकायला येऊ नये म्हणून डोक्यावरून दोन दोन ब्लँकेट्स घेऊन तो आवाज दडपून टाकायचा. सर्वात मोठी अडचण म्हणजे ड्रेनेज अगर संडास तुंबला तर राजरोस प्लंबर बोलावता येत नसे. अशा स्थितीत ॲनच्या कुटुंबातले चौघे, व्हॅन पेल्स कुटुंबातले तिघे व एक दंतवैद्य, असे एकूण आठजण तिथे दोन वर्षे राहिले.

तेरा ते पंधरा वर्षे ही शरीराची व मनाची वाढ होणारी महत्त्वाची वर्षे. पण या कालात ॲनला अपुरे अन्न, वस्त्र, व शिरावर हिटलरच्या हातात सापडून मरण्याची सतत टांगती तलवार, अशा स्थितीत जगावे लागले. खेरीज या आठ माणसांना सतत चोवीस तास एकमेकांच्या सहवासात रहावे

लागल्याने एकमेकांचे दोष सतत खुपत, कोणत्याही गोष्टीवरून वादावादी होई आणि नको हे एकत्र राहाणे असे वाटे. त्यातून ॲन जरा स्वतंत्र वृत्तीची असल्याने सर्व मोठी माणसे तिच्यावर सतत डाफरत, साधी केसाची एखादी नवीन तऱ्हेची रचना तिने केली तरी तिला टोमणे मारत, तिची कुचेष्टा करत.

पण अशाही कठीण परिस्थितीत ॲन, तिची बहीण मारगॉट व पीटर पुढील यत्तेचा अभ्यास करत, टपालाद्वारे होऊ शकणारे काही कोर्सेस करत. ॲनला तर पुढे यशस्वी लेखिका होण्याची उमेद होती. ती छोट्या छोट्या गोष्टी लिहीत असे. तिने प्रथम रोजनिशी लिहायला सुरुवात केली कारण ती वही तिला वाढदिवसाची भेट म्हणून आली होती. त्यानंतर अज्ञातवासात वेळ जाण्यासाठी व मैत्रिणी नसल्यामुळे हितगुज करण्यासाठी. पुढे तिला कळले की युद्धकाळातली पत्रे, रोजनिशा यावरून हॉलंडच्या जनतेला युद्धकाळात कसे हाल सहन करावे लागले याचा वृत्तान्त डच जनतेला उपलब्ध करून दिला जाईल. त्यानंतर मात्र ॲनने आपल्या रोजनिशीच्या आधारे एक पुस्तक लिहिण्याचा विचार करून रोजनिशी व्यवस्थितपणे लिहिली.

परंतु १४ ऑगस्ट १९४४ला कुणीतरी पैशाच्या लोभाने या गुप्तनिवासात रहात असलेल्या माणसांची माहिती जर्मन अधिकाऱ्यांना कळविली. तेव्हा जर्मन पोलिसांनी या सर्वांना पकडून नेऊन छळगृहात (concentration camp) टाकले. तेथे या लोकांचा हृदयद्रावक अंत झाला. युद्ध संपले तेव्हा फक्त ॲनचे वडील ऑटो फ्रँक परत आले. त्या लोकांना पकडून नेतांना जर्मन पोलिसांनी तिथले सगळे सामान अस्ताव्यस्त करुन टाकले. त्यातच ॲनच्या रोजनिशीची पानेही विखरून टाकलेली होती. मिएप गाइस व बेप् व्हास्कुइज्ल या दोघींनी ते कागद नीट जुळवून सुरक्षित ठेऊन दिले व ॲनचे वडील ऑटो फ्रँक सुटून परत येताच ते त्यांच्या स्वाधीन केले.

ऑटो फ्रँक यांनी ते नीट वाचून, संकलित केले. अल्लड फ्रँकने मनात येईल ते बेधडक लिहिले होते. कधी राग आल्यास कुणाविषयीही काहीही लिहिले होते. (त्यातून तिची आईही सुटली नव्हती). ॲनची रोजनिशी जशीच्या तशी छापल्यास काही लोकांवर अन्याय होईल म्हणून

त्यातले काही भाग गाळून टाकून ऑटो फ्रँकनी ती १९४७ साली प्रसिद्ध केली.

बऱ्याच लोकांनी तिच्यातील मजकुराच्या खरेपणाविषयी संशय व्यक्त केला. मग युद्धविषयक दप्तर सांभाळणाऱ्या संस्थेने रोजनिशीतल्या मजकुराची कसून शहानिशा केली. ती सर्वतोपरी खरी असल्याचे शाबित झाल्यावर परत छापली गेली. त्यावेळी त्यातल्या काही व्यक्तींनी तशी इच्छा दर्शवल्यामुळे त्यांची खरी नावे न छापता टोपण नावे छापली होती.

मी प्रथम अनुवाद केला तो या १९४७ च्या आवृत्तीचा. तो श्री. अनिल मेहतांनी छापला होता १९९५साली. युद्धसमाप्तीला अर्धशतक लोटले म्हणून ठिकठिकाणी अनेक सभासमारंभ झाले.

त्यावेळी ॲनची संपूर्ण रोजनिशी, त्यातला काहीही मजकूर न गाळता, त्यातल्या व्यक्तींच्या खऱ्याखुऱ्या नावाने, परत एकदा प्रसिद्ध झाली. या आवृत्तीत अनेक फोटोही आहेत.

यावेळेपर्यंत श्री. अनिल मेहतांनी प्रकाशित केलेल्या या रोजनिशीच्या अनुवादित प्रती संपल्या होत्या. तेव्हा श्री. सुनील मेहतांनी मला १९९५साली प्रकाशित झालेल्या नव्या आवृत्तीची प्रत पाठवून तिचा अनुवाद करुन देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी नव्या पुस्तकातील पहिल्या पानापासून परत एकदा संपूर्ण अनुवाद करून पाठवला. तो श्री. मेहतांनी १९९६साली छापला.

ही एका अल्लड तेरा वर्षांच्या मुलीची रोजनिशी असल्यामुळे, त्यातील लिखाणाची शैली साधी सरळ, सोपी आहे. तिने रोजनिशीला मैत्रीण मानून तिला आपले मनोगत पत्ररूपाने लिहिले आहे. त्यामुळे निवेदनशैलीचा मला वेगळा विचार करावा लागला नाही. त्यात ॲनने केलेली व्यक्तिवर्णने, त्यांच्यात झालेली भांडणे किंवा वादावादी आणि भारतातल्या एखाद्या तेरा वर्षाच्या मुलीचे लिखाण यात मला फारसा फरक आढळला नाही.

आजूबाजूचे वातावरण, घडामोडी पाहातांना, रोजच्या रोज रेडिओवरून येणाऱ्या बातम्या, नवेनवे फतवे, हुकूम, नियम यांवर गुप्तनिवासात रहाणाऱ्या मंडळींच्या रोज चर्चा आणि वादविवाद होत. साहजिकच त्या वादविवादाची माहिती व त्यावरचे स्वत:चे विचार ॲन आपल्या रोजनिशीत लिही. या व्यतिरिक्त मी स्वत: त्याकाळातली पुस्तके, वर्तमानपत्रे वगैरे कोणतेही संदर्भ साहित्य वाचले नाही. कारण अखेर ही ॲनची रोजनिशी होती! दुसऱ्या महायुद्धाची बखर नव्हती. लपूनछपून रहात असताना, तिथल्या कठीण परिस्थितीला तोंड देताना तिला आलेले कटु अनुभव व या कठीण काळातूनही पार पडण्याची व जगण्याची या आठ मंडळींनी धरलेली जिद्द मला फार कौतुकास्पद वाटली. त्या स्थितीतल्या आपल्या दैनंदिन कार्यक्रमाचे इतके सुंदर विनोदी वर्णन ॲनने केले आहे की त्याला दाद दिल्यावाचून राहवत नाही. पुढे मागे लेखिका होण्याची ईर्षा तिच्या मनात होती.

ॲन जगून वाचून राहिली असती तर ही तिची इच्छा नक्कीच सफल झाली असती.

भारतातल्या भूमीवर युरोपतल्या दोन महायुद्धासारखी दीर्घकाळ चाललेली युद्धे झाली नाहीत. अशा युद्धात परिस्थिती किती बिकट होते, अन्न, वस्त्र, निवारा याचे कसे हाल होतात, या पाठोपाठ नीतिमत्ताही किती आणि कशी ढासळते याचा आपल्याला अनुभव नाही. जखमी जायबंदी सैनिकांच्या तुलनेने इस्पितळे, डॉक्टर्स, परिचारक/परिचारिकांचा कसा तुटवडा भासतो वगैरे फार विदारक वर्णने ॲनने आपल्या रोजनिशीत केली आहेत.

ही रोजनिशी ॲनने डच भाषेत लिहिली आहे. त्याचा इंग्रजी भाषेतला अनुवाद मला मिळाला. फक्त त्यातल्या नावांचे व गावांचे उच्चार मला विचित्र वाटले. बाकी कोणतीही अडचण आली नाही अनुवाद करताना.

पुस्तकाच्या प्रकाशनानंतर वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. पहिली आवृत्ती १९८८ साली व आताची सुधारित संपूर्ण आवृत्ती १९९६ साली प्रसिद्ध झाली. गेली दहा वर्षे वाचकांची खुषीपत्रे येतच आहेत. माझ्या मते त्याचे कारण म्हणजे अवघ्या तेराव्या वर्षी सुरू केलेले व १५व्या वर्षी क्रूर नियतीने थांबवलेले, ॲनचे हे लेखन! तेथल्या परिस्थितीचे इतके सुंदर, हुबेहुब वर्णन तिने केले आहे की त्यांचे अज्ञात वासातले राहाण्याचे ठिकाण 'गुप्तनिवास', तसेच तिथे राहणाऱ्या लोकांची व्यक्तिचित्रे तिने इतक्या सुरेख विनोदी शैलीत केली आहेत की ती माणसे आपल्या डोळ्यासमोर उभी राहतात. हे पुस्तक वाचकांनी मूळातूनच वाचावे. असे मला वाटते.

बहुतेक समीक्षकांनी या अनुवादावर चांगले अभिप्राय लिहिले. फक्त एका लेखिकेने लिहिले होते की अनुवाद जी. ए. कुलकर्णींच्या अनुवादाइतका सुंदर नाही.

त्या थोर साहित्यिकाची माझी बरोबरी कशी होईल? कुठे ती श्रेष्ठ व्यक्ती आणि कुठे मी! या ॲनच्या रोजनिशीचे आजवर ४०-५०भाषांतून अनुवाद झाले आहेत व अजून होत आहेत. यावर चित्रपट व नाटकेही झाली आहेत. अलीकडेच अमेरिकेत न्यूयॉर्कच्या एका प्रसिद्ध थिएटरात हे नाटक चालू होते.

या पुस्तकात उल्लेखलेली मिएप गाइस ही स्त्री अद्याप हयात आहे. १९९५ सालची ऑस्कर पारितोषिके वाटण्याच्या समारंभात अमेरिकेत तिला खास आमंत्रण होते. सर्व कलाकारांना पारितोषिके वाटून झाल्यावर तिला स्टेजवर बोलावले तेव्हा तेथे जमलेल्या सर्व लोकांनी उठून उभे राहून तिला मानवंदना दिली. कितीतरी वेळ टाळ्यांचा कडकडाट होत होता.

विविध विषयावरील मुक्त चिंतनात्मक ललित लेख

कांचनकण

शिवाजी सावंत

आवर्जून वाचावे असे...

'गुरुवार २५ मे तोच दिवस

रोज काहीतरी नवीन घडत असतं. आज सकाळी व्हॅन होएव्हॅन् पकडला गेला. त्याने आपल्या घरात दोन ज्यूंनी लपवले होते. त्या सापडलेल्या ज्यूंचे तर अपरिमित हाल होतीलच. पण बिचारा व्हॅन होएव्हॅन् पण संकटात सापडेल.

सगळं जगच उलटंपालटं झाल्यासारखं वाटतंय. चांगली सज्जन माणसे छळगृह, तुरुंग किंवा एकांत कोठडीत पाठवली जात आहेत, तर मवाली, धटिंगण गावचा कारभार पाहात आहेत, वृद्ध-तरुण, श्रीमंत-गरीब सर्वांवर सत्ता गाजवत आहेत. कोणाला काळाबाजार केल्यासाठी पकडत आहेत. तुम्ही नाझी असलात तरच तुमची धडगत आहे. नाहीतर पुढच्या क्षणी तुमचे काय होईल हे सांगता येत नाही.

व्हॅन होएव्हन्‌च्या अटकेमुळे आमचीही फार पंचाईत होते आहे. पोतंभर बटाटे काही बेप् आणू शकणार नाही. तेव्हा कमीतकमी बटाटे खाणे तेवढे आमच्या हातात आहे. आता आमच्या मनात काय करावे असे आहे ते सांगते. पण ते फारसे सुखावह होणार नाहीये. ममीच्या मते रोज सकाळी नास्ता करायचाच नाही. दुपारच्या जेवणात गरम सूप (कडधान्ये) आणि ब्रेड, रात्रीच्या जेवणात तळलेले बटाटे आणि भाजी, आठवड्यातून एकदोनदा लेट्यूस आम्ही अशा तऱ्हेच्या जेवणाने उपाशी, भुकेजलेले राहाणार आहोत. परंतु पकडले जाण्यापेक्षा ते बरे.

तुझी, ॲन एम् फ्रँक'

डायरी ऑफ ॲन फ्रँक

अनुवाद : मंगला निगुडकर

पृष्ठे : २८६

किंमत : एकशेपंच्याहत्तर रुपये

चारा-पाणी

रा. रं. बोरडे

महाराष्ट्रात १९८५च्या सुमारास भीषण स्वरूपाचं अवर्षण निर्माण झालं. खरीपाची पिकं हातची गेली. रब्बीची पिकं हातची गेली. आपण काय खायचं, आपल्या गुराढोरांना काय खाऊ घालायचं, असा प्रश्न खेड्यापाड्यातल्या शेतकरी-शेतमजुरांना सतावू लागला. विशेषत: गुराढोरांच्या चारापाण्याचा भीषण प्रश्न निर्माण झाला.

शासनानं अवर्षणग्रस्त स्त्रीपुरुषांसाठी रोजगारहमीची कामं काढली. खेड्यापाड्यातले अवर्षणग्रस्त स्त्रीपुरुष रोजगारहमीच्या कामावर जाऊ लागले. तरीही अवर्षणग्रस्त भागातल्या गुराढोरांच्या चारापाण्याचा प्रश्न शिल्लकच राहिला. त्यावर उपाययोजना म्हणून शासनानं महाराष्ट्रातल्या साखर कारखान्यांना गुरांच्या छावण्या सुरू करण्यास भाग पाडलं. काही साखर कारखान्यांनी गुरांच्या छावण्या सुरू केल्या; पण शेतकरी-शेतमजुरांना रोजगार हमीच्या कामावर व त्यांच्या गुरा-ढोरांना छावणीत पाठवून त्यांच्या जगण्याचा तात्पुरता प्रश्न सुटेल; पण त्याचे जे दूरगामी विपरीत परिणाम होतील त्याचाही विचार व्हावयास हवा, असं मला वाटलं.

शेतीची मशागत प्रामुख्यानं उन्हाळ्यात होते पावसाळा सुरू होण्यापूर्वी पेरणीसाठी रानं तयार होतात. त्यामुळं शेतकऱ्यांना व शेतमजुरांना रोजगार हमीच्या कामावर व त्यांच्या बैलांना छावणीत पाठवून शेतीची मशागत कशी होईल? शेतीची मशागत झाला नाही तर पेरण्या कशा होतील? पेरण्या झाल्याच नाहीत तर शेतकरी, शेतकरी म्हणून कसा जगू शकेल? पावसाळा सुरू झाल्यानंतर रोजगारहमीची कामे बंद होतील. गुरांच्या छावण्यादेखील बंद होतील अशा परिस्थितीत शेतकरी शेतीत जाऊन काय करील? आपल्या बैलांना काय काम देईल? याचाच अर्थ असा की, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनं रोजगार हमीची कामे व त्यांच्या बैलाच्या दृष्टीनं, गुराच्या दृष्टीनं हितकारक ठरण्याऐवजी अहितकारक ठरण्याचीच अधिक शक्यता आहे.

याच काळात वृत्तपत्रात मी आणखी एक बातमी वाचली. आंबाजोगाई येथील 'मानवलोक' या संस्थेनं अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतीत काम करणाऱ्या बैलांसाठी छावण्या सुरू केल्या. 'मानव लोक'नं सुरू केलेल्या बैलांच्या छावणीची संकल्पना केवळ अभिनवच नव्हे तर व्यवहार्यदेखील होती. 'मानवलोक'च्या बैलांच्या छावणीची संकल्पना अशी :

अवर्षणग्रस्त काही गावं निवडायची, या सर्व गावांना मध्यवर्ती होईल असं ठिकाण निवडून तिथे बैलांची छावणी सुरू करायची. ज्या शेतकऱ्यांना आपले बैल या छावणीत आणून सोडण्याची इच्छा असेल त्यांनी दिवसभर आपल्या बैलांकडून आपल्या शेतात कामं करून घ्यायची. संध्याकाळी केवळ चार आण्याची पावती फाडून आपले बैल या छावणीत आणून सोडायचे. छावणीतल्या या बैलांची रात्रभर या छावणीत चारापाण्याची व्यवस्था व्हायची. सकाळी शेतीतल्या कामासाठी शेतकरी आपले बैल घेऊन जाण्यासाठी येईल तेव्हा प्रत्येक बैलजोडीपोटी दिवसभरासाठी पाच पेंढ्या कडबा दिला जायचा. दिवसभर शेतीतली कामे आटोपल्यानंतर त्या शेतकऱ्यानं चार आण्याची पावती फाडून आपले बैल पुन्हा छावणीत आणून सोडायचे.

'मानवलोक'च्या या गुरांच्या छावणीच्या संकल्पनेनं मी विलक्षण प्रभावित झालो. साखर कारखान्याच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या गुरांच्या छावणीच्या संकल्पनेपेक्षा ही संकल्पना मला खूपच व्यवहार्य वाटली.

याच काळात उदगीर तालुक्यातल्या काही शेतकऱ्यांनी 'मेख मारो' आंदोलन पुकारले. या आंदोलनाचे स्वरूप असे होते : अवर्षणपीडित सर्व शेतकऱ्यांनी आपले बैल एकत्र जमवायचे. 'आमाला चारा द्या, आमाला पानी द्या' असे पुठ्ठ्याच्या बोर्डवर लिहून ते बोर्ड बैलाच्या शिंगात अडकवायचे व त्या बैलांचा मोर्चा घेऊन तहसील कार्यालयाकडं जायचं. तहसील कार्यालयासमोर मेखा मारून ते बैल या मेखांना बांधून टाकायचे. या बैलांच्या चारापाण्याची शासन जोपर्यंत व्यवस्था करीत नाही तोपर्यंत ते बैल तहसील कार्यालयासमोरून हलवायचे नाहीत. या वार्तेनं 'चारापाणी' या कादंबरीचं बीज माझ्या मनात पेरलं गेलं. हे बीज प्रथम कथेच्या रूपात माझ्या मनात अवतरलं. नंतर कादंबरीच्या रूपात माझ्या मनात विस्तारलं.

ही कादंबरी लिहीत असता मला मराठी वृत्तपत्रांची फार मोठी मदत झालेली आहे. दुष्काळी परिस्थितीकडं सर्व संबंधितांचं लक्ष वेधण्याचं व त्यावर उपाययोजना करण्यासाठी कार्यतत्पर करण्याचं महत्त्वपूर्ण कार्य त्या काळातल्या महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या वृत्तपत्रांनी केलं आहे. या वृत्तपत्रांनी केवळ दुष्काळविषयक बातम्याच छापल्या नाहीत तर दुष्काळी परिस्थितीचं अतिशय विदारक स्वरूप दाखविणारी वार्तापत्रं प्रसिद्ध केली आहेत.

आपल्या पोटी जन्माला आलेलं मूल धुता यावं म्हणून पाण्यासाठी धडपडणारी,

पाण्याअभावी त्या अर्भकाच्या अंगावरचं नैसर्गिक आवरण वाळून ते अर्भक मेल्यामुळे आक्रंदणारी व 'पाण्याविना माजं बाळ वाळून मेलं रे भाऊ' असं आल्यागेल्या लोकांजवळ टाहो फोडून सांगणारी लमाण तांड्यावरची स्त्री. आपल्या कन्येच्या विवाहासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करता यावी म्हणून घरातलं किडूकमिडूक मोडून व उसनंपासनं करून विहीर खोदणारा. या विहिरीला पुरेसं पाणी लागल्यामुळं आशा पल्लवीत झालेला व गावातली पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन शासनानं ती विहीर ताब्यात घेतल्यानं वेडपिसा झालेला शेतकरी, नांदेड जिल्ह्यातील एका माजी पाटबंधारे मंत्र्याचं साळीचं पीक सुकून चालल्यामुळं ओळीनं सात दिवस, असे तीन वेळा या साळीला पाणी देणारे व त्यामुळं या परीसरातल्या लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी नंतर वणवण भटकायला लावणारे पाटबंधारे खात्याचे बेमुर्वतखोर अधिकारी, महाराष्ट्रातल्या दुष्काळी परिस्थितीची पाहाणी करण्यासाठी आलेल्या दिल्लीच्या पत्रकारांना औरंगाबादच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये जंगी ओली पार्टी देणारे उच्चपदस्थ अधिकारी व दुष्काळाचं भान विसरून ही ओली पार्टी झोडणारे दिल्लीचे पत्रकार हे सारं कादंबरीत आलेलं आहे. हे सारं मला मराठी वृत्तपत्रांनी दिलेलं आहे.

वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वार्तापत्राचं संकलन झालं खरं; पण या साऱ्या घटना एकासूत्रात गुंफून त्यांना कादंबरीचं रूप कसं द्यायचं, हा माझ्यासमोर प्रश्न होता. या प्रश्नासंबंधी विचार करीत असताना शेतकऱ्यांच्या घरात जन्माला आलेला, सुशिक्षित असूनही शेतकऱ्यांच्या भल्यासाठी झटणारा एक कार्यकर्ता माझ्या मनात उभा राहिला. उन्हाळ्यात सुट्टीसाठी गावी आल्यानंतर अवर्षणामुळं निर्माण झालेल्या परिस्थितीचं हे विदारक रूप तो बघतो तेव्हा आपल्या शेतकरी असलेल्या वडिलांना तसंच आपल्या गावातल्या लोकांना शेतकरी म्हणून जगवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करीत राहतो. अखेर तो मेख मारो आंदोलन पुकारतो.

वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या घटना एका सूत्रांत गुंफून लेखन केले तर त्या लेखनाला वाङ्मय म्हणता येईल का, असा प्रश्न समीक्षक उपस्थित करतील याची मला जाणीव होती. इतकंच नव्हे तर या कादंबरीची खरीखुरी निर्मिती प्रक्रिया सांगितली तर या लेखनाला वाङ्मय म्हणणे नाकारतील याची मला जाणीव होती. तरीही वाङ्मयनिर्मिती विषयक संकल्पनेचा फेरविचार व्हावा असं, 'चारापाणी'ला प्रास्ताविक लिहून मी स्पष्टपणे मांडले आहे. परंतु अद्याप तरी या दृष्टीने या कादंबरीचा विचार झालेला नाही.

साधारणतः १९६० सालापासून मी लेखन करीत आहे. सुरुवातीची दोन दशके माझ्या कथाकादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचं वास्तव चित्रण आलेलं आहे.

१९८० सालापासून माझ्या लेखनाच्या हेतूत मूलतः बदल झालेला आहे. ग्रामीण जीवन असे का आहे अस प्रश्न उपस्थित करून म्हणजेच शोषणाचे संदर्भ विचारात घेऊन मी लिहीत आहे.

एखादा प्रश्न घेऊन जेव्हा लेखन करायचं असतं तेव्हा त्या प्रश्नाच्या मुळाशी जावं लागलं. त्या प्रश्नाचा अंतर्मुख होऊन विचार करावा लागता. त्याला अभ्यासाची जोड द्यावी लागते.

अवर्षणग्रस्त परिस्थितीने निर्माण झालेल्या चारापाण्याच्या समस्येवर लिहिण्याचे योजिले तेव्हा शेती, पाणी, दुष्काळ हा माझ्या अभ्यासाचा व चिंतनाचा विषय झाला. या विषयावरचे अण्णासाहेब शिंदे, डॉ. वि. म. दांडेकर, विलासराव साळुंके, दत्ता देशमुख यांचे लेखन मी वाचलं. शेती, पाणी व दुष्काळ हा प्रश्न तात्कालिक स्वरूपाचा नाही तर भारतासारख्या शेतीप्रधान देशाला दीर्घकाळ सतावणारा आहे. वाढत्या लोकसंख्येचं नियोजन, उपलब्ध पाण्याचा काटकसरीनं वापर व आधुनिक शेतीव्यवस्थापनाचं अवलंबन या गोष्टीकडं वेळीच लक्ष दिलं नाही तर या कृषिप्रधान देशाचे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी विचार करू लागलो. या प्रश्नांची सखोलता व व्यापकता व त्यातूनच चारापाणीची कथावस्तू विस्तारत गेली.

या समस्यांकडे पुरेशा गांभीर्याने बघणे व वेळीच ही समस्या सोडविणे आवश्यक आहे.

कादंबरीच्या माध्यमातून ही समस्या मांडण्यात व तिच्या सोडवणुकीचा मार्ग सुचविण्यात मी कितपत यशस्वी झालो हे केवळ मराठी वाचकानीच नव्हे तर शेती, पाणी व दुष्काळ या विषयावरच्या अभ्यासकांनीही ठरवावयाचे आहे.

खास सुट्टीसाठी आजच मजेदार पुस्तके खरेदी करा.

आता नको अभ्यासाची सजा, पुस्तकांच्या संगतीने करा मज्जाच मज्जा!

मदर टेरेसा	रा. वा. शेवडे गुरुजी
जपानी लोककथा	सुनंदा देशपांडे
असीम त्याग व इतर गोष्टी	डॉ. चंद्रकांत देऊळगावकर
पराक्रमी पिंकू	राजीव तांबे
बंटू बडबडे	राजीव तांबे
बंटू लाडोबा	राजीव तांबे
ठकासी भेटे	ना. द. जोशी
पिटूची कमाल	पुष्पा चिणे
रिपेक्स	मीना शेटे
स्वातंत्र्याची किंमत	इरेश स्वामी
परीच्या राज्यात	धो. वे. जोगी
आम्हा मुलांचे सामर्थ्य	किर्ती मुळीक

वरील सर्व पुस्तकांची किंमत प्रत्येकी १५ रु. आहे. पोस्टखर्चासह होणाऱ्या रकमेची मनीऑर्डर/ड्राफ्ट पाठवा. पुस्तके त्वरित पाठवू.

पुस्तक विक्रेत्यांशी गप्पा

मॅजेस्टिक एजन्सीज्, दादर

ग्रंथविक्रीच्या नव्या नव्या वाटा शोधणारे अनिल कोठावळे

रविप्रकाश कुलकर्णी

"मी कुठलाही व्यवसाय केला तरी त्याला धंद्याचेच निकष लावणार. प्रकाशन व्यवसायाला जोपर्यंत इंडस्ट्री म्हणून समजलं जात नाही आणि पुस्तकाला प्रॉडक्ट, तोपर्यंत यश मिळणं कठीण आहे. दुर्दैवाने इथे ह्या व्यवसायात हौस म्हणूनच आलेले जास्त दिसतील. त्यामुळेच धंदा तर होत नाहीच, उलट नुकसानच होतं...."

असा रोखठोक विचार आहे मॅजेस्टिक एजन्सीच्या अनिल कोठावळे यांचा. पुढे ते म्हणतात, "पुस्तक व्यवसायात मी परत आलो ते सेवा वगैरे गोष्टीसाठी नाही. मी करणार तो धंदाच. समजा मी हा व्यवसाय केला नसता तरी दुसरा कुठलाही धंदाच केला असता आणि अर्थातच् तो देखील यशस्वीच झाला असता. योगायोगाने मी पुस्तकांच्या जगात आलो आहे तर धंद्याच्या सगळ्या शक्यता अजमावणार. शेवटी यश हा दृष्टिकोन ठेवला तरच मिळू शकते."

धंद्याचं हे बाळकडू अनिल कोठावळे यांच्याकडे कुठून आलं? याबाबत ते म्हणतात-

"कळायला लागल्यापासून, अगदी शाळेत असल्यापासून पुस्तकाच्या दुकानात मी जायला लागलो आहे. शालेय पुस्तकांच्या सीझन म्हणजे काय असतं हे मी चांगलं अनुभवलं आहे. पुढे क्रॉस मैदानात वेगवेगळी अगदी शेतकीविषयक पुस्तक घेऊन जी प्रदर्शनं झाली त्यात माझादेखील सहभाग होता. शाळाशाळात मी हिंडलो आहे आणि कुमार वाङ्मय म्हणजे काय असतं, मुख्याध्यापक ती कशी निवडतात ह्याचा चांगलाच अनुभव घेतला आहे. गावोगावचे व्यापारी पुस्तकं विकतात ती फक्त काऊंटर सेलचीच. आणि शालेय त्यात देखील ते संपूर्णतः अवलंबून असतात ते नवनीतवर....

असा सगळा बारा तेरा वर्षाचा चांगलाच अनुभव घेऊन १९८३मधे मी पूर्णपणे या धंद्यात आलो कारण आमच्या दुकानातील कर्मचारी भास्कर कणेकर बाहेर पडले होते. ती जागा मला घ्यायला लागली...

पुढे मी, सुदेश हिंगलासपुरकर आणि जयहिंद प्रकाशनाचे हेमंत रायकर असे तिघे मिळून आम्ही टेंपो भरून पुस्तकं गावोगाव नेली. हा टेंपो म्हणजे पुस्तकाचं दुकानच अशी व्यवस्था केली होती. परंतु इथे एक लक्षात आलं की पुस्तकं खपतात पण उधारी हीच इथली समस्या आहे. त्यामुळे मग दरडोई होणारा खर्च परवडतच नाही.

गावोगावी हिंडताना शाळेच्या हेडमास्तरांना किंवा लायब्ररीयनना गाठणं हा एक व्यापच होऊन बसतो. शिवाय त्यांना पुस्तकं खरेदीसाठी राजी करणं म्हणजे एक स्वतंत्र प्रकरण होईल इतकं नाट्य त्यात असतं...

एकच उदाहरण सांगतो. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात महाराष्ट्रातील सगळ्या शाळांतील ग्रंथपालाचं संमेलन भरणार होतं म्हणून मला मुद्दाम पुस्तकाचं प्रदर्शन भरवण्याचं सांगण्यात आलं. रातोरात पुस्तकं टेम्पोत टाकून मी ते भरवलं देखील. पण दोन दिवसांच्या ह्या संमेलनात तीन लायब्ररीयन देखील पुस्तक प्रदर्शनाकडे फिरकले नाहीत. मग खरेदीची गोष्ट दूरच राहिली. ह्या संमेलनात चर्चा कशाची झाली असेल तर लायब्ररीयनचे पगार, पार्ट टाईमचे फुल टाईम कसे होणार वगैरे वगैरे. शेवटी दोन दिवसाच्या प्रदर्शनात एक पुस्तक विकलं गेलं ते अजून मला आठवतं. दोन रुपये किंमतीचं हे पुस्तक होतं- पत्ते खेळा आणि भविष्य पहा. शिवाय त्यावर देखील ह्या ग्राहकानं कमिशन मागितलंच!

तर असा देखील अनुभव येतो आणि तो आवश्यक देखील असतो. बाकी गावोगावी पुस्तकं प्रदर्शनं सातत्यानं भरवणं आवश्यकच आहे असं मला वाटतं. पुस्तकं खपत नाहीत

ही गोष्ट खोटी. ती एक तर खपवायला लागतात आणि वाचकांच्या दारात, प्रसंगी त्याच्या हातात ती दिली की पुस्तकं विकली जातात हा माझा अनुभव आहे."

ह्या धंद्याचं एक आहे, मी सतत प्रदर्शनातील विक्रीच्या आकड्यांवर लक्ष ठेवून असतो. थोडं जरी आकडे खाली यायला लागले तर आमचं काय चुकतं हे शोधण्यासाठी सगळा आटापिटा करतो. एखादे वेळी तोटा मी समजू शकतो. आणखी एक मला माहीत आहे की मला पुढेच जायचं आहे. मागची पडझड मी धरून बसत नाही."

"हल्ली वेगवेगळ्या स्कीम करणारा कल्पक विक्रेता असं म्हटलं जातं त्याबाबत कांही सांगता?"

"का नाही सांगणार? त्यात गुपित काहीच नाही. सगळा कारभार रोखठोक आहे.

माझी एक स्कीम होती. आता अडीच हजार रुपये भरा आणि ताबडतोब अडीच हजार दर्शनी किंमतीची पुस्तकं उचला. शिवाय पाच वर्षांनी मी हे पैसे परत करणार होतो. ह्या योजनेत एक गोष्ट होती आमचा स्टॉक हलत होता. परंतु ह्या स्कीमचा हवा तसा फॉलो अप आम्हांला जमला नाही. पण अजूनही बँकेंचे योग्य ते सहकार्य मिळाले तर मी हे जमवणार आहे."

"पण हल्ली अनिल कोठावळे म्हटलं की स्कीम असं म्हटलं जातं त्याबाबत काय सांगता येईल?"

"असं काही नाही." कोठावळे सांगू लागतात, "फक्त त्याचा गाजावाजा जरा झाला म्हणून तुम्हाला तसं वाटतं. झालं काय, मध्यंतरी काही काळ मी मुंबईपासून दूर होतो. जरा वेगळ्या व्यवसायात होतो. पण ह्याचा अर्थ पुस्तक व्यवसायापासून दूर गेलो होतो असं नाही. आणि परत मला मुंबईला यायला लागले. जबाबदारीला मी कधीच घाबरत नाही. नवी विटी नवे राज्य. म्हणून मग मी आधी मौज-पॉप्युलर प्रकाशनाची सर्व पुस्तकं सवलतीत उपलब्ध करुन प्रदर्शनं केली. हे नवीनच होतं. कारण मौज-पॉप्युलरची पुस्तकं तशी पटकन एके ठिकाणी उपलब्ध होत नाहीत असा अनुभव आहे. त्यामुळे चोखंदळ वाचकांना ही पर्वणी वाटली. माझी आपोआपच बातमी झाली!

मध्यंतरी मी पन्नास टक्के कमिशनचा प्रयोग केला आणि तो तुफान यशस्वी झाला. हे काम प्रकाशकांच्या सहकार्यानेच यशस्वी होऊ शकले आहे. एकतर ह्या स्कीममुळे प्रकाशकांचे स्टॉक रिकामे झाले. शिवाय एक गोष्ट अशी आहे की जो माणूस पुस्तक विकत घ्यायला येतो तो केवळ पन्नास टक्केसाठीच येतो असं नाही. त्याचं आवडतं पुस्तक दिसलं की तो ते उचलणारच. तेव्हा ह्या वाचकाला मला माझ्या दुकानाकडे नव्यानं वळवायचं होतं आणि ते साध्य झालं. माझ्या दुकानात बारा महिने प्रदर्शन असतं हे आता त्याला ठाऊक झालं आहे. दुसरी गोष्ट म्हणजे मॅजेस्टिक एजन्सी हे रस्त्यावरल्या जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येकाला लक्षात आलं पाहिजे म्हणून मी जी प्रचंड शोकेस केली त्याचा पण परिणाम होतो. अनेकदा दुकान बंद होताना आमच्याकडे लोकं खालून फक्त लाईट बघून

वर येतात आणि मग आम्ही पुस्तकं विकण्यासाठी काळवेळ बघत नाही....

आमची आणखी एक यशस्वी झालेली स्कीम म्हणजे विद्यापीठांची प्रकाशनं आणि त्याचे प्रदर्शन. विद्यापीठांनी उत्तमोत्तम ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत पण त्यांच्या वितरणाची व्यवस्था हवी तशी नाही. परिणामी हे ग्रंथ सहसा वाचकाच्या दृष्टीला पडत नाहीत. ही उणीव ओळखून मी सगळ्या विद्यापीठांकडून पुस्तकं मागवली. अर्थात् एका ठिकाणी सर्व विद्यापीठांची प्रकाशनं बघायला मिळणं हीच मुळी अशक्यप्राय गोष्ट समजली गेली होती. ती मी साधली. माझं काम झालं. यश मिळालच. अर्थात् हे सगळं सहज सोपं मात्र नाही. विद्यापीठांना ड्राफ्ट पाठवून देखील पुस्तकं आलेली नव्हती. मग त्याचा पाठपुरावा आलाच... पण शेवटी एकच एक यशाचा फॉर्म्युला कायम नसतो. तो वेगवेगळा शोधावा लागतो.

शेवटी वाचकाला पुस्तक हवं असतं. सतराशेसाठ संकटं नको असतात. पु. ल. देशपांडे यांच्या पुस्तकांचीच गोष्ट घ्या. पुलंच्या लोकप्रियतेला तोड नाही. पुलंचा अमृतमहोत्सव झाला, सुदेश हिंगलासपुरने पुलं जत्रा, प्रदर्शन करत गावोगावी त्यांची पुस्तकं खपवली तरी अजून पुलंच्या पुस्तकाला मागणी आहेच! सध्या एकाच ठिकाणी पुलंची सर्व पुस्तकं मिळण्याचं एकही ठिकाण नाही. हे माझ्या लक्षात येताच मी समग्र 'पुलं' वाङ्मययोजना आखली. ३९३०रु.चा ४० पुस्तकांचा संच मी सवलतीत २८००रुपयात देतो. ही माझी स्कीम यशस्वी झाली. अजून त्याला मागणी आहे. फक्त एक आहे मराठी पुस्तकाला सवलत मात्र हवीच. त्याशिवाय पुस्तकं विकणं आता कठीणच आहे...

अशीच स्कीम 'अत्रे वाङ्मय संच'ची आहे. ३६६० चा संच आम्ही २५००/- देतो.

हे सर्व अर्थातच् प्रकाशकांच्या सहकार्याशिवाय अशक्य आहे. आमची सर्विस ही महत्त्वाची.

मराठीत लोकप्रिय असे लेखक अगदीच मोजकेच आहेत. अत्रे, पुल हे कायम खपाऊ लेखक आहेत. नव्या लेखकात सानिया, अनिल अवचट ह्या नावाने पुस्तकाची मागणी होते. मेघना पेठे - हंस अकेला, रामदास भटकळ - जीगसॉ, अंबरीष मिश्र - शुभ्र काही जीवघेणे ह्या पहिल्याच पुस्तकांनी लेखकांबद्दल जिज्ञासा निर्माण झाली आहे. परंतु दर्जेदार लिहिणारा हुकमी लेखक सध्या नाही हीच मोठी खंत आहे. ह्या सगळ्याबाबत एक सांगावेसे वाटते की ह्यासाठी जाहिरातीची अवश्यकता असतेच. मराठीत एक राजहंस प्रकाशन आणि मेहता पब्लिशिंग हाऊस सोडलं तर नियोजनपूर्वक जाहिरात, मार्केटिंगचा अभ्यास ह्या गोष्टींचा अभावच आहे. मी सुद्धा जाहिरात कटाक्षाने करतो. त्याचे रिटर्न्स मिळतात. दरवेळी जाहिरातीला प्रचंड पैसा लागतोच असं नाही. सध्या मी बॉम्बे टाईम्समधे जाहिरात करतो. एरवी बरेच मराठी इंग्रजी पेपर वाचतातच ना ते गिऱ्हाईक मलाच मिळणार... हा माझा अनुभव आहे.

आणखी ताजी स्कीम सांगू?

आमच्या तर्फे अक्षर, माहेर, ऋतुरंग, कथाश्री, श्री दीपलक्ष्मी आणि साप्ताहिक सकाळ ह्या दिवाळी अंकाचा एक सेट केला आहे. तो घेणाऱ्याला वपुंचं ताजं पुस्तक - माझं माझ्यापाशी, शांताबाई शेळके यांच्या कवितांची त्यांच्या संभाषणाची कॅसेट, एक महाराष्ट्र दर्शन कॅलेंडर हे सगळं अवघ्या ३००रु. त!

अर्थात् हे गणित जमवलं ते कौशल्य माझं. कमीतकमी हजार अंक हल्ली माझ्या इथूनच एका वेळेला संपतात हा लाभ त्या अंकाच्या संपादकाला मिळतोच. म्हणजे त्याला पण फायदा आहेच.

आणखी एक स्कीम पहा. आकाशवाणीतर्फे स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने वाचक स्पर्धा झाली त्यात सोळा पुस्तके निवडली गेली होती त्याला चाळणी लावून आम्ही बारा 'लोकमान्य' पुस्तकं ९०० रुपयात घरपोच देण्याची योजना आहे. म्हणजे चाळीस टक्के सवलत आहे. आता हे गणित कसे जमणार असा प्रश्न पडेल. बरोबर? मी प्रत्येक पुस्तकाला प्रायोजक मिळवला आहे! हजार प्रती. त्याचा २५% भार प्रायोजकानं उचलायचा! अर्थात् त्याच्या नावाचा स्टिकर वगैरे गोष्टी रीतसर होणार. ह्या स्कीमसाठी लार्सन ॲन्ड टुब्रो सारख्या संस्था पुढे आलेल्या आहेत. अजून काही संस्था-व्यक्ती पुढे येतील. मलाच त्यांच्याशी हवा तसा संपर्क साधता येत नाही म्हणूनच ही स्कीम अडली आहे!

अशा कितीतरी योजना आहेत. पण शेवटी एकच सांगतो, पुस्तकांना मागणी आहे. फक्त तो वाचक शोधायला हवा. त्याच्यापर्यंत पुस्तक जायला हवं. मग सगळं जमेल असं मला वाटतं."

अनिल कोठावळे याचं नावं वगळून सध्यातरी पुस्तकविक्रीचा विचार करता येईल असं वाटत नाही. अशा ह्या कल्पक विक्रेत्याचा आता कोण कसा उपयोग करून घेतो ह्यावरून देखील मराठी प्रकाशनाचं वेगळं चित्र दिसू शकेल. पण ते चित्र दिमाखदार असेल म्हणूनच अनिल कोठावळे यांना शुभेच्छा द्यायच्या!

शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालयं आणि साहित्यप्रेमींना खूषखबर!
अनेक विषयांवरील मराठी पुस्तकं मनमोकळ्या वातावरणात तासन् तास
मनसोक्त पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी

कोल्हापूरमधील एकमेव ठिकाण

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर ४१६०१२.
फोन : ५२२३०४ टेलिफॅक्स : ५२१८८१

ग्रंथप्रसारात सुख पहाणारे दिलीप भोगले

रविप्रकाश कुलकर्णी

दादर येथे आयडियल त्रिवेणी, गिरगावात मॅजेस्टिक बुक डेपो तसा विलेपार्ल्यात भोगले बंधूंचा जवाहर बुक डेपो. त्याला पर्याय नाहीच हेच त्यांचे वैशिष्ट्य!

मारुती रामचंद्र भोगले यांनी १९५० मधे जवाहर बुक डेपोची स्थापना केली. त्याला त्यांच्या सगळ्याच मुलांनी साथ केली आणि बघता बघता दुकान हे वाढणाऱ्या पार्ल्याचं एक अविभाज्य असं सांस्कृतिक केंद्र बनलं. मारुतीरावांच्या ह्या कामगिरीबद्दल, त्यांच्या मृत्यूनंतर पार्लेकरांनी कृतज्ञतेने डेपोच्या कोपऱ्यावरच्या चौकाला कै. मारुती रामचंद्र भोगले चौक असे नाव दिले. एखाद्या पुस्तक विक्रेत्याबद्दल अशी कृतज्ञता व्यक्त केल्याचे हे एकमेव उदाहरण असेल. मारुतीरावांचा हा वसा आता दिलीप भोगले यांनी जबाबदारीने स्वीकारला आहे. आज जवाहर बुक डेपोला जो नावलौकिक मिळाला आहे त्यात अर्थातच दिलीप भोगले यांचा मोठा वाटा आहे. ही किमया त्यांना कशी साधली?

त्याबाबत दिलीप भोगले सांगतात, "जवाहर बुक डेपोमधे आलेल्या प्रत्येकाचे समाधान झाले पाहिजे ह्यावर आमचा कटाक्ष असतो. मराठीतले पुस्तक आमच्याकडे नाही असं कधी होत नाहीच. पण एखादे वेळेस नसले तर आमचीच जबाबदारी आहे असे समजून, ते पुस्तक उपलब्ध करून देण्याची पराकाष्ठा करतो. प्रसंगी त्या वाचकाच्या घरी ते पुस्तक घरपोच देखील करतो. त्यामुळे जवाहरमधे पुस्तक मिळेलच असा विश्वास वाचकांना असतो. ही आमची कमाई आहे असं मला वाटतं. पार्ल्यात फोनवरून जरी पुस्तकाचं नाव कळवलं तरी ते पाठविण्याची व्यवस्था आम्ही करतो. त्यामुळे जवाहरचं गिऱ्हाईक, वाचक हा आमचाच होऊन जातो. तो दुसरीकडे खरेदीसाठी जाणारच नाही. उदाहरण म्हणून सांगतो. दरवर्षी आम्ही ग्रंथजत्रा आयोजित करतो. ती साधारण डिसेंबर-जानेवारीत असते. त्याच सुमारास थोडं अगोदर पार्ल्यात मॅजेस्टिक गप्पा-भव्य पुस्तक प्रदर्शन असतं. पण त्याचा परिणाम आमच्या ग्रंथजत्रेवर अजिबात होत नाही. शिवाय दरमहा नित्यनियमानं पुस्तकं खरेदी करणारे आमचे वाचक आहेत ते वेगळेच. डॉ. प्रतिभा मेहता ह्या नियमानं दरमहा येऊन पुस्तकं खरेदी करून जातात. मला

प्रश्न पडायचा पार्ल्यातल्या 'मेहता' असून त्या मराठी कशा काय वाचतात? त्यांनाच एकदा विचारलं तेव्हा कळलं त्या मराठीच आहेत. सुप्रसिद्ध पत्रकार अप्पा पेंडसे यांच्या त्या कन्या आणि वसुंधरा पेंडसे-नाईक यांच्या भगिनी.

महिन्यातून दोन फेऱ्या चुकल्या नाहीत असे एक चोखंदळ वाचक आहेत. आपल्या मित्रमंडळींना वाढदिवसाची भेट म्हणून ते पुस्तकच देणार हे ठरलेलं. ते दुकानात येणार. चहा पिता पिता पुस्तकांची निवड करणार. तेव्हा आमच्या दुकानातले आणि काऊंटरवरचे गिऱ्हाईक डोकावून डोकावून बघणार. कारण ते विक्रम गोखले असतात! अर्थात त्याचा त्यांच्यावर अजिबात परिणाम होत नाही. ते आपल्याला हवं ती पुस्तकं घेणार आणि "येतो" म्हणून निरोप घेणार. एरवी विक्रम गोखले 'स्टार' आहेत. पण इथे ते आवर्जून येतात ते वाचक म्हणून आणि म्हणूनच आम्हांला देखील त्यांचा अभिमान वाटतो.

आणखी एक गोष्ट. एकदा 'राऊ'ची मागणी आली. अर्थात् ते पुस्तक आमच्याकडे होतंच. आमच्या नेहमीच्या तत्परतेने आम्ही ते दिलं. मग कुणीतरी सांगितलं की त्या अश्विनी भावे होत्या! पुढे 'राऊ' मधे त्या नायिका होत्या. ती मालिका पाहताना हमखास मग आम्हाला आठवण यायची... वाचकाला हवे ते पुस्तक मिळालं पाहिजे हे आमचे ब्रीद आहे. म्हणूनच आमच्याकडे रवींद्र पिंगे येतात, माधव गडकरी येतात, प्रिया तेंडुलकर येतात, सीमा देव येतात. नावं तरी कोणाकोणाची घेऊ?

येणाऱ्या प्रत्येक वाचकाचे आमच्याकडे स्वागत असते. त्याने पुस्तक खरेदी केलंच पाहिजे असं काही आम्हांला अपेक्षित नसतं. वळण असणं म्हणतात ना ते महत्त्वाचं वाटतं.

पार्ल्याच्या सांस्कृतिक जीवनात आता जवाहर बुक डेपोची साहित्य जत्रा ही अविभाज्य भाग होऊन बसली आहे. तिची वाट पाहिली जाते. आमच्या साहित्य जत्रेचं

यंदा पंचविसावं वर्ष असेल. गेल्या चोवीस वर्षात प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या साहित्यिकांची नावं पाहिली तरी तुमच्या लक्षात येईल. दुर्गा भागवत, रणजित देसाई, गो. नी. दांडेकर, शं. ना. नवरे, शिवाजी सावंत, मंगेश पाडगावकर, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, रवींद्र पिंगे, विश्वास पाटील, सुभाष भेंडे, बाळ सामंत, उषा पुरोहित, मंगला बर्वे, माधव गडकरी, ना. सं. इनामदार....

ह्या साहित्य जत्रेतील साहित्यिकांच्या काही आठवणी सांगतो.

गो.नी. दांडेकर आले होते. त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरीचं प्रकाशन आमच्या साहित्य जत्रेत होतं. अर्थात् स्वाक्षरी समारंभ होताच. गर्दी झालेली होती. अप्पा प्रसन्न दिसत होते. आमच्या छोट्याशाच जागेत आम्ही जी मांडणी केली होती तिचे त्यांनी कौतुक केले आणि आमच्या 'व्हिजिट बुकात' लिहिलं -

यात्रा येथे पुस्तकांची पेठ जणू कैवल्याची ।
येथे भलतेणे यावे ग्रंथतीर्थात नहावे ।।

दुर्गा भागवतांना आम्ही बोलावलं होतं. पण त्या यायच्या आधीच भलामोठा पोलीस फौजफाटा आला. प्रथम आम्हाला काहीच उमगेना. मग लक्षात आलं ते आणीबाणीचे दिवस होते! दुर्गाबाई आल्या. त्यांच्या गावी हा काही प्रकार नव्हताच. त्या आल्या. त्यांच्या पद्धतीने सडेतोड बोलल्या. लोक देखील खूष झाले. पण संपूर्ण कार्यक्रमात आम्हाला मात्र टेन्शन आलेलं होतं. काही वावगं झालं तर ही चिंता होती. त्यामुळे काय झालं, दुर्गाबाई आमच्याकडे आल्या त्या स्टेशनजवळच्या भाजी बाजारातून! एवढी ताजी भाजी पाहून त्या खूष झाल्या होत्या. दुर्गाबाईंनी टेचात भाषण केलं आणि त्या आल्या तशा ताठपणे गेल्या. पण आम्हांला मात्र त्यांना ताजी भाजी घेऊन द्यायची राहून गेली ह्याची अजून रुखरुख वाटते.

अशीच आठवण डॉ. श्रीराम लागूंची. त्यावेळी ते अगदी फॉर्ममधे होते. आम्ही त्यांना साहित्य जत्रेचं आमंत्रण दिलं. त्याच सुमाराला आमच्या मातोश्रींचं दुःखद निधन झालं. त्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला. पण त्यावेळी डॉ. लागू म्हणाले, "मी जर तुम्हाला पुढच्या वेळी हवा असेल तर आधी कळवा. मी येईन."

त्याप्रमाणे दिलेल्या शब्दाप्रमाणे पुढे डॉ. लागू आले. अर्थात् कार्यक्रम यशस्वी झाला हे सांगायला नकोच.

अशा आठवणी सांगाव्या तेवढ्या कमीच. अशा साहित्य जत्रांचा उपयोग वातावरण निर्मितीसाठी होतो. त्या निमित्ताने एकाच वेळी एकाच ठिकाणी अनेक पुस्तकं चाळायला, पहायला मिळतात. एरवी हे शक्य नसते. सर्वसाधारणपणे नेहमी पुस्तकं कोणती खपतात? ज्याला आम्ही काऊंटर सेल म्हणतो ती पुस्तकं म्हणजे - बालवाङ्मय, आरोग्यविषयक पुस्तके, धार्मिक पुस्तके, स्वैयंपाक संबंधातील पुस्तकं. ह्याला पर्याय नाही. आणि नजीकच्या काळात तरी येईल असं वाटत नाही. पण साहित्य जत्रांच्या उपक्रमामुळे इतर

प्रकारची पुस्तकं खपायला मदत होते. रणजित देसाई उपस्थित राहून 'श्रीमान योगी'वर स्वाक्षरी देणार होते. त्यासाठी प्रकाशक अनिल मेहतांनी पाचशे प्रती सोबत आणल्या होत्या. पण प्रत्यक्षात आमच्या साहित्यजत्रेत जवळ जवळ दीड हजार वाचकांची झुंबड उडालेली होती. प्रत्येकाला 'श्रीमान योगी' हवं होतं. त्यांची इच्छा त्यावेळी पुरी करणं अशक्य होतं. तेव्हा काही गोंधळ होऊ नये म्हणून पोलिसांना बोलवावं लागलं होतं! परंतु रांग लावून 'श्रीमान योगी' साठी वाट पहाणारे वाचक हे दृश्य अपूर्वच. कधीही न विसरण्यासारखं....

मात्र ज्याची वाट पहावी असे लेखकच आता दुर्मिळ झाले आहेत. परंतु योग्य जाहिरात केली आणि अर्थात् तसं लेखन असेल तर पुस्तक खपू शकतं. तसा तो लेखक नवाच होता. मात्र प्रकाशकाला त्याच्याबद्दल विश्वास असावा. त्यांनी जाहिरात दणक्यात केली. आम्ही विक्रेत्यांनी देखील तशी साथ दिली. आणि ते पुस्तक तुफान चाललं. तेव्हा त्याचे प्रकाशक म्हणाले, "एखादं पुस्तक नशीब घेऊन आलं तर ते चालतं."

अर्थात् मी विश्वास पाटील यांच्या 'पानिपत'बद्दल आणि त्यांचे प्रकाशक दिलीप माजगावकर यांच्याबद्दल बोलतो आहे हे लक्षात आलंच असेल. महाराष्ट्रात 'पानिपत'ची सर्वात जास्त विक्री आम्ही केली आहे. त्याबद्दल प्रकाशकांनी देखील आमचा सन्मान केला आहे हे मुद्दाम आवर्जून सांगतो.

पण अशी पुस्तकं दुर्मिळच असणार हे उघड आहे. बाकी वाचकांचे आवडते लेखक सांगायचे तर पु.ल. देशपांडे, रणजित देसाई, व. पु. काळे, शं.ना. नवरे, विश्वास पाटील, आचार्य अत्रे, शिवाजी सावंत अशी मोजकीच नावं सांगता येतील.

आम्ही वाचकाला सवलत देतो. परंतु एखादं पुस्तक तेवढच जबरदस्त चांगलं असेल तर वाचक वाटेल ती किंमत देऊन - डिस्काउंट न मागता ते पुस्तक घेतो हा आमचा अनुभव आहे.

ग्रंथप्रसारासाठी व्यक्तिगत पातळीवर सगळ्यांचेच प्रयत्न चालू आहेत. पण सध्याचे दिवस आणि परिस्थिती पाहता वाचनालयांची, ग्रंथघरांची संख्या वाढणं गरजेचं आहे. त्याकरिता अलिकडेच आमच्या 'बालहंडी' पुस्तक प्रदर्शनाच्या वेळी उद्घाटक म्हणून आलेल्या आमदारांना कळकळीची विनंती केली की सार्वजनिक स्वच्छतेसाठी त्यांनी सुलभ शौचालयं-स्वच्छतागृहं बांधली हे योग्यच झालं. परंतु सार्वजनिक मानसिक स्वास्थ्यासाठी त्यांच्या आमदार निधीतून एखादे तरी पुस्तकालय बांधून दिलं तर ही बाब मराठी भाषेच्या व पुस्तकांच्या भवितव्याच्या दृष्टीने निश्चितच आशादायी ठरेल. माझ्या ह्या सूचनेचा इतरांनी देखील विचार करावा."

ग्रंथप्रसार हे ध्येय ठेवून सचोटीचा व्यवहार करणारे दिलीप भोगले यांच्यासारखे दृष्टी असलेले पुस्तक विक्रेते वाढले तर निश्चितच पुस्तकविक्रीचे प्रमाण वाढू शकेल. अर्थात् हे काम सोपे नव्हे.

साहित्य वार्ता

वेदमूर्ती पं. श्री. दा. सातवळेकर

वेदमूर्ती श्री. दा. सातवळेकर यांनी सिद्ध केलेल्या वेदवाङ्मयाचे पुन्नर्प्रकाशन करण्याचे काम पारडी येथील स्वाध्याय मंडळाने हाती घेतले आहे. १९४८ मध्ये सातवळेकर यांनी औंधमधून आपला मुक्काम हलवून गुजरातेत पारडी येथे जाऊन वेद संशोधनाचा व प्रकाशनाचा उपक्रम पुनश्च चालू करावा लागला. त्या घटनेला १० सप्टेंबर रोजी पन्नास वर्षे पूर्ण त्यांचा शतायुषी झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला होता.

आचार्य किशोर व्यास यांच्या हस्ते वेदवाङ्मयाच्या खंडांचे प्रकाशन करम्यात आले; पं. सातवळेकर यांच्या कार्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. पुणे मराठी ग्रंथालयातर्फे हा कार्यक्रम घेण्यात आला.

■ ■ ■ ■

'बालभारती'त आता पाठ्यपुस्तकांचे संग्रहालय

शालेय वयातल्या आठवणींना उजाळा देणारी पाठ्यपुस्तके वाढत्या वयात पुन्हा पाहायला मिळाली तर... आपली ही इच्छा जरूर पूर्ण होऊ शकेल. आतापर्यंतच्या पाठ्यपुस्तकांचे एक संग्रहालय 'बालभारती'च्या ग्रंथालयात आकार घेते आहे.

एखाद्या कवितेची ओळ अचानक आठवते आणि ती कविता पहिल्यांदा वाचताना, शिकतानाचा काळ आठवतो. जुन्या आठवणी जाग्या होतात. ती पुस्तके पुन्हा पाहायला मिळावीत, ती कविता पुन्हा पाहायला मिळावीत, ती कविता पुन्हा वाचायला मिळावी असे तीव्रतेने वाटते. 'वाचनमाला'तील अनेक पाठ आठवतात. त्या वेळची 'वाचनमाला'मधील स्पर्धाही आठवते. ही सगळी पाठ्यपुस्तके 'बालभारती'च्या ग्रंथालयात जमा होत आहेत.

राज्य पाठ्यपुस्तक संशोधन व निर्मिती मंडळाच्या स्थापनेनंतरची सर्व पाठ्यपुस्तके या ग्रंथालयात आहेतच, पण 'मुंबई इलाख्यातील सरकारी शाळा खात्यासाठी, पुण्यातील 'पाठशाळे'करिता 'मुंबईचे शिक्षा मंडळीं'साठी आणि 'मध्यप्रदेश विद्या खात्या'करिता तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तकेही येथे आहेत. 'दख्खन दक्षिणा समिती'ने 'व्हर्न्याक्युलर टेक्स्ट बुक्स रिव्हिजन कमिटी'ने आणि 'एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशन'ने ही पुस्तके वेळोवेळी तयार केली आहेत.

सुमारे बत्तीसशेच्या आसपास ही पाठ्यपुस्तके आहेत. बाळशास्त्री जांभेकर कृत 'भूगोलविद्या' हे यातील सर्वात जुने पुस्तक आहे. ते १८३६ मधील आहे.

या पाठ्यपुस्तकांखेरीज अन्य काही दुर्मिळ पुस्तकेही या संग्रहात आहेत. बाळकृष्ण वैद्य यांनी १८९६ मध्ये 'स्थलनाम कोश' प्रसिद्ध केला आहे. खिशात मावण्याजोग्या आकाराचा ३७६ पानांचा हा कोश आहे. 'हिंदुस्थानचा इतिहास' हा एलफिन्स्टन यांच्या ग्रंथाचा बाळगंगाधरशास्त्री जांभेकर यांनी संक्षेपाने केलेला अनुवाद येथे पाहायला मिळतो. हा ग्रंथ १८४६ मध्ये प्रकाशित झाला आहे. मेजर कँडी यांच्या 'हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' या ग्रंथाचा अनुवाद जांभेकर यांनीच केला आहे. १८५४ मध्ये प्रकाशित झालेली दुसरी आवृत्ती या संग्रहात पाहायला मिळते.

सध्या ग्रंथालयातच ही पाठ्यपुस्तके ठेवण्यात आली आहेत. सर्व विषयांची तसेच मराठीबरोबरच हिंदी, कन्नड, गुजराती या भाषांमधील पाठ्यपुस्तकेही यात आहेत. काही परदेशी पाठ्यपुस्तकेही येथे पाहायला मिळतात. ''या पाठ्यपुस्तकांसाठी स्वतंत्र कक्ष करून 'पाठ्यपुस्तक संग्रहालय' उभारण्यात येईल,'' असे पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी सांगितले.

■ ■ ■ ■

'टायटॅनिक' च्या नायकावर ११ जीवनचरित्रे प्रकाशित

११ ऑस्कर पुरस्कार विजेत्या जगप्रसिद्ध चित्रपटाचा नायक लिओनार्डो डीकॅप्रियोने आतापर्यंत केवळ १२ चित्रपटांमध्ये काम केले असले तरी पुढील महिन्यापर्यंत त्याची ११ जीवन चरित्रे प्रकाशित होतील. अवघ्या २३ वर्षाचा हा देखणा नायक जगभरातील लाखो चित्रपट रसिकांच्या गळ्यातील ताईत बनला आहे.

११ जीवनचरित्रे कमी पडतात म्हणून की काय इंटरनेटवरील ४०० लिओ वेबसाईटवरही त्याचे जीवनचरित्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे वृत्त लंडनच्या 'दि आब्झर्व्हर'ने दिले आहे. 'टायटॅनिक' चित्रपट प्रदर्शित होऊन एवढे दिवस उलटल्यानंतरही नॅन्सी कलिक यांनी लिहिलेल्या त्याच्या चरित्राच्या शेकडो प्रती दर महिन्याला खपत आहेत. कलिक यांनी लिहिलेले चरित्र सर्वात मोठे म्हणजे ९६ पानांचे आहे.

वाचकप्रिय झालेले त्याचे पहिले चरित्र होते 'लिओनार्डो डीकॅप्रियोन अल्बम' ! ब्रायन जे रॉब यांनी ते लिहिले आहे. इंग्लंड व अमेरिकेत तर या पुस्तकाने सर्वाधिक खपाच्या पहिल्या १० पुस्तकांच्या यादीत स्थान मिळविले. जपानमध्येही या पुस्तकाच्या १० हजार प्रती विकल्या गेल्या.

■ ■ ■ ■

ग्रंथ पुरस्कारांची सूची

महाराष्ट्रातील विविध संस्था ग्रंथांना पुरस्कार देतात. त्यांची यादी प्रकाशक संघाने तयार केली आहे. सभासदांना ती उपलब्ध होऊ शकेल.

इंटरनेटवर मराठी पुस्तकांची सूची प्रसृत करण्यात येत आहे. त्याबाबतही संघाशी संपर्क साधावा.

प्राचीन ग्रंथांच्या मायक्रोफिल्मिंग साठी शासनाचे पाच लाखांचे अनुदान

मराठ्यांच्या इतिहासाचे अविरतपणे संशोधन कार्य करणाऱ्या पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळास ८८ वर्षे पूर्ण झाली असून, महाराष्ट्र शासनाने ५ लाख रुपये अनुदान दिले आहे. जुन्या ऐतिहासिक ग्रंथांच्या झेरॉक्स प्रती काढून ग्रंथ संख्या वाढविणे, जुन्या वर्तमानपत्रांचे निराम्ल (डीॲसीलीफिकेशन) करून लॅमिनेशन करणे व प्राचीनकालीन माहितीयुक्त पोथ्यांचे 'मायक्रोफिल्मिंग' करणे ही कामे हाती घेण्यात आली आहेत.

शिवछत्रपतींचा आणि तमाम मराठ्यांचा इतिहास आम जगाला आदर्श ठरावा आणि शिवप्रेमापोटी अधिकाधिक प्राचीन इतिहास लोकांसमोर मांडला जावा, या ध्येयाने प्रेरीत होऊन इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, महामहोपध्याय दत्तो वामन पोतदार खंडेराव मेहंदळे यांनी ७ जुलै १९१० अर्थात आषाढी प्रतिपदा १८३२ रोजी मंडळाची स्थापना केली होती.

सध्याची मंडळाची वास्तू १९२२-२३मध्ये बांधण्यात आली. ख्रिस्ती मिशनरी फादर ॲबर्ट यांनी दिलेल्या आर्थिक मदतीतून उभारण्यात आलेल्या भव्य वास्तूत बसून वि. का. राजवाडे, पोतदार, महंदळे, त्र्यं. शं. शेजवलकर, शंकरराव जोशी, दि. वि. काळे, दत्तोपंत आपटे, बाबासाहेब पुरंदरे, गजानन भास्कर मेहेदळे यांसह अनेकांनी प्रचीन मध्ययुगीन, मराठे, पेशवेकालीन इतिहास लोकांसमोर मांडला. ८९व्या वर्षात पदार्पण करताना अनेक भाषेतील अप्रकाशित दस्तऐवजांचा खजिना मंडळात उपलब्ध आहे. त्यात देणगी स्वरूपात मिळालेली सुमारे २९ हजार पुस्तके, मंडळाने विकत घेतलेली १ हजार पुस्तके, ८ लाख मूळ कागदपत्रे, ६० हजार हस्तलिखित पोथ्या, १६०० पुराणकालीन चित्रे, सोन्याची १०० व साधी १९०० नाणी, दुर्मिळ तलवार, भाले, खुर्च्या, कुकरी, कारागिरीतून तयार केलेल्या मराठेकालीन कलाकुसरीची ओळख करून देणाऱ्या दगडी वस्तू, ताम्रपट, पुणे, सिंध, मुंबई इलाखे तसेच काही संस्थानांचे नकाशे, धुमकेतू, ज्ञानप्रकाश, पुणे वैभव, सुधारक, केसरी यांचे अंक, प्रगती मासिकांच्या ३ वर्षांचे अंक आणि संस्कृत, फारशी या भाषांतील शास्त्र, आयुर्वेद, न्याय, गणित, गीता, शुल्भसूत्र यांच्या ३६ हजार पोथ्या मंडळात उपलब्ध आहेत.

■ ■ ■ ■

'प्रतिभा संगम' साहित्य संमेलन

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे 'प्रतिभा संगम' हे राज्यस्तरीय महाविद्यालयीन साहित्य संमेलन १८ ते २० सप्टेंबर दरम्यान पुण्यात पार पडले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणारे अशाप्रकारचे हे एकमेव संमेलन आहे. यंदाच्या संमेलनात महाराष्ट्राबरोबरच गोव्यातीलही विद्यार्थीही सहभागी झाले.

न्यू इंग्लिश स्कूल, रमणबागेच्या मैदानावर होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते झाले. डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त

पी. डी. पाटील या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. साहित्य प्रकारांचे सादरीकरण करण्याबरोबरच त्याविषयी तज्ज्ञांबरोबर विचारांचे आदानप्रदान करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव हेही उपस्थित होते.

फर्ग्युसन महाविद्यालयातील ज्या खोलीत स्वातंत्र्यवीर सावरकर राहात होते, त्या ठिकाणहून उद्घाटनाच्या दिवशी साहित्य दिंडी काढण्यात आली. त्याच दिवशी 'परंपरा महाराष्ट्राची' हा सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आला. 'काव्यनिर्मिती' या विषयावरील सत्रात प्रा. शंकर वैद्य व डॉ. अरुणा ढेरे यांनी मार्गदर्शन केले. राज्यभरातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम या वेळी झाला. ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांचा कविता वाचनाचा कार्यक्रम हे संमेलनाचे आकर्षण ठरले. 'महाविद्यालयांमधून साहित्य चळवळ हद्दपार होत आहे काय,' या विषयावर खुली चर्चा आयोजित करण्यात आली. समारोपाच्या समारंभाला अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या अध्यक्षा भक्ती बर्वे-इनामदार व परिषदेचे राष्ट्रीय संघटन मंत्री एच. दत्तात्रय हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

■ ■ ■ ■

नव्या शतकाच्या उंबरठ्यावर - महाकादंबरी प्रकल्प...

हैद्राबादचे लेखक डॉ. विजय पांढरीपांडे ह्यांनी नव्या शतकाच्या उंबरठ्यावर ह्या वैशिष्ट्यपूर्ण महाकादंबरीचा प्रकल्प हाती घेतलेला आहे. एका प्राध्यापकाच्या जीवनातील ही धारावाही कथा कौटुंबिक अन् सामाजिक अशा दोन पातळ्यांवर फुलत जाते. विशेष म्हणजे रोज अवतीभवती घडणाऱ्या ताजा घटनांच्या पार्श्वभूमीचा भव्य कॅनव्हास ह्या कादंबरीसाठी वारण्यात आलेला आहे. ह्या शतकातील प्रमुख घटनांचा मागोवा घेत घरातला कौटुंबिक संघर्ष अन् कॉलेज कँपसमधील राजकारणाचा संघर्ष अशा दुहेरी पातळीवरील तारेवरची कसरत एका सुशिक्षित मध्यमवर्गीय गृहस्थाला किती कठिण जाते ह्याचे अंतर्मुख करणारे चित्रण ह्या प्रवाही कादंबरीत आहे. मेनका फेब्रुवारी ९८च्या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध होणारी ही महाकादंबरी जानेवारी २००० च्या अंकात संपणार आहे.

■ ■ ■ ■

स्वामीकार रणजित देसाईंच्या साहित्याचे इतर भाषेत अनुवाद

लोकप्रिय लेखक रणजित देसाई हे 'स्वामीकार' म्हणून प्रसिद्ध आहेतच. 'स्वामी' या गाजलेल्या कादंबरीची यापूर्वीच गुजराती, हिंदी, कानडी या भाषांत भाषांतरे झालेली आहेत. लवकरच श्रीमानयोगी व राधेय या त्यांच्या लोकप्रिय कादंबऱ्याही हिंदीमध्ये अनुवादित होत आहेत. तसेच 'राजा रविवर्मा' ही गाजलेली कादंबरी मल्याळम्‌मध्ये लवकरच प्रकाशित होत आहे.

ए. एस. ए. पब्लिकेशनला फ्रीडम टु पब्लिश अॅवॉर्ड

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स या अखिल भारतीय प्रकाशन संघटनेतर्फे १९९७पासून फ्रीडम टू पब्लिश अॅवार्ड दिले जाते. मागील वर्षी हे अॅवॉर्ड राजपाल अॅण्ड सन्स या प्रकाशन संस्थेस दिले गेले. तर या वर्षी श्री. अरुण शौरी यांच्या ए.एस.ए. पब्लिकेशन या संस्थेला देण्यात आले. श्री. अरुण शौरी यांनी लिहिलेली Worshipping False Gods व Fatwas ही दोन्ही पुस्तके इतर प्रकाशक प्रकाशित करू शकले नसते. अशा धाडसी प्रकाशकांनाच हे अॅवॉर्ड दिले जाते. माजी पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

अनिल मेहता अरुण शौरींचे अभिनंदन करताना

■ ■ ■ ■

'घरी एकच पणती'चे प्रकाशन

रयत शिक्षण संस्थेचे आजीव सेवक प्राचार्य आ. भा. मगदूम यांच्या शैक्षणिक आत्मचरित्राचे प्रकाशन प्रसिद्ध संशोधक डॉ. य.दि. फडके यांच्या हस्ते सातारा येथे दि. २२ सप्टेंबर रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात झाले. ग्रंथविशेष प्रतिष्ठान, ८५७ शनिवार पेठ, सातारा यांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. "प्रा. आ.भा. मगदूम यांचे हे आत्मवृत्त वाचताना कर्मवीरांच्या शैक्षणिक प्रयोगांची महती मनावर अधिकच प्रभावी ठसा उमटवते. असे निष्ठावंत कार्यकर्ते कर्मवीरांनी शोधले, घडवले आणि सांभाळले. कर्मवीरांनी रत्नपारख्यांप्रमाणे अठरापगड जातीतली नररत्ने हेरून काढली आणि त्यांना पैलू पाडले. त्या सर्वांच्या तेजाने रयतेचा सर्व संरजाम हा झगमगून उठतो" असे मत शंकर सारडा यांनी व्यक्त केले.

प्रा. रा. तु. भगत लिखित 'केवळ पांडुरंग' पुस्तकाचा प्रकाशन समारंभ

प्रा. रा. तु. भगत लिखित 'केवळ पांडुरंग' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ कोल्हापूर दैनिक सकाळचे संपादक मा. अनंत दिक्षीत यांच्या शुभहस्ते दि. १०-९-९८ रोजी करवीरनगर वाचन मंदीर कोल्हापूर येथे संपन्न झाला. या प्रसंगी डॉ. सुनीलकुमार लवटे व प्रा. मानसी दिवेकर यांनी पुस्तकाविषयी आपले विचार व्यक्त केले.

■ ■ ■ ■

अनिल मेहता यांची बिनविरोध निवड

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स या संघटनेची २९ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे निवडणूक झाली, त्यामध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांची मेंबर ऑफ एक्झिक्युटिव्हमध्ये बिनविरोध निवड करण्यात आली.

■ ■ ■ ■

मराठीत २६१ दैनिके

१९९६मधे भारतात एकूण ४४५३ दैनिके निघत होती अशी माहिती प्रेस रजिस्ट्रारतर्फे देण्यात आली आहे. त्यापैकी हिंदी भाषेत सर्वात जास्त म्हणजे २००४ दैनिके असून त्या खालोखाल हिंदीत ४७३ दैनिक निघत होती. तामीळ भाषेत ३२७ तर इंग्लिशमध्ये ३२० दैनिके आहेत. कानडी (२६८) व मराठी (२६१) यांची जवळ जवळ बरोबरी होते. मल्याळममध्ये २०४ तर हिंदीत २००४ दैनिके आहेत. टाइम्स ऑफ इंडिया या दैनिकाच्या सर्व आवृत्त्यांचा एकत्रित खप ९ लाख ४१ हजार प्रतींपेक्षा जास्त आहे. भारतात सर्वात जास्त खपणारे तेच दैनिक आहे.

■ ■ ■ ■

डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांच्या दोन ग्रंथांचे प्रकाशन

राज्य मराठी विकास संस्थेतर्फे हैद्राबादचे डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांची दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार आणि साहित्य सेतू या दोन ग्रंथांचे प्रकाशन हैद्राबादच्या सुंदरय्या विज्ञानभवनात दि. २६ सप्टेंबर रोजी प्रा. द. मा. मिरासदार यांच्या हस्ते करण्यात आले. मध्ययुगीन आंध्र-कर्नाटक व महाराष्ट्र यांचे सांस्कृतिक संबंध, तंजावरच्या राजांचे तेलगु यक्षगान परंपरेला योगदान या वरील चर्चासत्रात डॉ. अ. रा. कुलकर्णी, डॉ. पंडित आवळीकर, डॉ. भीमाशंकर देशपांडे प्रभृती सहभागी झाले होते. डॉ. कुलकर्णी आणि दिल्लीचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते ज. शं. वाटाणे यांना साहित्य संस्कृती मंडळातर्फे गौरववृत्ती प्रदान करण्याचाही कार्यक्रम यावेळी झाला. हैद्राबादमधील मराठी संस्थांच्या वतीने प्रा. मिरासदार यांचाही सत्कार करण्यात आला.

'हिमकोंदणातील हिरा'चे प्रकाशन

एव्हरेस्ट बेस कँपपर्यंतच्या मोहिमेचे वर्णन करणारे सूर्यकांत कुलकर्णी यांनी लिहिलेले प्रवासवर्णन एव्हरेस्टवर विजयी पाऊल ठेवणारे पहिले मराठी गिर्यारोहक सुरेंद्र चव्हाण यांच्या हस्ते दि. १२ सप्टेंबर रोजी यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक सुनील मेहता यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वीज मंडळाचे पुणे येथील प्रमुख अभियंता अशोक शिंदे, मोहिमेचे प्रमुख चंद्रशेखर सबनीस, यांनीही यावेळी सूर्यकांत कुलकर्णी यांनी ललितरम्य भाषेत गिर्यारोहणाची कहाणी सांगितली आहे. आपले सहकारी, वेगवेगळ्या मुक्कामाची वर्णने, तेथील पर्वतशिखरांची वैशिष्ट्ये, भेटणारे सहप्रवासी, बदलते हवामान यांचे वर्णन इतके उत्तम आहे की आपणही या मोहिमेचे एक घटक आहोत असे वाचकाला वाटते असे उद्गार या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष शंकर सारडा यांनी काढले. कार्यक्रमाला वीज मंडळाचे अनेक अधिकारी आवर्जून उपस्थित होते.

डावीकडून : सूर्यकांत कुलकर्णी, अशोक शिंदे, गिर्यारोहक सुरेंद्र चव्हाण व आपले विचार मांडताना अध्यक्ष श्री. शंकर सारडा

■ ■ ■ ■

अ. भा. मराठी प्रकाशक संघाची वार्षिक सभा

संघाच्या वार्षिक सभेत संघाने फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स या संस्थेचे सदस्यत्व घ्यावे अशी सूचना अनिल मेहता यांनी केली. ती सर्वांनी मान्य केली. संघाने प्रकाशनतंत्रावरील कार्यशाळेस उत्तम प्रतिसाद मिळाला. दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या सर्व मराठी प्रकाशनांची सूची करणे, मराठी ग्रंथ सप्ताहाचे स्वतंत्र आयोजन करणे, केशव भिकाजी ढवळे या प्रकाशन संस्थेच्या शंभराव्या वर्षातील पदार्पणानिमित्त कार्यक्रम घेणे वगैरे विषयांवर चर्चा झाली.

प्रकाशकांनी पंचाहत्तर रुपये वार्षिक वर्गणी भरून संघाचे सदस्य व्हावे असे आवाहन करण्यात आले. (पत्ता : द्वारा दिलीपराज प्रकाशन, २५१ शनिवार पेठ, पुणे ३०. फोन : ४५२२१४.)

■ ■ ■ ■

विश्वास प्रतिष्ठानचे दलित साहित्य दालन

दलित लेखकांची पुस्तके एकत्र मिळण्यासाठी विश्वास प्रतिष्ठानतर्फे व्यवस्था करण्यात येत आहे. दलित पुस्तकांचे एक प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे. संपर्क : विश्रास गांगुर्डे, यू-८, म्युनिसिपल कॉलनी नं. ७, शंकरशेठ रोड, पुणे-४२. फोन : ६५१२३३.

■ ■ ■ ■

साहित्यनिर्मितीत रमून जाणार तत्त्वज्ञ डॉ. प्र. न. जोशी

ज्येष्ठ साहित्यिक, तत्त्वज्ञ, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक आणि विज्ञान विषयावर प्रभुत्व गाजविणारे डॉ. प्र. न. जोशी यांना त्यांच्या या अमृतमहोत्सवी वर्षातच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे 'गौरव वृत्ती' हा सन्माननीय पुरस्कार प्राप्त झाला. मंगळवारी आठ सप्टेंबर रोजी सायंकाळी 'सामदा' या त्यांच्या पुण्यातील घरीच हा पुरस्कार प्रदान समारंभ संपन्न झाला.

डॉ. जोशी यांच्या वाचन, स्मरण व लेखन या बौद्धिक शक्ती आजही टवटवीत आहेत. वाचनातील विविधता आणि व्यापकता, स्मरणशक्तीतील सखोलता व निश्चितता, लेखनातील माधुर्य आणि कौशल्य आदी सर्व सतेज आहेत. संत साहित्य, विज्ञानविषयक लेख, संदर्भ ग्रंथ, प्रवास वर्णने, शास्त्रज्ञांची व संतांची चरित्रे, कादंबऱ्या, अठरा पुराणांचे सुबोध, साक्षेपी, सुरस मराठी रूपांतर, रामायण-महाभारतासारख्या मोलाच्या राष्ट्रीय ग्रंथांचे मर्मग्राही, मनोज्ञ संपादन, आदर्श मराठी शब्दकोश अशी त्यांची विविध स्वरूपी प्रचंड ग्रंथसंपदा आहे.

सातारा जिल्ह्यातील खरशी येथे २४ एप्रिल १९२४ रोजी प्र. नं.चा जन्म झाला. संतप्रवृत्तीचे प्रवचनकार नरहरशास्त्री खरशीकरांचे ते सुपुत्र. सुसंस्कृत घराण्यात जन्म झाल्याने संत साहित्य व धार्मिक वाङ्मय वाचनाची गोडी त्यांना लागली. त्यांचे माध्यमिक शिक्षण वाई व फलटण येथे झाले. हिंदी व मराठी घेऊन मुंबई विद्यापीठातून एम.ए. झाले. 'मराठी साहित्यातील मधुरा भक्ती' या विषयावर त्यांनी पुणे विद्यापीठाची पीएच.डी. संपादन केली.

■ ■ ■ ■

माडखोलकर, देशमुख यांचे गौरवग्रंथ प्रकाशित होणार

ज्येष्ठ साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्य साहित्य व संस्कृती मंडळातर्फे गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात येणार आहे. मंडळाचे अध्यक्ष द. मा. मिरासदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

बैठकीस निर्मलकुमार फडकुले, रवींद्र पिंगे, व इतर मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कार

महावीर जोंधळे यांना 'एकमत' पत्रकारिता पुरस्कार

पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी दिला जाणारा एकमत पत्रकारिता पुरस्कार यावर्षी 'लोकमत' वृत्तपत्राच्या औरंगाबाद आवृत्तीचे कार्यकारी संपादक महावीर जोंधळे यांना देण्यात आला.

पत्रकारितेच्या क्षेत्रात अत्यंत मानाचा समजल्या जाणाऱ्या या पुरस्काराने आजवर महाराष्ट्र टाइम्सचे माजी संपादक गोविंद तळवलकर, ज्येष्ठ पत्रकार व स्वातंत्र्य सेनानी कांतीलाल गुजराथी, दै. लोकसत्ताचे संपादक अरुण टिकेकर, सकाळचे संपादक विजय कुवळेकर, महाराष्ट्र टाइम्सचे माजी क्रीडा संपादक वि.वि. करमकर, इंडियन एक्सप्रेस वृत्तसमुहाचे ज्येष्ठ छायाचित्रकार मोहन बने यांचा गौरव करण्यात आला आहे.

११ हजार रुपये रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे स्वरूप असलेला हा पुरस्कार १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्याच्या स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या मुहूर्तावर लातूर येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

महावीर जोंधळे हे दैनिक 'लोकमत'च्या औरंगाबाद आवृत्तीचे कार्यकारी संपादक आहेत. मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दिला जाणारा उत्कृष्ट अग्रलेखासाठीचा काकासाहेब खाडिलकर पुरस्कार सलग तीन वेळा जोंधळे यांना देण्यात आला आहे.

■

विष्णुदास भावे पुरस्कार : सुधा करमरकर

बालरंगभूमीच्या प्रवर्तक व ज्येष्ठ अभिनेत्री सुधा करमरकर यांना यंदाचा विष्णुदास भावे पुरस्कार रंगभूमीदिनी ५ नोव्हेंबर रोजी सांगली येथे देण्यात येईल. पस्तीस बालनाट्यांची निर्मिती, पाच बालनाट्यांचे लेखन, बालनाट्याचे दोन हजारावर प्रयोग, १९५२ ते ९३ या कालावधीत पंचवीस नाटकात भूमिका असे अफाट कर्तृत्व त्यांच्या नावावर जमा आहे.

■

'कळ्यांचे निश्वास' सांगणाऱ्या मनस्विनीचा हृद्य सत्कार

महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाच्या वतीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे व मंडळाचे अध्यक्ष द. मा. मिरासदार यांच्या हस्ते श्रीमती मालतीबाई बेडेकर यांचा ८ सप्टेंबर रोजी गौरववृत्ती देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी नव्वदीतही मनाचा

टवटवीतपणा, पंचेंद्रियाची कार्यक्षमता, सूक्ष्म विनोदबुद्धी व स्मृती तल्लख असल्याचा प्रत्यय मालतीबाईंनी छोट्याशा मनोगतातून दिला. मानपत्र, शाल, श्रीफळ व २५ हजार रुपये असे या गौरववृत्तीचे स्वरूप आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व मालतीबाईंचे पती विश्राम बेडेकर, मंडळाच्या उपाध्यक्षा नीला उपाध्ये, सचिव चंद्रकांत वडे यांच्यासह मंडळाचे अन्य सदस्य यावेळी उपस्थित होते. रँग्लर र. पु. परांजपे रस्त्यावरील बेडेकर दाम्पत्याच्या निवासस्थानी हा हृद्य सोहळा साजरा झाला. एरवी गर्दीपासून दूर, अलिप्त राहणाऱ्या या उभयतांना एकमेकांचे मनोगत ऐकताना मात्र अश्रू आवरता आले नाहीत.

समाजाला विरोध करून जगायला शिकवणारे वडील अनंत महादेव खरे, गुरू वामनराव जोशी आणि पती विश्राम बेडेकर या तिघांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करून मालतीबाई म्हणाल्या, 'या तिघांनी मला खूप काही दिले. त्यामुळे माझ्या प्रतिभेपेक्षाही या तिघांची मदतच मला अधिक उपयोगी पडली.'

सुमारे ८० वर्षापूर्वी पुण्यात सातवीची परीक्षा द्यायला शिरूरहून आले होते, अशी आठवण सांगताना त्या म्हणाल्या, 'त्या काळात शिकणारी ही मुलगी कोण आहे, ते पहायला लोक आले होते. मी वडिलांबरोबर परीक्षा हॉलमध्ये गेले. पण परीक्षेचा पेपर लिहावा, या पेक्षा गाणे ऐकायचे आहे असे मी वडिलांना सांगितले. वेड्यासारखे काय करतेस, असे वडील म्हणाले. पण मी मनासारखे केले. त्यावर्षी नापास झाले पण पुढच्या वर्षी पहिला नंबर मिळवला.'

'हिच्याकडे नेहमीच दुर्लक्ष झाले आहे, अशी माझी भावना होती. पण आज हा गौरव होत असल्याने हा शुभदिवस आहे', अशी भावना मालतीबाईंचे यजमान विश्राम बेडेकर यांनी व्यक्त केली.

प्रियदर्शनी पुरस्कार

प्रियदर्शनी पुरस्काराचा मान यावर्षी 'हंस अकेला' या कथासंग्रहाबद्दल लेखिका मेघना पेठे यांना मिळाला.

मधुकरराव महाजन स्मृती पुरस्कार

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने मधुकरराव महाजन स्मृती पुरस्कार या वर्षी वैचारिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विचारवंतास, लेखकास दिला जाणार आहे. पाच हजार रुपये रोख व मानपत्र असे त्याचे स्वरूप असून तो अनुक्रमे राष्ट्रवादी विचारांचे सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत आणि लेखक, पत्रकार व उद्योजक या तीन गटात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना प्रतिवर्षी एक गट या पद्धतीने दिला जातो.

श्रद्धांजली

ज्येष्ठ पत्रकार नरुभाऊ लिमये

ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक नरहर वामन तथा नरुभाऊ लिमये याचे ३० ऑगस्ट रोजी पहाटे निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. नवमहाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा उचलेल्या नरुभाऊंनी गेली सुमारे पन्नास वर्षे आपल्या स्पष्टवक्तेपणाने आणि लेखणीने काँग्रेसची वैचारिक बैठक पक्की करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काँग्रेसजनात त्यांना आदराचे स्थान होते.

स्वातंत्र्य चळवळीपासून सामाजिक कार्यास सुरुवात केलेल्या नरुभाऊ लिमये यांनी त्यानंतरच्या सत्तर वर्षांच्या कालखंडात पत्रकारिता, राजकीय, सांस्कृतिक आदी विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली.

त्यांनी जेव्हा पत्रकारितेच्या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले, तेव्हा विशिष्ट शैलीचे लेखन 'समर्थ' या साप्ताहिकात आणि 'प्रकाश' या दैनिकात प्रसिद्ध होत होते. 'प्रकाश' दैनिक तर त्यांनी स्वबळावर चालवून दाखविले. पत्रकाराच्या दृष्टीने त्यांनी गेल्या सत्तर वर्षातील महाराष्ट्रातील घडामोडी टिपल्या.

नरुभाऊ १९६६ ते ७८ अशी बारा वर्षे विधान परिषदेचे सदस्य होते. सत्तारूढ पक्षाचे प्रवक्ते म्हणून त्यांनी विरोधकांच्या विधायक टीकेचे स्वागत केले. पक्षामध्ये जुन्या आणि नव्या नेतृत्वाचा सुसंवाद व्हावा, यासाठी ते प्रयत्नशील असत. वयाची सत्तरी उलटली तरी पाच वर्षे 'गतिमान' साप्ताहिक चालवून शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेसला साथ दिली.

सध्याचे 'महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय' स्थापनेपासून प्रचंड तोट्यात होते. या सहकारी संस्थेत त्यांनी लक्ष घातले आणि संघटनचातुर्य, सहकारी चळवळीवरील निष्ठा, अचूक निर्णय या बळावर संस्थेस चांगल्या स्थितीत नेले. संस्थेचा बाविसावा अहवाल नफ्याचा उच्चांक गाठणारा ठरला.

नरुभाऊंना आयुष्यात अनेक पुरस्कार, सत्कार लाभले. त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार १९६९ मध्ये पुण्याच्या काँग्रेस

भवनात झाला. ऐंशीव्या वर्षी शंतनुराव किर्लोस्कर आणि अच्युतराव पटवर्धन यांच्या उपस्थितीत १९८९ मध्ये त्यांचा सत्कार झाला. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

'गावकरी'चे संस्थापक संपादक दादासाहेब पोतनीस

ज्येष्ठ पत्रकार व नाशिक येथील 'दै. गावकरी'चे संस्थापक संपादक दत्तात्रय शंकर उर्फ दादासाहेब पोतनीस (वय८९) यांचे दि. २७ ऑगस्ट रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

त्यांचा जन्म दि. २२ नोव्हेंबर १९०९ रोजी वाई, जि. सातारा येथे झाला. १९३० मध्ये बी.ए.च्या वर्गातून कॉलेज सोडून चळवळीत सहभाग घेतला. एकूण पाच वेळा निरनिराळ्या वेळी तुरुंगवास भोगला. पूर्ण वेळ काँग्रेस कार्यकर्ता म्हणून अनेक वर्षे काम केले.

१९३०पासून नाशिक येथे राजकीय कार्यास प्रारंभ. १९३१ मध्ये रविवार कारंजाजवळील जेलमध्ये दीड महिना कारावास. १९३१ मध्ये बागलाण येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना. १९३२ मध्ये भूमिगत राहून काम केले. नाशिक जिल्हाप्रमुख म्हणून काम केले. नंतर सत्याग्रह करून तुरुंगवास भोगला. जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीसपद अनेक वर्षे सांभाळले. सन १९३४ मध्ये वर्षभर विनोबांच्या सहवासात राहून कार्य केले. नाशिक जिल्हा कांग्रेसचे पार्लमेंटरी बोर्डाचे चिटणीसपदही सांभाळले. निवडणूक प्रचार व संघटनाचे काम अनेक वर्षे केले.

१९५० साली नाशिक येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या प्रसिद्धी समितीचे प्रमुख होते. सन १९३८मध्ये 'गावकरी' वृत्तपत्र सुरू केले. १९५२ साली 'अमृत' ह्या नावाचे मराठी डायजेस्ट चालू केले. ते आजही चालू आहे.

पत्रकारितेसारख्या सर्वार्थाने धारदार असलेल्या क्षेत्रामध्ये निष्ठावंत गांधीवादी असून, त्यांनी कट्टर व्यवहारवादी दृष्टिकोन कधी सोडला नाही. त्यामुळेच त्यांनी व्यवसायात लक्षणीय यश संपादन केले. त्यांना आमची विनम्र श्रद्धांजली.

शिक्षणतज्ज्ञ, माजी कुलगुरू प्रा. राम जोशी

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. राम जोशी (वय ७४) यांचे दि. १४ सप्टेंबर रोजी कर्करोगाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी वत्सला आणि दोन मुले असा परिवार आहे.

फुले आणि काटे

तात्कालिक विषय भडक करण्याची साहित्याची सध्याची रीत - *ग्रेस*

तात्कालिक विषय भडक करून सांगण्याची बेजबाबदार रीत साहित्यक्षेत्रामध्ये अलिकडच्या काळात वाढीस लागली असून, श्रेष्ठ सृजनशील आत्म्याला नामोहरम करण्याच्या गचाळ क्लृप्त्या लढविल्या जात आहेत.

"श्रेष्ठ कलाकृतीमध्ये आत्म्यात स्फोट करण्याची ताकद असते. अलिकडच्या काळात बाहेरून नको तितका विचार होतो, पण आतून विचार होताना दिसत नाही. माझी कविता दुर्बोध आहे, असे अनेकजण म्हणतात पण शेवटी सर्व सुबोध असून तरी काय करायचे? कपाळ दुखले तर ॲनासिन घेतात. ललाट दुखले तर काय घेणार? ही ललाटलिपी समजली नाही तर दगडावर कपाळमोक्ष करण्याची हौस कधीच फिटत नाही."

–कवी ग्रेस.

ग्रंथालये आणि संगणकाचा वापर

मराठी व अन्य प्रादेशिक भाषांमधील माहितीचे संकलन करणारे सॉफ्टवेअर निर्माण करणे आवश्यक आहे आणि असे सॉफ्टवेअर निर्माण होताच, ज्या गतीने इंग्रजी ग्रंथ असणारी संशोधन ग्रंथालये संगणकाचा वापर करू लागली, त्याच वेगाने विद्यापीठ, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयेदेखील संगणकाचा वापर करू लागतील. असे सॉफ्टवेअर किती लवकर तयार केले जाते, यावर हे सर्व अवलंबून आहे.

ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी ग्रंथालयशास्त्रात घेतलेले संगणकाचे ज्ञान जुजबी आहे. ते अधिक सखोल असले पाहिज. कारण संगणकाचा वापर ग्रंथालयाच्या कोणत्या कामासाठी आणि कसा करावा, एवढेच त्या तर अभिप्रेत नाही.

ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासक्रमात प्रलेखन, संगणकाची मूलतत्त्वे, , त्यांचा ग्रंथालयातील वापर आणि संगणकाचा वापर करणाऱ्या ग्रंथालय सेवा पद्धतींचा अभ्यास अशा विषयांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यामुळे आधुनिक ग्रंथालयात सक्षम ग्रंथपाल मिळत आहेत.

ग्रंथालयशास्त्राचा मूळ उद्देश वाचकांना सेवा देणे, साहित्य उपलब्ध करून देणे, त्यासाठी इतर ग्रंथालयांशी समन्वय साधणे असा आहे, तो यापुढेही राहणार आहे. वाचक ग्रंथालयात येणार आहे आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची त्यांना सेवा देण्याची वृत्ती राहणार

आहे, तोपर्यंत ग्रंथालयशास्त्राचे मूळ उद्देश अबाधित राहणार आहे. ग्रंथालयातील साहित्याचे स्वरूप बदलेल, वाचक बदलतील, त्यांच्या गरजा बदलतील, साहित्य प्रसाराचा वेग वाढेल. तरीदेखील ग्रंथालय ही संस्था आणि त्यातील साहित्य कायम टिकणार आहे.

–एस.पी. सातारकर, *ग्रंथपाल,*
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शुद्धलेखन नियमावलीचा फेरविचार करा!

कोणत्याही भाषेची लेखनपद्धती ही अपरिवर्तनीय अशी कधीच नसते व मराठीचीही तशी नव्हती, पण प्रत्येक वेळी असे बदल करण्यासंबंधीची चर्चा व्याकरणाच्या अनुषंगाने होत असे. १९३० साली 'महाराष्ट्र साहित्य परिषदे'ने पुढीलप्रमाणे ठराव केला होता : ''केवळ उच्चाराप्रमाणे शुद्धलेखन असावे, हे तत्त्व या मंडळाला संमत नसून, परंपरा, वर्तमानकालीन प्रचार, व्युत्पत्ती, व्याकरण व उपयुक्तता यांचा शुद्धाशुद्ध ठरवण्याच्या कामी विचार व्हावा.'' (शुद्धलेखन विवेक – डॉ. द. न. गोखले – १ ली आवृत्ती पृ.१०) पण हळूहळू काळाच्या ओघात एकेक निकष गळून पडला आणि 'उच्चार' हा एकमेव निकष उरला. तोही आता नाबाद होण्याच्या मार्गावर असून, 'स्वेच्छा' नामक कसोटीने त्याची जागा घेतली आहे. 'जो जे वांछील तो ते लिहो' अशी सद्य:स्थिती आहे.



एव्हरेस्ट बैस कॅम्प मोहिमेतील अनुभवांचे वेधक चित्रण

हिमकोंदणातील हिरा

सूर्यकांत कुलकर्णी

विविध शैलीची झाडे या कलेच्या आधारे आपण घरात आणू शकता

बोन्साय

आ. बा. पाटील

स्पर्धा निकाल

ऑगस्ट १९९८ – 'जोड्या जुळवा'

उत्तर :	१)	मूल (कादंबरी)	: **संजोग वीरकर**
	२)	चितेवरच्या कळ्या (कादंबरी)	: **वसंत गायकवाड**
	३)	रंग सुखाचे (लेख)	: **शान्ता शेळके**
	४)	कालिंदीच्या तीरावरती (कथा)	: **य. दि. फडके**
	५)	रोदँ (कादंबरी)	: **शांताराम पारपिल्लेवार**

'नवीन पुस्तके-नवीन लेखक' जोड्या जुळवा' स्पर्धेला खूपच प्रतिसाद मिळाल्याने आम्ही या स्पर्धेतून पाच विजेते निवडले आहेत.

यशस्वी स्पर्धक :

१) **सौ. शुभांगी शाम जोगळेकर,** शासकीय वसाहतीमागे, अलिबाग, जि. रायगड–४०२२०१.
२) **गोविंद भगवान हराळकर,** मु.पो. तूगांव, ता. उमरगा. जि. उस्मानाबाद–४१३६०४.
३) **समीर कोकळे,** म्यु. घर नं. ७७५ माळी गल्ली, मु.पो.ता. तासगाव, जि. सांगली–४१६३१२.
४) **शिवकुमार नि. बोरगावकर,** मु. बोरगांव (बु.), ता. उदगीर, जि. लातूर.
५) **सौ. शैलजा वि. टेंभुर्णीकर,** 'श्रीदत्त', रविकिरण स्टेट बँक कॉलनी, कलानगर चौकाजवळ, गुलमोहर रोड, अहमदनगर – ४१४००३.

मुखपृष्ठे शोधा : बक्षीस मिळवा

वरील स्पर्धेत भाग्यवंत ठरलेल्या स्पर्धकांचे अभिनंदन. त्यांनी आपल्या आवडीची, आमच्या प्रकाशनाची रु. १००ची पुस्तके कळवावी. ती त्वरित पाठवण्यात येतील.

१) **सौ. कल्पना मोरे,** 'आशीर्वाद' श्याम कॉलनी, रामनगर, उदगीर–४१३५१७, जि. लातूर.
२) **किशोर मंजाजी नेटके,** द.सा. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय (जिंतुर)–४३१५०९, जि. परभणी.
३) **लोकसेवा संघ वाचनालय,** र.नं. ५४६,इ–स्थापना–१९१६, गणेशवाडी–४१६१०५, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.
४) **बारकू लाला पाटील,** मु.पो. जुनवणे–४२४३११, ता. जि. धुळे.
५) **दिलीप साळवेकर,** महाराष्ट्र चेंबर, सारडा संकूल, वकीलवाडी, नाशिक – ४२२००१.

वरील दोन्हीही स्पर्धांत भाग्यवंत ठरलेल्या स्पर्धकांचे अभिनंदन. त्यांनी आपल्या आवडीची, आमच्या प्रकाशनाची रु. १००ची पुस्तके कळवावी. ती त्वरित पाठवण्यात येतील.

शब्दकोडे क्र. ६चे उत्तर

नि	मि	त्ता	नि	मि	त्ता	ने	
रं							
ज	पा	नी	लो	क	क	था	
न		लू		था			व
घा	टे		शे	क	रा		न
टे		घ		म			दे
	हि	र	व	ळ		दे	व
							ता

या स्पर्धेत खालील भाग्यवंत उमेदवार बक्षीसपात्र ठरले आहेत.
त्यांनी प्रत्येकी १०० रुपयांची पुस्तके कळवावी.

१) **दत्तात्रय प्रल्हाद कुलकर्णी,** स्टेट बँक कॉलनीमागे, शिवाजीनगर, मु.पो.ता. जामनेर, जि. जळगाव, जामनेर - ४२४२०६.

२) **सौ. जया फेगडे,** १, गणेश विहार, समर्थ गृह समुह, अंबरनाथ (पूर्व) पिन - ४२१५०१.

३) **गजानन येवले,** मु. पो. सोनई, ता. नेवास, जि. अहमदनगर.

दिवाळीनिमित्त खास स्पर्धा

या अंकात अनेक लेखकांनी आपल्या पुस्तकाच्या जन्मकथा सांगितल्या आहेत. या जन्मकथांपैकी तुम्हांला सर्वात जास्त आवडलेल्या फक्त पाच पुस्तकांची नावे कळवायची आहेत. वाचकांच्या निवडीत अग्रक्रम मिळविणाऱ्या पहिल्या पाच पुस्तकांची नावे बरोबर कळविणाऱ्या स्पर्धकांपैकी पहिल्या तीन जणांना प्रत्येकी १०० रुपयाची पुस्तके बक्षीस देण्यात येतील. नियम व अटी नेहमीच्याच.

मला आवडलेली जन्मकथा - पुस्तकाचे नाव

१) ....
२) ....
३) ....
४) ....
५) ....

उत्तर कार्डावर पाठवा. मुदत - **२० नोव्हेंबर १९९८.**
आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे - ४११०३

स्पर्धा (१) नावे कळवा - बक्षीस मिळवा

'ग्रंथजगत'च्या नियमित वाचकांना ह्या स्पर्धेत सहज यश मिळवता येईल. खाली 'ग्रंथजगत'मध्ये यापूर्वी येऊन गेलेल्या पुस्तक परिचयाची सुरुवात व शेवट दिलेला आहे. त्यावरून तो पुस्तक परिचय कोणत्या पुस्तकाचा आहे व ग्रंथजगतच्या कोणत्या अंकात प्रसिद्ध झाला होता ते कळवावे. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी तिघांना लॉट टाकून प्रत्येकी १०० रुपये किंमतीची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील.

१) मराठीत विज्ञानविषयक लेखन सातत्याने करणाऱ्या ----------- ------------------- शतकात पडणार आहे.

२) एकसे तीस वर्षांपूर्वी म्हणजे ------------------- माझ्यासाठी धाडून.

३) भारताच्या औद्योगिक जडणघडणीत -------------------- उन्नयन होते मनाचे।

४) एरिक व्हॉन डॅनिकेन याने एक ग्रंथ --------------- आणणारे ठरेल.

स्पर्धा (२) नावे कळवा - बक्षीस मिळवा

खाली काही पुस्तकांची नावे दिली आहेत. आपणास पुस्तकाचा वाङ्मयप्रकार व लेखकाचे नाव कळवायचे आहे. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी तिघांना लॉट टाकून प्रत्येकी १०० रुपये किंमतीची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील.

१) अनुभव : बासु भट्टाचार्य
२) शेलका साज
३) पराजिता
४) मनस्विनी
५) निष्पाप
६) प्रत्यय
७) मंडेलांच्या देशात
८) परिशोध

उत्तर कार्डावर पाठवा. मुदत - **२० नोव्हेंबर १९९८.**
आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत,** मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणे - ४११०३

वाचकांचा प्रतिसाद

नव्या पुस्तकांचे सारांश फार चांगले असतात. विद्यार्थी आणि प्रौढ वाचकांसाठी चालविलेल्या स्पर्धा या वाचनवृत्ती वाढविणाऱ्या आहेत. मजकुराचा 'ले-आऊट' व छपाई देखणी आहे. साहित्यविश्वातल्या घडामोडी आणि 'फुले आणि काटे' हे वाङ्‌मयप्रेमींना मेजवानीसारखे वाटेल. आपण ठेवलेल्या वार्षिक वर्गणीत एवढं भरघोस मॅटर देणं कौतुकाचं आहेच. पण आणखीही काही करता येण्याजोगं आहे. उदा. एक (वा दोन) पानी कथा आणि तशीच ललितलेख स्पर्धा. वर्षभरात जे चांगलं साहित्य यांतून मिळेल, त्याचे प्रातिनिधिक संग्रह होऊ शकतील. असं लेखन सर्वस्वी ताजं, नव्या दमाचं असेलच. पण ते त्या त्या लेखकांना प्रोत्साहनही देईल.

–सुमेध वडावाला (रिसबूड), विलेपार्ले

'मेहता मराठी ग्रंथजगत' मी प्रथमपासून आवडीने वाचत असतो. ग्रंथव्यवहाराला वाहिलेल्या कोणत्याही नियतकालिकात माझ्यासारख्याला स्वारस्य वाटते. आपण ते रसिकतेने संपादित करीत असता. ऑगस्ट १९९८च्या अंकातील 'ग्रंथसंस्कृतीची उपासना अपरिहार्य' हे संपादकीय खूप काही सांगून जाते. त्यातील आकडेवारी लक्षात ठेवावी अशी.

–डॉ. सुभाष भेण्डे,
५ ज्ञानदेवी, साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व), मुंबई–४०००५१.

आपले मासिक मी आत्तापर्यंत नियमित वाचत आलोय. परंतु तुमच्या स्पर्धांना स्पर्धक म्हणून भाग प्रथमच घेत आहे.

खरंच, आपलं प्रकाशन अप्रतिम आहे. त्यातून वाङ्‌मयीन अभिरुचीला खूप खाद्य मिळते.म्हणून माझे आवडते मासिक म्हणजे फक्त आपलेच.

–हेमंतकुमार आसाराम ठोंबरे,
सारंग गल्ली, पोलीस क्वार्टर रोड, दत्तमंदिरजवळ, सेलू, जि. परभणी–४३१५०३.

मी आपल्या 'मराठी ग्रंथजगत'चा नियमित वाचक आहे. हे मासिक नवीन पुस्तकांचा परिचय देण्यास उपयुक्त आहे. 'वाचनालयातील अभिजनांचे अड्डे' ही जून अंकातील कल्पना आवडली. संपादकीय विशेष भावले. आपला अंक खूपच उत्कृष्ट आहे. आपल्या अंकाचे बालवाचकही वाचक असल्याने 'पुस्तक परिचय' मध्ये बालपुस्तकांचाही परिचय द्यावा. ऑगस्टचा अंक आवडला.

–प्रकाश रामचंद्र शिंदे,
मु.पो. इंगळी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

ऑक्टोबर १९९८

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ वर्ष दुसरे
◆ अंक दहावा

दिवाळी विशेषांक

अनुक्रम

संपादकीय ---------------- २

माझ्या पुस्तकाची जन्मकथा

आनंद यादव ---------------- ८
डॉ. बाळ फोंडके ----------- २०
शिवाजी सावंत ------------- २६
माधव मोर्डेकर ------------- ३१
उमा कुलकर्णी ------------- ३६
निर्मलकुमार फडकुले --------- ४४
वामन देशपांडे -------------- ४९
बा. ग. केसकर -------------- ५१
डी. एस्. इटोकर ------------- ५६
आशा कर्दळे ---------------- ५९
आ. बा. पाटील ------------- ६५
निरंजन घाटे --------------- ६७
मंगला निगुडकर ------------ ६९
रा. रं. बोराडे -------------- ७४

पुस्तक विक्रेत्यांशी गप्पा

मॅजेस्टिक एजन्सी, दादर ------ ७८
जवाहर बुक डेपो, विलेपार्ले -- ८३
साहित्यवार्ता ---------------- ८७
पुरस्कार ------------------ ९५
श्रद्धांजली ----------------- ९७
फुले आणि काटे ------------ ९९
स्पर्धा निकाल ------------ १०१
नवीन स्पर्धा -------------- १०३
वाचकांचा प्रतिसाद ------ १०४

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
फोन : ४७६९२४

❑ कार्यकारी संपादक
शंकर सारडा
❑ संपादन सहाय्य
सुनीता दांडेकर
❑ मांडणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

❑ अंकाची किंमत २० रु.
वार्षिक वर्गणी ५० रु.
❑ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
❑ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल.

संपादक-मुद्रक-प्रकाशक : **सुनील मेहता**, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव, पुणे – ३०.
अक्षरजुळणी : **मेहता पब्लिशिंग हाऊस**, १२१६, सदाशिव, पुणे – ३०. फॅक्स : २१२–४७५४६२

या अंकातील लेखकांची मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.